# भारतीय वक्ते



म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणें
विषय बाल-वाङमय
दा. क्र. ४३६८
BVBK-0404368

गोपिनाथ तळवलकर

दा. क्र. ४३६८

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें.

सूचना :- खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक परत करावे,
तसे न केल्यास घटना नियम क्र. ५ (८) नुसार
प्रतिदिनी ५ पैसे जादा वर्गणी भरावी लागेल.

13 FEB 1976

# भारतीय वक्ते

ग्रंथ संग्रहालय
२९५८२
विभाग आ.वा.
क्रमांक २९८२
नों. दि. ३-८-५
वाचनालय

लेखक

श्री. गोपीनाथ तळवलकर

वाचनालय
क्र. ८३.६.८ नों. दि.
आ. वा.

BVBK-0404368

फेब्रुवारी १९५३ ]

मत १४ आणे

प्रकाशक :

न. शं. कुलकर्णी, एस्. टी. सी., टी. डी.

दि टीचर्स आयडियल पब्लिशिंग हाउस लि.,

७७ शनिवार पेठ, पुणें २ करितां.

प्रथमावृत्ति : १९५३.

मुखपृष्ठ चित्रकार–दीनानाथ दलाल.

मुद्रक :

न. शं. कुलकर्णी, एस्. टी. सी., टी. डी.

टीचर्स प्रिंटिंग प्रेस,

७७ शनिवार पेठ, पुणें २ करितां.

# दोन शब्द

हें पुस्तक लिहिण्यास सांगतांना माझे मित्र श्री. न. शं. कुलकर्णी यांनीं मला एका अत्यंत अवघड परीक्षेला बसविलें यांत शंका नाहीं. नामवंत वक्त्यांच्या वक्तृत्त्वाचें सौंदर्य व रहस्य सांगणें मोठें कठीण कार्य आहे! कारण वक्तृत्वकलेच्या विलासांत वक्त्याचा आवाज, अभिनय, व्यक्तित्व व श्रोत्यांनीं त्यांस दिलेला प्रतिसाद त्याचप्रमाणें त्या विशिष्ट प्रसंगानें निर्माण झालेलें वातावरण, या सर्वांचा समुच्चय असतो. अशा वक्तृत्त्वाचें वर्णन पुढें देतांना हा सर्व समुच्चय विघटित व विसर्जित झालेला असतो. वक्तृत्त्वांतले शब्द तेवढे कागदावर राहिलेले असतात. तेवढ्या जोरावर वक्तृत्त्वविलासाचा पुनः प्रत्यय विद्यार्थ्यांना कसा आणून द्यावयाचा? म्हणूनच ही अतिशय कठीण परीक्षा असें मीं म्हटलें. तथापि मीं प्रयत्न शिकस्तीचा केला आहे. उत्तर-पत्रिका पुस्तकरूपानें जनतेकडे जात आहे. जनता सढळ हातानें मला उत्तीर्ण होण्याइतके तरी गुण देईल असा विश्वास वाटतो.

या पुस्तकांतले पांचहि सभापंडित इंग्रजी भाषेंतले वाचस्पति आहेत. त्यामुळें मूळचें कठीण कार्य अधिक बिकट झालें! परंतु याच पांच वक्त्यांची निवड करण्यांत कांहीं औचित्य व वैशिष्ट्य मला साधावयाचें होतें. भारतीय वक्तृत्वकलेचा प्रकाश ज्यांनीं त्रिखंडांत पाडला असेच महनीय नेते मीं घेतले. बानर्जी, गोखले, शास्त्री, जयकर, आणि राधाकृष्णन् हीं पांचहीं माणसें देशभक्त, सुविद्य, आणि मातबर आहेत. त्यांच्या वक्तृत्वाचें स्वरूप विधायक आहे. या पुस्तकांतले पहिले वक्ते राष्ट्रीय सभेच्या संस्थापकांपैकीं प्रमुख होते आणि शेवटचे हे आज भारताचे उपराष्ट्रपति आहेत. या दृष्टीनें गेल्या पाऊण शतकांत भारतीय राष्ट्रवादाचा जो उत्कर्ष झाला त्याचा एक चढता आलेख या पुस्तकांत पहावयास मिळेल. भारतीय राष्ट्रवाद आक्रमक नाहीं तर जगच्छांतीचा अग्रदूत आहे, हें या पुस्तकांत आलेल्या वक्तृत्वाच्या अनेक सुंदर अवतरणांवरून सहज सिद्ध होईल. भारताला जगांत आज लाभलेली नैतिक प्रतिष्ठा उद्यांच्या नागरिकांना कळणें जरूर आहे, असें मला वाटतें.

त्या बरोबरच वक्तृत्वकलेच्या तंत्राचाहि मीं उहापोह केला आहे. वक्तृत्व हें लोकशाहीच्या आश्रयानें वाढतें. तेव्हां आजच्या स्वतंत्र व लोकसत्ताक भारतांत वक्तृत्वाला फार मोठें स्थान मिळणें अवश्य आहे. शाळा, महाविद्यालयें व तत्सम इतर संस्था यांतून या कलेला प्रोत्साहन देण्यांत येत आहे. परंतु वक्तृत्वकला ही मेहनतीनें व पद्धतशीर रीतीनें वाढविण्याजोगी कला आहे, याची जाणीव अजून फारशी आलेली नाहीं. मराठींत याविषयीं फारच थोडें वाङ्मय प्रसिद्ध झालें आहे. प्रस्तुत पुस्तकांत वक्तृत्वकलेचीं मुख्य सूत्रें थोडक्यांत पण स्पष्ट रीतीनें देण्याचा मीं प्रयत्न केला आहे. मात्र तीं एके ठिकाणीं न देतां विषयाच्या ओघांत सर्वत्र पसरून टाकलेलीं आहेत. तीं लक्षांत घेऊन आपल्या कलोपासनेची दिशा निश्चित केल्यास विद्यार्थ्यांना खास फायदा होईल. या कामीं शिक्षक व पालक यांचें मार्गदर्शन मात्र अवश्य मिळालें पाहिजे. वक्तृत्वांतले उतारे देतांना मुळांतल्या शब्दांचें लय व वजन भाषांतरांत उतरावें म्हणून मीं भाषांतरांत थोडी सवलत घेतली आहे.

या पुस्तकाचें लेखन करण्याची जबाबदारी पत्करली खरी. पण कुठून व कसा आरंभ करावा, याविषयीं मनांत एक प्रकारचा गोंधळच होता. ता. ३० नोव्हेंबर १९५२ रोजीं ने. ना. डॉ. बाबासाहेब जयकर यांची २॥–३ तासांची प्रदीर्घ मुलाखत घेतली. अविस्मरणीय असा सुखसंवादच होता तो ! कुलगुरूंच्या प्रोत्साहक भाषणामुळें मनांतील गोंधळ दूर झाला आणि पुस्तकाचा आराखडा डोळ्यांपुढें आला. तेव्हां प्रथम त्यांचे मनःपूर्वक आभार मानले पाहिजेत. पुढेंहि त्यांनीं आपल्या भाषणाचे विस्तृत अहवाल व कांहीं पुस्तकें तत्परतेनें देण्याची व्यवस्था केली. कुलगुरूंचे एक मदतनीस श्री. कर्वे यांच्या साह्याबद्दल मी कृतज्ञ आहें. मित्र० प्रा. निरंतर यांच्यावर तर माझी नेहमींची भिस्त. त्यांनीं वक्तृत्वशास्त्रावर पांचसहा सुंदर इंग्रजी पुस्तकें आणून दिलीं. या पुस्तकांतील वक्त्यांची निवड करण्यापासून ‘ अभ्यासाच्या वाटा ’ विद्यार्थिवर्गाला दाखविण्यापर्यंत मित्र० प्रा. वा. दा. गोखले यांनीं

साह्य केलें आहे. या मदतीचा साभार उल्लेख केला पाहिजे. केसरी-मराठा ग्रंथालय व भारत-सेवक-समाजाचें ग्रंथालय यांचा अगणित लोकांप्रमाणें मींहि आधार घेतला. 'इंटर नॅशनल'चे श्री. विठ्ठलराव दीक्षित, डॉ. वाटवे, श्री. केशवराव शारंगपाणी, श्री. बापट या ज्येष्ठ मित्रांना या पुस्तकासाठीं थोडाफार त्रास द्यावा लागला. सर्वांना साभार धन्यवाद. माझ्यावर पितृनिर्विशेष प्रेम करणाऱ्या एका व्यक्तीनें टिपणें करण्यापासून सर्व कामांत मोठें साह्य केलें. पण आभारप्रदर्शनांत आपलें नांव नको असें तिनें बजावलें असल्यानें तिचा सकौतुक पण अनामिक उल्लेख करतों.

या पुस्तकाच्या तयारीला आरंभ केल्यापासून त्याचें लेखन संपेपर्यंत प्रकाशक श्री. कुलकर्णी हे आस्थेनें पूसतपास करीत होते. भारतीय वक्त्यांच्या वक्तृत्वाच्या 'पंचगंगे'त अवगाहन करतांना गेले २-२॥ महिने फार आनंदांत गेले. हा आनंद मिळवून देण्यास रा. कुलकर्णी यांचा आग्रहच मुख्यतः कारण झाला आहे. पण त्यांच्या 'दि टीचर्स आयाडियल पब्लिशिंग हाउस लि., पुणें' या पेढीवरून घेतलेलें ऋणानुबंधाचें ऋण चक्रवाढव्याजानें वाढत जावें अशी इच्छा असल्यानें आभाराचा जमाखर्च आजच पुरा करीत नाहीं. असो. ज्यांच्यासाठीं या पुस्तकाची योजना आहे, त्यांना तें आवडो ही इच्छा.

आनंदकार्यालय, पुणें २.
२२-२-५३

—गोपीनाथ तळवलकर


## अनुक्रम

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १. | सुरेंद्रनाथ बानर्जी | १ | ते | २१ |
| २. | गोपाळ कृष्ण गोखले | २२ | ते | ४२ |
| ३. | श्रीनिवासशास्त्री | ४३ | ते | ६० |
| ४. | जयकर | ६१ | ते | ८२ |
| ५. | राधाकृष्णन् | ८३ | ते | १०३ |

२९१८२
पा.वा.
२१५२
३-२-६१

# सुरेंद्रनाथ बानर्जी

पावसाळ्यांत खवळलेला वादळी समुद्र कुणी पाहिला तर काय दिसतें ? एक प्रचंड लाट येऊन कांठावर फुटते आहे, तोंच तिच्याहून अधिक राक्षसी लाट क्षितिजावरून तिच्या मागोमाग येतांना दिसते. संपन्न दुकानाचा मालक जसा एकाहून एक सरस कापडाचे तागे गिऱ्हाइकापुढें उलगडत झोंकून देतो, तसेंच निसर्ग आपल्यापुढें आपलें भांडार खुलें करीत आहे, असा भास होतो. किनाऱ्यावर लाटा फेसाळून जेथें विसर्जन पावतात, तेथें शुभ्र फेसाचा ढीग होतो. किनाऱ्याला या पांढऱ्या फेसाची सुंदर झालर लागलेली दिसते. लाटा आकाशांत कितीहि उंच चढल्या तरी या झालरीच्या पुढें सागरराज सहसा पाऊल टाकीत नाहींत. आधुनिक भारताच्या पहिल्या पिढींतले थोर देशभक्त बाबू सुरेंद्रनाथ बानर्जी यांचें वक्तृत्व हें अशा प्रकारचें होतें. भव्य, स्फूर्तिदायक, पण सनदशीरपणाच्या मर्यादा न ओलांडणारें. या वक्तृत्वानें भारताच्या राजकीय जागृतीची नांदी म्हटली, तरुणांना कार्यप्रवण केलें, आणि स्वातंत्र्याची मुहूर्तमेढ रोविली. सुरेंद्रनाथांना 'बंगालचे सिसेरो' म्हणत. या 'सिसेरो'नें भारतीय वक्तृत्वकलेचा ध्वज सातासमुद्रापलीकडे फडकविला. त्यांच्या वक्तृत्वाचें रहस्य जाणण्यास प्रथम त्यांच्या जीवनाचा परिचय करून घेणें अवश्य आहे.



## जन्म आणि शिक्षण

बंगाल हा केवळ जमिनीच्या दृष्टीनें सुपीक प्रांत आहे असें नाहीं. तेथें प्रतिभेची समृद्धिहि फार आहे. गेल्या शें-सव्वाशें वर्षांतच पहा ना! अध्यात्मांत रामकृष्ण-अरविंद, विज्ञानांत जगदीश-प्रफुल्लचंद्र, समाजसुधारणेंत राममोहन-विद्यासागर, साहित्यांत रवींद्र-शरच्चंद्र, राजकारणांत चित्तरंजन-सुभाषचंद्र, तत्त्वज्ञानांत विवेकानंद-दासगुप्त असे लोकोत्तर अग्रणी वंगभूमी-मध्यें होऊन गेले. याच दिव्य मालिकेंत शोभणारे सुरेंद्रनाथ बानर्जी हे १८४८ सालीं जन्माला आले. सुरेंद्रांचे वडील दुर्गाचरण हे कलकत्त्यास नामांकित डॉक्टर होते. हें कुलीन ब्राह्मणाचें घराणें विद्येविषयीं प्रसिद्ध होतें. सुरेंद्रनाथांची बुद्धि तल्लख आणि घरीं शिस्त व परंपरा उत्तम. त्यामुळें शाळेंत व महाविद्यालयांत सुरेंद्रनाथ खूप चमकले. ते परीक्षेंत अगदीं पहिले क्वचित् येत, परंतु नेहमीं कांहीं ना कांहीं बक्षीस व शिष्यवृत्ति त्यांच्या नांवापुढें असावयाचीच. बंगालमध्यें इंग्रजी शिक्षणाचा पाया घालणारे डेव्हिड हेअर यांनीं सुरेंद्रांना स्फूर्ति व मार्गदर्शन केलें. सुरेंद्रांचें इंग्रजी वाचन जबरदस्त असे. बर्क आणि मॅझिनी हे त्यांचे विशेष आवडते ग्रंथकार होते. त्यांच्या वक्तृत्वांतील उदात्तता व ध्येयनिष्ठा यांचे हे मूळ झरेच होत असें म्हटलें तरी चालेल. १८६८ सालीं सुरेंद्रबाबू बी. ए. झाले आणि आय्. सी. एस्. होण्यासाठीं ते इंग्लंडला गेले. ती परीक्षा ते पास झाले. पण कुणी वयाच्या लायकीचेंच खेकटें काढलें! पुढें त्याचा अनुकूल निकाल होऊन सुरेंद्रांना सरकार मान्यता मिळाली आणि ते हिंदुस्थानांत परत येतांच त्यांची सिल्हेट जिल्ह्यांत असिस्टंट मॅजिस्ट्रेट म्हणून नेमणूक झाली.

## सरकारी नोकरींतून अर्धचंद्र

पण भारताचें भाग्य बलवत्तर म्हणून सुरेंद्रनाथ सरकारी रौप्यशृंखलेंत अडकून राहिले नाहींत. सरकारी कामाकाजांत कसली तरी तांत्रिक चूक

सुरेंद्रांच्या हातून झाली. वास्तविक चूक किरकोळ होती आणि २३ वर्षांच्या या कोवळ्या अधिकाऱ्याच्या क्षुल्लक प्रमादाकडे सरकारनें दुर्लक्ष केलें असतें तरी कांहीं बिघडत नव्हतें. पण होतकरू व उमद्या हिंदी युवकांचा तेजोभंग करण्यास टपलेल्या साम्राज्यशाहीनें ही संधि साधून सुरेंद्रांना सेवानिवृत्त होण्यास लाविलें ! ' राक्षसी शिक्षा ' असें या सरकारच्या कृत्याचें वर्णन एका युरोपियन माणसानेंच केलें आहे. पण झालें तें एका अर्थानें बरेंच झालें. सुरेंद्रनाथ सरकारी नोकरींत असते, तर राज्यकारभाराचा गाडा हांकण्याखेरीज विशेष कांहीं करणें त्यांना शक्य झालें नसतें. पण सरकारी नोकरी सुटल्यानंतर त्यांनीं आपल्या आवडत्या शिक्षणक्षेत्राकडे दृष्टि वळविली आणि ते खऱ्याखुऱ्या अर्थानें युवकांचे गुरु झाले. राष्ट्राला त्यांनीं नवचैतन्य दिलें. या दृष्टीनें त्यांना सरकारी नोकरींतून काढून टाकणाऱ्या अधिकाऱ्याचे आपण ऋणीच राहिलें पाहिजे !

## अध्यापन व पत्रपांडित्य

बाबू ईश्वरचंद्र विद्यासागर यांनीं सुरेंद्रांना इंग्रजी प्राध्यापकाची जागा दिली आणि पुढें सुरेंद्रबाबू रिपन् कॉलेजमध्यें गेले. आपल्या बौ बाझार रस्त्यावर एक लहानशी पाठशाळा सुरेंद्रांनीं उघडली आणि तिचाच रिपन् कॉलेजमध्यें पुढें समावेश केला. बंगालमधील विद्यार्थिप्रिय प्राध्यापकांत सुरेंद्रांची गणना होत असे. पुढें रमेशचंद्र दत्तांच्या सत्कारप्रसंगीं " एक नम्र शाळा-मास्तर " असा स्वतःचा नम्रतापूर्वक पण साभिमान उल्लेख सुरेंद्रांनीं केला.

> " शिक्षकाचें साम्राज्य शाश्वतजीवी असून, तें भविष्यकालावर पसरलेलें असतें. ···मी मुलांच्यावर प्रेम करतों. मी त्यांच्या सुख-दुःखाशीं समरस होतों. प्रेम हें जीवनांतल्या यशाचें रहस्य आहे. प्रेमापासूनच ज्ञानाचा उगम होतो. प्रेमानें निर्णय स्वच्छ दिसूं लागतो आणि जीवनदृष्टि बलिष्ठ होते."

अध्यापनाप्रमाणें पत्रपांडित्यहि सुरेंद्रांनीं आत्मसात् केलें. ' बंगाली ' हें वृत्तपत्र त्यांनीं चालवावयास घेतलें आणि थोड्याच दिवसांत त्यांनीं तें नांवारूपाला आणिलें. चटकदार बातम्यांबरोबर विचारांना खाद्य पुरविणें, हेंहि या पत्राचें वैशिष्ट्य असे. लोकशिक्षणाचें पवित्र कार्य करण्याचें साधन याच दृष्टीनें सुरेंद्रनाथ हें पत्र चालवीत, सरकारला या पत्राचें वाढतें वजन चांगलेंच जाणवूं लागलें. याचा प्रत्यय लौकरच आला. एका प्रकरणीं सरकारच्या न्यायपद्धतीवर ' बंगाली'नें खरमरीत टीका केली. ती सहन न होऊन गोऱ्या न्यायमूर्तींनीं सुरेंद्रांवर न्यायासनाची अप्रतिष्ठा केल्याच्या आरोपावरून खटला भरला. ' बंगाली'नें कायद्याचा मान राखून दिलगिरी प्रदर्शित केल्यानंतर, हें प्रकरण येथेंच मिटणें योग्य होतें. पण सुरेंद्रनाथांना देहदंड दिल्याशिवाय सरकारला कसें चैन पडावें ? बाबूजींना दंडाची शिक्षा होईल, ही सर्वांची अपेक्षा होती. पण मुद्दाम गोऱ्या न्यायमूर्तींनीं या देश-भक्ताला दोन महिन्यांच्या कैदेची शिक्षा फर्माविली ! अग्नींत सुवर्णाची परीक्षा होऊन त्याचें शुद्धत्व उठून दिसावें, त्याप्रमाणें या शिक्षेमुळें सुरेंद्र-नाथांची लोकप्रियता झगझगीतपणें दिसून आली. खटल्याच्या निकालाचे दिवशीं जबर दंड झाला, तर तो तेथल्या तेथें भरून सुरेंद्रांना सोडवावें म्हणून एक पंजाबी तरुण एक लाख रुपयांच्या नोटा घेऊन आला होता ! बाबूजी सुटले तेव्हां तरुणांनीं उत्साहानें त्यांच्या अभिनंदनाच्या सभा भर-विल्या. ( एका सभेंत एक तेजस्वी तरुण विशेषच गाजला. सुरेंद्रांना अभि-वादन करण्यास पुढें सरसावलेला हा तरुण म्हणजे पुढें आधुनिक बंगालचे भाग्यविधाते म्हणून प्रसिद्ध झालेले सर आशुतोष मुकर्जी होत !) या कारा-वास-पर्वानें बाबूजींची तरुण मनावरील पकड अधिक पक्की झाली.

## राजकारणाचें पुण्याहवाचन

स्थानिक स्वराज्यांतहि सुरेंद्रनाथांनीं लक्ष घातलें. सुमारें दोन तपें ते कलकत्ता महानगरपालिकेचे सभासद होते आणि प्रांतिक कायदेमंडळांत याच

संस्थेतर्फे पुढें ते निवडून आले. अध्यापन, पत्रपांडित्य, स्थानिक स्वराज्य या क्षेत्रांप्रमाणें राजकारणांतहि सुरेंद्रनाथ प्रथमपासूनच अग्रेसर होते. २६ जुलै १८७६ हा दिवस बाबूजींच्याच नव्हे तर भारताच्या जीवनांतहि सुवर्णाक्षरांनीं कोरून ठेवावा असें ठरेल. या दिवशीं इंडियन् असोसिएशन् ही संस्था स्थापन झाली. सुरेन्द्रच या संस्थेचे मुख्य प्रवर्तक होते. याच दिवशीं बाबूजींचा प्रिय पुत्र मृत्युमुखीं पडला. पण शोक आवरून ते सभेला हजर राहिले. या संस्थेतर्फे पुढें एक परिषद भरविण्यांत आली आणि त्या परिषदेंत पंजाबी, बंगाली, मद्रासी, बिहारी इत्यादि सर्व प्रांतांचे प्रतिनिधि जमले. भारताची विविधता आणि एकता दोन्ही या परिषदेंत उठून दिसली. दोनच वर्षांनीं जन्माला आलेल्या भारतीय राष्ट्रीय सभेचें जणूं तें मानचित्रच होतें. आधुनिक राष्ट्रवादाची गंगा याच गंगोत्रींतून जनतेच्या पातळीवर उतरली असें म्हणण्यास हरकत नाहीं.

## विलायतेंत फड मारला!

आपल्या देशांतला स्वराज्याचा लढा यशस्वी व्हायचा असेल, तर विलायतेंतहि रान उठविलें पाहिजे ही दूरदृष्टि सुरेंद्रनाथांना होती. त्याप्रमाणें लौकरच ते हिंदी लोकांची बाजू मांडण्यास विलायतेंत गेले. सुमारें तीस सभांत त्यांनीं भाषणें केलीं. दरएक सभा म्हणजे बाबूजींच्या वक्तृत्वाचा उत्कृष्ट विलास असे. श्रोते मंत्रमुग्ध होऊन जात. दर ठिकाणीं भाषणानंतर संतुष्ट झालेल्या श्रोत्यांनीं जमावें आणि बाबूजींना पुन: एकदां आपणांला आपल्या भाषणाचा लाभ देण्याची आग्रहाची विनंति करावी, असें चाले. श्रोत्यांना समाधान असें मुळीं वाटेनाच. खुद्द इंग्रजीच्या माहेरघरांत आपल्या इंग्रजी वक्तृत्वानें सुरेंद्रांनीं तेथील लोकांना दिपवून टाकलें. एका जाणकार इंग्लिश श्रोत्यानें सुरेंद्रांच्या अमोघ वक्तृत्वाचा आपणांवर कसा परिणाम झाला, याचें सुरस वर्णन केलें आहे. तो म्हणतो :

" बाबू कुशल वक्ते आहेत आणि लोखंड तापलें कीं, अचूक घाव घालायची कला त्यांना साध्य आहे. विल्यम् पिटची मधुर गर्जना, फॉक्सचें विवादपटुत्त्व, बर्कचें संपन्न दृष्टांतचातुर्य आणि शेरिडनची कुशाग्र बुद्धि या सर्वांचा आढळ बाबूजींच्या वक्तृत्त्वांत होतो. "

आपल्या राष्ट्रीय अहंकाराला मुरड घालून आपल्या इतिहासांतील नामवंत वक्त्यांचे गुण बाबूजींच्या वक्तृत्त्वांत एकत्रित झाल्याचें या इंग्रजानें मोकळ्या मनानें सांगितलें आहे. एका वार्ताहरानें म्हटलें आहे–" बाबूजींचें भाषण ऐकून मी थक्क झालों. एक विद्युल्लहरी अंगांतून चमकून गेली. त्यांची इंग्रजी भाषा शुद्ध होती, उच्चार अचूक होते आणि उपमा–दृष्टांतांत स्वतंत्र शैली व सामर्थ्य दिसें. " बाबूजी यानंतर दोन वेळां इंग्लंडला गेले. एकदां बंगालच्या फाळणीविषयींचें गाऱ्हाणें जाणत्या इंग्रजांपुढें मांडण्यासाठीं आणि दुसऱ्यानें पार्लमेंटरी कमिटीपुढें साक्ष देण्यासाठीं. या महान् वक्त्याच्या वाग्गंगेंत अवगाहन करण्यांत इंग्रज श्रोत्यांना धन्यता वाटे. त्यामुळें दरवेळीं बाबूजींचें आंग्लभूमींत प्रचंड व सार्वत्रिक स्वागत झालें.

## कॉंग्रेस आणि वंगभंग

महाराष्ट्र आणि बंगाल यांचा कायम दुवा जोडण्याचें श्रेय सुरेंद्रांना देतां येईल. १८९५ सालीं पुणें येथें भरलेल्या कॉंग्रेसचें अध्यक्षपद सुरेंद्र-नाथांना देण्यांत आलें. भारतांत मिळणारा सर्वोच्च सन्मान पन्नाशीची झुळुक लागण्याच्या आंतच बाबूजींना मिळाला. सन्मानाप्रमाणें जबाबदारीहि फार मोटी होती. पण सुरेंद्रनाथ त्या कसोटीस पुरेपूर उतरले. पुण्यास आपलें अध्यक्षीय भाषण संपवून बाबूजी खालीं बसले तेव्हां तरुण श्रोतृवर्ग तर अक्षरशः त्यांच्या पायाला लागला ! नरम गरम दलांच्या नेत्यांनीं व अनु-यायांनीं केलेल्या प्रशंसेच्या पुष्पवृष्टीनें आपण गुदमरून गेलों असें बाबूजी सांगतात. अध्यक्षपदाचा मान १९०२ सालीं पुनः अहमदाबाद कॉंग्रेसच्या

अधिवेशनांत बानूर्जींना मिळाला. पण बानूर्जींचा लोकप्रियतेचा आलेख अजूनहि वर चढायचा होता. १९०५ सालीं अरेरावी कर्झननें बंगालची फाळणी केली ! सारा हिंदुस्थान खवळून उठला. बंगालचा अपमान तो साऱ्या भारताचा अपमान, अशी भावना बळावून राष्ट्रीय चळवळीला जोर आला. प्रांतोप्रांतीं स्वदेशी व बहिष्कार या दुधारी शस्त्राला धार लावून तें वापरण्यांत येऊं लागलें. सुरेंद्रनाथांच्या पांच वर्षांच्या नातीनें आपला बूट परदेशी आहे, म्हणून परत केला ! या एकाच गोष्टीवरून त्या वेळीं स्वदेश-प्रीतीची लाट किती उंच चढली होती तें कळेल.

या चळवळीला अत्याचारी स्वरूप न यावें असा सुरेंद्रांनीं आटोकाट प्रयत्न केला. परंतु कुठें कुठें स्फोट झालेच ! आणि तरीहि नेमस्त वृत्तीचे सुरेंद्रनाथ हेच या चळवळीचे अध्वर्यु व बंगालचे अनभिषिक्त राजे ठरले. "सुरेंद्रनाथ कीं जय" हा जयजयकार चारी दिशांना घुमूं लागला. 'सुरेंद्रनाथ' हें नांव 'सरण्डर नॉट' ( शरण जाऊं नका ) या आदेशा-साठीं सांकेतिक म्हणून चळवळ्ये लोक वापरीत आहेत, असा वहीम राष्ट्रीय चळवळीमुळें बिथरलेल्या व भेदरलेल्या गोऱ्या नोकरशाहीस आला ! यांतला विनोद बाजूला केला तरी सुरेंद्रनाथांची लोकप्रियता कशी शिगेला पोंचली होती, हें यावरून दिसून येईल. १९०६ सालीं कलकत्ता येथें भरलेल्या कॉंग्रेसपुढें फाळणीच्या प्रश्नावर सुरेंद्रनाथांनीं केलेलें भाषण अतिशय हृदयस्पर्शी वठलें.

> "आपल्या पुढील कार्यांत यशाची आशा किती आहे, हें पाहिलें तर अत्यंत सामर्थ्यवान् अंतःकरणहि दुभंगून जाईल ! अठरा महिने आपण ही चळवळ चालविली ! परमेश्वरा ! हा कष्टमय आणि दुःखकारक मार्ग आम्हांला आणखी किती दिवस चालावा लागणार ? अंतःकरणाच्या तळांतून ध्वनि उमटून आम्हांस सांगतो : जोंपर्यंत अन्याय दुरुस्त झाला नाहीं तोंपर्यंत तुम्हांला झगडलेंच पाहिजे."

सुरेंद्रनाथांना पकडण्यांत आलें. पुढें मुक्त झाल्यानंतर हें चळवळीचें लोण सुरेंद्रांनीं विलायतेपर्यंत पोंचविलें. अखेर अनेक देशभक्तांच्या त्यागाला व परिश्रमाला फळ येऊन बादशहांनीं बंगालची फाळणी अखेर रद्द केली.

## अखेर

वंगभंगानंतरच्या काळांत सुरेंद्रनाथांच्या यशाला फार मंदी आली, असेंच दुर्दैवानें म्हणावें लागतें ! पहिल्या महायुद्धानंतर गांधीजींच्या अलौकिक नेतेपणानें भारताचा स्वातंत्र्यसंग्राम तीव्र झाला. बहुजनसमाज जागृत व संघटित होऊन साम्राज्यशाहीविरुद्ध त्यानें ठाण मांडलें. नव्या युगाचें हें प्रखर तेज वृद्ध सुरेंद्रांच्या क्षीण डोळ्यांना सोसवणें शक्य नव्हतें. शेवटीं इंग्रज सरकारनें बहाल केलेली ' सरकी ' त्यांनीं पत्करली आणि बंगालचे मंत्री होऊन गोऱ्या नोकरशाहीच्या हातास हात लावण्यांत ते स्वतःला कृतार्थ समजूं लागले ! असो. तथापि सुरेंद्रांची तपश्चर्या इतकी थोर आहे कीं, आधुनिक भारताच्या शिल्पकारांत त्यांचें नांव प्रामुख्यानें घेतलें जाईल. त्यांचें स्वतःचें जीवन आणि मातृभूमि यांच्यांत सायुज्यता झाली होती. आपल्या आत्मचरित्रांत " आकारास येऊं घातलेलें राष्ट्र " ( नेशन् इन् दी मेकिंग ) असें नांव सुरेंद्रनाथांनीं दिलें आहे. यावरून मातृभूमीचा उद्धार आणि जीवनविकास या दोन्ही गोष्टी त्यांना एकरूपच कशा वाटत होत्या, तें दिसून येईल. ता. ६ ऑगस्ट १९२५ रोजीं भारतीय राष्ट्रवादाचा हा आद्य प्रवर्तक स्वर्गवासी झाला.

## खाजगी जीवन

सुरेंद्रनाथांची आकृति भव्य होती. प्रभावदर्शक नेत्र, उंच कपाळ, दाढी यांमुळें त्यांच्या चेहऱ्याची छाप तात्काळ पडे. आरोग्याला ते अतिशय महत्त्व देत चाळीस वर्षांच्या प्रदीर्घ व कार्यव्याप्त सार्वजनिक जीवनांत ते

फक्त एकदाच आजारी पडले. शेजघरांत डंबेल्स्, जोडी वगैरे आयुधें ठेवलेलीं असत. सकाळीं अनशापोटीं वीस मिनिटें व्यायाम करावयाचा आणि दुपारचा चहा झाल्यानंतर ऊन उतरल्यावर त्याचीच आवृत्ति करावयाची असा त्यांचा क्रम असे. परंतु गांधीजींनीं ज्याला 'व्यायामाचा राजा' म्हटलें आहे, तो चालण्याचा व्यायाम बाबूजींना विशेष पसंत असे. एकदां एक प्रसिद्ध महाराष्ट्रीय गृहस्थ बाबूजींचे पाहुणे म्हणून गेले. गाडी दोन तास उशिरां आली. तेव्हां आपल्या स्वागतास आलेल्या सुरेंद्रनाथांना पाहुणे दिलगिरीपूर्वक म्हणाले, "आपले महत्त्वाचे दोन तास फुकट गेले." यावर बाबूजींनीं सांगितलें, "छे, छे, तेवढा काळ मीं शेजारीं नदीवर हिंडून माझा रोजचा व्यायाम पुरा केला. आणि 'पराडाइज् लॉस्ट' मधील ओळी गुणगुणत होतों." उच्च विचाराच्या किंवा वाङ्मयाच्या लाटेवर मन सोडून सहल करणें, हा सुरेंद्रनाथांच्या दैनंदिन जीवनांतील एक कार्यक्रम असे. खाण्यापिण्याचे बाबतींत युक्ताहाराचें तत्त्व ते कसोशीनें पाळत.

झोंप हेंहि आपल्या शारीरिक व मानसिक आरोग्याचें रहस्य म्हणून बाबूजी सांगत. "लौकर निजे लौकर उठे"—या वचनांतील पहिला निम्मा भाग ते न चुकतां अमलांत आणीत. नऊ वाजतां झोंपायचें, हा त्यांचा नियम असे. मात्र सकाळीं जागें होण्याच्या बाबतींत त्यांना 'सूर्यवंशी'च म्हणावें लागेल! एकदां व्हॉइसरॉय चेम्सफर्ड यांनीं 'रौलेट ॲक्ट'ची चर्चा करण्या-करितां रात्रीं आपल्या कौन्सिलची बैठक घेण्याचें ठरविलें. त्यावेळीं सुरेंद्रनाथ उठून म्हणाले, 'महाराज, मी नऊ वाजतां झोंपतों.' तेव्हां बड्या लाटांनीं सुरेंद्रांनीं बैठकीस हजर न राहिलें तरी चालेल, अशी सवलत दिली. लंडनमध्यें असतांना एकदां ना. गोखल्यांनीं आयर्विंग या जगविख्यात् इंग्रजी नटाचें नेपोलियनचें काम पाहण्यास चलण्याचा बाबूजींना खूप आग्रह केला. आपल्या आवडत्या निद्रेंत व्यत्यय नको म्हणून बाबूजी कधींहि रात्रीं नाटक, समारंभास जात नसत. पण गोखल्यांच्या आग्रहास्तव त्यांनीं एक दिवस अपवाद करण्याचें ठरविलें. मात्र रात्रीं अकराच्या आंत गोखल्यांनीं आपल्या

विऱ्हार्डी आणून सोडलें पाहिजे, ही अट घातली. गोखल्यांनीं ती तंतोतंत पाळली आणि अकराला घरीं येतांच सुरेंद्रनाथ घोरूं लागले. 'निद्रा ही माझ्या जीवनांतील सर्वांत प्रिय ऐषारामाची गोष्ट होय.' असे सुरेंद्रनाथ म्हणतात.

कलकत्त्यापासून सुमारें १४।१५ मैलांवर सुरेंद्रनाथ राहात. सकाळीं दहा वाजतां ते कलकत्त्यास येत. आणि कामें आटोपून रात्रीं झोंपायला परत जात. हा क्रम अनेक वर्षें चालू होता. आपल्या निवासस्थानाभोंवतीं त्यांनीं सुंदर बाग केली होती. पांच मुली आणि एक मुलगा एवढी त्यांना संतति होती. घर गोकुळासारखें भरलेलें असें आणि तरीहि मनांत येईल, त्यावेळीं त्या गजबजाटांत सुरेंद्रनाथ महत्त्वाच्या विषयावर मन केंद्रित करून वाचन-लेखन करूं शकत. विचारानें ते सुधारक होते. देवापेक्षां ध्येयावर त्यांची विशेष श्रद्धा असे

> "आपण हिंदु लोक क्रांति किंवा तत्-सदृश गोष्टी यांचा तिरस्कार करतों. विकासवाद हें आपलें घोषवाक्य आहे."

आत्मचरित्राच्या शेवटच्या पानांत सुरेंद्रनाथांनीं लिहिलेलीं हीं वाक्यें त्यांच्या जीवनदृष्टीची पूर्ण कल्पना आपणांस देतात.

## वक्तृत्व आणि लोकशाही

वक्तृत्वकलेचें रोप लोकशाहीच्या वातावरणांत विशेष फोफावतें. प्राचीन ग्रीक किंवा रोम राजवटींत असामान्य वक्तृत्वाचे आदर्श होऊन गेले. इंग्लंडमध्यें लोकसत्तेचा विकास जसजसा होत गेला, तसतसें वक्तृत्वकलेचें तेज चढत गेलेलें दिसतें. वक्तृत्व आणि लोकसत्ता यांचा हा ऋणानुबंध साहजिकच आहे. राजशाही किंवा हुकूमशाही यांमध्यें वक्तृत्वकलेला वाव कसा मिळणार? कारण राजा किंवा हुकुमशहा जे सांगणार त्यावर सारे व्यवहार चालावयाचे. 'राजा बोले दळ हाले' किंवा 'यथा राजा तथा प्रजा' या म्हणीवरून हेंच सिद्ध होतें. लोकसत्तेंत एकानें दुसऱ्याला समजून

सांगणें किंवा सत्तारूढ पक्षाचे निर्णय बदलावयाला लावणें, हे प्रसंग नेहमीं येतात, अशा वेळीं मुख्यतः वक्तृत्वाचा उपयोग असतो. म्हणूनच तेव्हां वक्तृत्वकलेला बहर येतो. भारतांतहि लोकसत्तेच्या कल्पनांची रुजावट होऊन त्यांना अंकुर फुटूं लागले, तेव्हांच वक्तृत्वाची पैदास विशेष मोठ्या प्रमाणावर होऊं लागली. सुरेंद्रनाथ हे या कलेंतले पहिले अध्वर्यु होत.

## आपली परंपरा

मात्र वक्तृत्वाची परंपरा पूर्वीं येथें अगदींच नव्हती, असें मुळींच नाहीं. प्राचीन काळापासून या धर्मभूमींत अनेक धर्मपंथ व दर्शनें उदयास आलीं. या पंथांचे व दर्शनांचे प्रवर्तक आपापल्या तत्त्वज्ञानाचा प्रसार करतांना आपल्या निरूपणकौशल्यानें जिज्ञासूंना मोहित करीत. प्राचीन ऋषि व भाष्यकार, बुद्ध आणि महावीर, चैतन्य आणि नानक, रामदास आणि तुकाराम हे व असे द्रष्टे आणि संत केवढे महान् वक्ते असले पाहिजेत! लक्षावधि अंतःकरणें ज्यांनीं आपल्या वाङ्मोहिनीनें बदलून टाकिलीं, त्यांच्या जिव्हेवर सरस्वती नाचत असली पाहिजे. धर्मप्रवर्तकांची हीच परंपरा आमच्याकडे हरिदास व पुराणिक यांनीं आधुनिक काळापर्यंत आणून सोडली आहे. सामाजिक किंवा राजकीय नेता ही वक्त्याची भूमिका अलीकडची आहे. त्याच्या पूर्वीं देवळाचे प्राकार किंवा सभामंडप मुख्यतः त्यांच्या कला विलासाचें मुख्य स्थळ होऊन राहिलें होतें.

## धर्मबुद्धि हीच वक्तृत्वाची मुख्य प्रेरणा

आमच्या देशांतलें वक्तृत्व असें धर्माश्रयानें वाढलेलें आहे. आणि म्हणूनच कीं काय आमचे श्रेष्ठ नेते वक्तृत्वकलेला धार्मिकतेच्या उच्च पातळीवर नेतात. सुरेंद्रनाथांचे याविषयींचे उद्गार फार बोधप्रद ठरतील. ते म्हणतात:

> "वक्तृत्व म्हणजे एका उत्कट भावनेनें भारलेला बुद्धिवाद होय. ही भावना देशाविषयींचें प्रेम असेल किंवा मानवतेचें प्रेम

असेल. आत्म्याच्या प्रकाशांत ही भावना झळाळत असते. अशा वक्तृत्त्वांत अंतःकरण दैवी तेजानें जिव्हेला स्पर्श करतें."

सुरेंद्रांच्या या उद्गारांची बारकाईनें छाननी केली तर उत्तम वक्तृत्त्वाला खरोखर धर्मबुद्धीचीच आवश्यकता असते, असें त्यांना म्हणावयाचें आहे, हें स्पष्ट होतें. मात्र येथें धर्मबुद्धि याचा अर्थ व्यापक असाच घेतला पाहिजे. आपला देश पारतंत्र्यांत आहे आणि त्यामुळें लक्षावधि लोकांना आत्म-विकासाला संधि मिळत नाहीं. आम्हांला जगांत उंच मान करून चालतां येत नाहीं. आमच्या महान् संस्कृतीची परकीय सत्तेच्या जोखडामुळें रूपहानि होत आहे, ही जाणीव सतत बोचत असल्याशिवाय वक्तृत्त्वाला सरसता येणार नाहीं. जें राष्ट्राविषयीं तेंच मानवतेविषयीं. "बुडती हे जन न देखवे डोळां म्हणुनि कळवळा येतो मज" असें जेव्हां होऊन जाईल तेव्हां वक्तृत्त्वांत रस आपोआपच येईल. थोर विचार सहानुभूतीचीं क्षितिजें विस्तृत करतात आणि अशा रीतीनें विशाल झालेली सहानुभूति शब्दांत स्फूर्ति व चैतन्य निर्माण करते. ही सहानुभूति आणि धर्मबुद्धि यांत कुठलाच फरक नाहीं.

## 'वंदे मातरम्'चें संगीत व कारुण्य

परमेश्वर वेगवेगळ्या काळीं निरनिराळे अवतार घेतो, असें मानलें जातें. त्याप्रमाणें धर्मबुद्धिहि युगायुगाचें ठिकाणीं वेगळें रूप धारण करते. कुटुंब किंवा जमात यांची भक्ति हेंच मागें धर्मबुद्धीचें स्वरूप होतें तर तिचेंच रूपांतर पुढें राष्ट्रभक्तींत झालें. सुरेंद्रनाथांच्या काळीं राष्ट्र हाच देव होता आणि त्याची पूजा हीच उपासना होती. आजहि राष्ट्रवादाचा तो अवतार समाप्त झालेला नाहीं. त्याकाळीं तर तो नुकताच जन्माला आला होता. सुरेंद्रनाथ हे त्यावेळीं उदयास येऊं लागलेल्या या युगधर्माचे प्रवक्ते व प्रचारक होते. बाबूजींना एकदां तरुणांनीं त्यांच्या वक्तृत्त्वकलेचें रहस्य सांगण्याची विनंति केली तेव्हां बाबूजी आपल्या उज्ज्वल भाषेंत बोलूं लागले :

२९९८२
२९५२
३-७-६१

> " देवांच्या निःश्वासांनीं सुगंधित झालेल्या पवित्र व उच्च वातावरणांत तुम्हीं राहिलें पाहिजे. ' वंदे मातरम् 'चें संगीत व त्यांतील कारुण्य यांच्याशीं तुमचीं मनें एकजीव झालीं पाहिजेत. "

यांतलें तेजस्वी मार्गदर्शन कधींहि शिळें होणार नाहीं. ' वंदेमातरम् ' च्या गर्जनेनें सारा देश खडबडून जागा झाला आणि हजारों लोकांनीं आपल्या जीवनाचा होम केला. या बलिदानाला उद्देशूनच सुरेंद्रनाथांनीं 'कारुण्य' हा शब्द वापरला आहे. या कारुण्यांतच उत्कट व उदात्त काव्य होतें. या काव्याचा अर्थ कळल्याशिवाय तुमच्या वक्तृत्वाला धार येणार नाहीं, असें सुरेंद्रनाथांना सांगावयाचें होतें. ' वंदेमातरम् ' हें सुरेंद्रनाथांनीं प्रतीक म्हणून वापरलें आहे. त्या त्या युगांतील अत्युच्च अशा कल्पनेशीं म्हणजेच तिच्यांतील करुणोदात्त काव्यरसाशीं एकजीव होणें हीच वक्तृत्वकलेची मुख्य साधना होय. ' हरहर महादेव ', ' वंदेमातरम् ', ' चलेजाव ' इत्यादि विविध काल-खंडांतल्या अशा स्फूर्तिदायक घोषणा आहेत.

## अध्ययन, व्यासंग

मात्र आपल्या युगांतील करुणोदात्त भावनेशीं मन सुसंवादी केलें कीं संपलें असें नाहीं. भावनेला अध्ययनाची जोड पाहिजे. सुरेंद्रनाथांच्या वक्तृत्वाचा पाया विस्तृत व खोल अध्ययनानें भरलेला होता.

> " आपल्या विषयाचें संपूर्ण ज्ञान हें प्रतिपादनाच्या शैलीचें मुख्य सूत्र होय. "

असें सुरेंद्रनाथांनीं म्हटलें आहे. त्यांचें अध्ययन फार खोल होतें. इंग्रजींतील ' शब्दसृष्टीच्या ईश्वरां'च्या कृती त्यांनीं केवळ वाचल्या होत्या असें नव्हे तर त्या जवळजवळ त्यांना मुखोद्गत होत्या. बायबलचें त्यांचें अध्ययन फार सूक्ष्म व खोल होतें. बर्क हा सुरेंद्रनाथांचा अत्यंत आवडता ग्रंथकार होता आणि ' फ्रेंच क्रांती'वरील त्याचे निबंध कलकत्ता विद्यापीठानें जेव्हां अभ्यास-

क्रमांत घेतले तेव्हां त्यांना परमानंद झाला. बर्कची विद्वत्ता, कळकळ, उदार विचारसरणी, भाषाप्रभुत्व यांवर सुरेंद्रनाथ विशेष खूष असत. आपल्या विद्यार्थ्यांना बर्क शिकवितांना ते तल्लीन होऊन जात.

> " माझ्या प्रदीर्घ सार्वजनिक जीवनांत मी एक धडा शिकलों आहें तो हा कीं, आत्यंतिक जहालपणानें देशाचें कधींहि कल्याण होत नाहीं. "

सुरेंद्रांनीं आपल्या जीवनाचें हें जें सार सांगितलेलें आहे, त्यांतहि बर्कचा त्यांच्या जीवनावर झालेला खोल संस्कार स्पष्ट होतो. पण औदार्य व समतोलपणा यांमुळें माणसाच्या बोलण्याचालण्यांत जी सौम्यता येते, ती सुरेंद्रनाथांच्या जीवनांत आली नाहीं .त्यांचें वक्तृत्व गतिमान् होतें. इटलीच्या राष्ट्रवादाचा महर्षि मॅझिनी हाहि सुरेंद्रनाथांचा अत्यंत आवडता ग्रंथकार होय. बर्कनें त्यांच्या वक्तृत्वाला उदारमताच्या मर्यादा घालून दिल्या, तर त्यांच्या भाषणांत मॅझिनीनें ध्येयवादाचें सामर्थ्य भरून दिलें. देशी भाषांचाहि गाढ व्यासंग सुरेन्द्रनाथांनीं केला होता. ' देवाच्या निःश्वासांनीं सुगंधित झालेलें वातावरण ' म्हणजे उत्कृष्ट ग्रंथ होत. पानोपानीं तें स्वर्गीय वातावरण अनुभवास येतें. अशा वातावरणांत सुरेंद्रनाथ सदैव विहार करीत. ते गुरु होते तसेंच आमरण विद्यार्थींहि राहिले. आपल्या ज्ञानाचा भाता त्यांनीं कधींहि रिकामा होऊं दिला नाहीं आणि म्हणूनच हिंदी प्रतिस्पर्धी, गोरी नोकरशाही, परकीय टीकाकार या तिरंगी दळाची आपल्या अप्रतिहत वक्तृत्वानें त्यांनीं धूळधाण उडविली.

## नैतिकता व मनःशुद्धि

भावना आणि अध्ययन यांच्या जोडीला आणखी एक गुण वक्त्याच्या अंगीं असणें अवश्य आहे. मनाचा शुद्धपणा हा तो गुण होय. सुरेंद्रनाथ तर यास फार महत्त्व देतात. वक्तृत्वाची सिद्धि मिळविण्यासाठीं बौद्धिक गुणापेक्षां नैतिकतेची लायकी प्रथम अंगीं आणली पाहिजे, असें त्यांनीं स्पष्टपणें

म्हटलें आहे. टिळक, गांधीजी, जवाहरलाल यांसारखे असामान्य लोकनेते वक्तृत्वाचे इतर ढंग जवळ नसतां, केवळ याच एका लायकीवर हजारों अंतःकरणें आपल्या भाषणांनीं जिंकत, हें आपण पाहिलें नाहीं काय? वक्त्याची भावना शुद्ध पाहिजे. मनाचा आरसा निर्मळ असेल, तरच त्यांत उच्च विचारांचीं किरणें प्रतिबिंबीत होतील आणि तीं परत श्रोत्यांच्या चित्तांत परावर्तित करणें, वक्त्याला शक्य होईल. कुणी छद्मीपणानें किंवा दंभानें बोलेल तर त्याचें सोंग फार वेळ चालणार नाहीं. कारण वक्तृत्व म्हणजे एका अंतःकरणाचें अनेक अंतःकरणांशीं मीलन.

सुरेंद्रनाथांनीं हेंच अधिक खुलासेवार सांगितलें आहे :

> "कार्लाइल म्हणतो, सर्व थोर विचार अंतःकरणांतून जन्म पावतात. अंतःकरणांतून निघून मग ते मेंदूमध्यें उतरतात. श्रोत्याच्या बाबतींत तर हें विशेषच ध्यानांत घेतलें पाहिजे. कारण या ठिकाणीं एक अंतःकरण दुसऱ्या अंतःकरणाशीं सुखसंवाद करीत असतें. तें बोलणारें अंतःकरण श्रोत्यांना आपल्या कक्षांत घेणाऱ्या भावनांचें केंद्र झालेलें असतें."

अर्थात् हें थोर वक्त्याचें वैशिष्ट्च आहे. केवळ शब्दचमत्कृतीची कसरत दाखवून किंवा खोट्या अथवा हीन भावना जागृत करून ज्याला सभेचें नुसतें रंजन करावयाचें आहे, अशा शब्दबंबाळ वक्त्याला हा निकष लावतां येणार नाहीं! परंतु आपलें पूर्वीचें व पुढचें सर्वच बोलणें आदर्श व थोर वक्त्या-बद्दल होणार असल्यानें असल्या शब्दवेताळांना विचारांत घेण्याचें कारणच पडणार नाहीं. असो.

## एकाग्रता

यशस्वी वक्ता होण्यासाठीं मन एकाग्र करण्याची शक्ति असणें अत्यवश्यक आहे, असें सुरेंद्रनाथांनीं म्हटलें आहे. बाबूजींनीं ही शक्ति फार मोठ्या प्रमाणांत अंगीं आणली होती, असें दिसून येतें. पुण्याच्या राष्ट्रीय सभेचें

अध्यक्षपद जेव्हां त्यांच्याकडे आले तेव्हां प्रथम ते गांगरूनच गेले. दादाभाई, रानडे, मेथा, वाच्छा इत्यादि टोलेजंग मंडळी पुण्या-मुंबईकडील माणसांना परिचित होती. त्यांत आपली 'वामनमूर्ति' हास्यास्पद दिसेल, असें पाहिल्यानें सुरेंद्रांना भय वाटलें. परंतु आपलें अध्यक्षीय भाषण सर्वांगसुंदर करण्याचा त्यांनीं चंग बांधला. दररोज २॥-३ तास ते स्वतःला एकांतांत कोंडून घेत आणि भाषण तयार करण्यासाठीं मन एकाग्र करीत. पुणें कॉंग्रेसला हें भाषण तयार करून बाबूजी जेव्हां जायला निघाले तेव्हां वाटेंत आपले जामात कर्नल मुकर्जी यांच्याकडे ते उतरले. जामातांना त्यांनीं आपलें भाषण वाचून दाखविलें तेव्हां कर्नल साहेब विस्मित होऊन म्हणाले, "हें भाषण जवळ जवळ वीस वर्षें आपण तयार करीत होतां असें वाटतें!" यावरून आपल्या साऱ्या शक्ति बाबूजींनीं या भाषणाची चिरेबंदी इमारत बांधण्यास कशा खर्च केल्या होत्या, तें लक्षांत येईल.

एकाग्रतेची शक्ति ही माणसांचे अंगीं मुळांत असते, असें म्हणण्यापेक्षां ती अभ्यासानें अंगीं आणतां येते व हवी तेवढी वाढवितां येते, असें म्हणणें युक्त होईल. सुरेंद्रनाथांनीं प्रथमपासून शिस्तीनें या शक्तीची जोपासना केली. पुढें पुढें त्यांचें मन हव्या त्या परिस्थितींत एकाग्र होई. महाराणी व्हिक्टोरिया यांच्या निधनाबद्दल शोकसभा होती आणि ऐनवेळीं सुरेंद्रांना व्हाइसरॉयसाहेबांचा निरोप आला कीं, 'आज आपण या शोकसभेंत बोललेंच पाहिजे.' सुरेंद्रनाथ लगेच भाषण तयार करावयास बसले. भोंवतीं नातवंडें खेळत-बागडत होतीं, कुणी मध्येंच आजोबांच्या मांडीवर येऊन बसे, कुणी कांहीं प्रश्न विचारी, पण दीड तासांत याहि वातावरणांत सुरेंद्रांनीं आपलें भाषण तयार केलें. त्यांच्या अत्युत्कृष्ट भाषणांपैकीं हें एक ठरलें.

## शैली

या एकाग्रतेमुळेंच एकदां तयार केलेलें भाषण सुरेंद्रनाथ छापील प्रती-कडे न पाहतां मुखोद्गत म्हणून दाखवीत. पुणें व अहमदाबाद येथील

कॉंग्रेस अधिवेशनांचीं अध्यक्षीय भाषणें २॥-३ तासांचीं होतीं. परंतु क्वचित् मुद्यांचें टांचण चाळण्यापलीकडे सुरेंद्रांनीं कागदाकडे लक्ष दिलें नाहीं. त्यांचा वाक्प्रवाह अखंड सुरू होता. सुप्रसिद्ध लॉर्ड बेकन्च्या वक्तृत्त्वाचें वर्णन त्याच्या एका समकालीन लेखकानें केलें आहे.

> " त्याचें भाषण मोठें प्रौढ असे. ज्यावेळीं तो विनोद करी त्याखेरीज करून त्याचें भाषण नेहमीं अतिशय गंभीरतेचें असें. त्याच्यासारखा बेताबातानें, युक्तीस धरून व अर्थगांभीर्यानें बोलणारा माझ्या पहाण्यांत दुसरा कोणी आला नाहीं. त्याच्या बोलण्यांत वायफळ असा एक शब्द किंवा एक अक्षरहि नसे. त्या त्या शब्दास त्याचीच अशी कांहींना कांहीं खुबी असावयाचीच. त्याच्या श्रोत्यांतून एकाद्यानें जर क्षणभर एकीकडे पाहिलें किंवा कोणाला खोकला आला, तर तितक्यांतहि कांहीं गहन अर्थाचे शब्द निघून जाऊन त्यांची त्यास हळहळ वाटावी. तो बोलावयला उठला कीं सर्वांनीं स्तब्ध होऊन त्याच्या बोलण्याकडे एकाग्र चित्त द्यावें. न्यायाधिशाचे ( बेकनचे ) रागद्वेष केवळ त्याच्या स्वाधीन असत. साऱ्या मनोवृत्ति वक्त्याच्या जशा काय मुठींत होत्या. साऱ्या श्रोत्यांना असा धाक वाटे कीं हा इतक्यांतच आटोपतो कीं काय ! "
>
> [ ' निबंधमाला ' ( वक्तृत्त्व ) ]

अगदीं हेंच वर्णन सुरेंद्रनाथांच्या वक्तृत्त्वाला तंतोतंत लावितां येईल.

तयार केलेलें भाषण जसेंच्या तसें म्हणून दाखविण्यास तीव्र स्मृतीचा मुख्यतः उपयोग होतो, हें खरें आहे. पण स्मृतीलाहि उत्तम शैलीचें साह्य होतें. भाषण विस्कळीत असेल, त्यांत निरनिराळ्या मुद्यांची वीण बेमालूम केलेली नसेल तर सामर्थ्यवान् स्मरणशक्तिहि लुळी पडेल. हेंच विशद करतांना उत्कृष्ट शैलीचे गुणहि सुरेंद्रनाथांनीं थोडक्यांत सांगून टाकिले आहेत.

" खरोखर तयार केलेलें भाषण कसें आठवत जातें, हें रहस्य वक्त्यालाहि अज्ञातच असतें. पण एवढें सांगतां येईल कीं, वाक्यांची रचना व व्यवस्था यांवर बरेंच अवलंबून आहे. वाक्यांची रचना सहजतापूर्ण, तर्कशुद्ध व सुसंवादी असेल तर ती स्मरणशक्तीला मोठी मदतच होते. वाक्यें लयबद्ध असल्यास त्यांचा ठसा मनावर उमटतो आणि स्मृतीला साह्य होतें. "

सुईमागून दोरा जातो, त्याप्रमाणें शब्दांचा उच्चार झाला कीं, श्रोत्यांच्या मनावर अर्थ ठसत गेला पाहिजे. वाक्याची लयबद्ध रचना नुसती मनांत किंवा कागदावर होऊन उपयोगी नाहीं. शब्दोच्चार स्पष्ट व आरोह-अवरोह भावना-कल्पनांच्या वजनास अनुसरून असतील, तरच वक्त्याचें भाषण श्रोत्यांच्या अंतःकरणाची पकड घेते. सुरेंद्रनाथ या सर्व गुणांत केवळ अजोड होते, असें म्हटलें तरी चालेल.

## विधायक वृत्तीचा प्रभाव

सुरेंद्रनाथ हाडाचे उदारमतवादी होते, हें त्यांच्या वक्तृत्वाचें मुख्य सामर्थ्य म्हणावें लागेल. अर्थात् उदारमतवादानें क्वचित् येणारा श्रद्धेचा अव्यवस्थितपणा त्यांचे ठिकाणीं नव्हता. आपला देश खरोखर, सुवर्णभूमि आहे, या देशाची प्राचीन परंपरा श्रेष्ठ आहे आणि याला उज्ज्वल भविष्यकाळ आहे, या गोष्टीवर त्यांची अत्यंत निष्ठा होती. पण त्याबरोबर पाश्चात्यांचें शिष्यत्व पत्करून आपण आधुनिक ज्ञान-विज्ञान शिकलें पाहिजे, ही आधुनिक दृष्टीहि त्यांना होती. भारताचा भाग्योदय व्हावा याच दृष्टीनें परमेश्वरानें इंग्रजांचा भारताशीं संबंध जुळविला, ही रानड्यांप्रमाणें त्यांचीहि श्रद्धा असे. पण ह्या ' दैवी योगायोगा 'चा भारतानें पुरेपूर फायदा घ्यावा आणि आपली उन्नति करून घ्यावी, असेंच रानडे-सुरेंद्र ह्यांचें म्हणणें होतें. इंग्रजांच्या छत्राखालीं भारतानें यावच्चंद्रदिवाकरौ परतंत्र होऊन खितपत पडावें, असें रानडे-सुरेंद्रांनीं कधींहि म्हटलें नाहीं. दुर्दैवानें कांहीं शब्दशूर

जहालांनीं या नेमस्त देशभक्तांवर असा आरोप करून त्यांना निष्प्रभ करून टाकण्याचा प्रयत्न केला आहे ! असो.

स्वदेशाविषयीं उत्कट भक्ति आणि परकीयांविषयीं अत्यंत आदर हे दोन सुरेंद्रनाथांच्या प्रतिपादनाचे स्थायीभाव होत. यांचाच पगडा स्वदेशी आणि परदेशी श्रोत्यांवर मुख्यतः पडला. आपला देश स्वराज्यास लायक आहे आणि जे भारताला स्वराज्याचे हक्क नाकारीत आहेत, ते जुलमी व अन्यायी आहेत, हें सांगण्यास ते कधींच कचरले नाहींत. लंडनमधील एका गाजलेल्या सभेंत त्यांनीं स्पष्ट सांगितलें कीं, " स्वराज्याचा वापर करावयास देणें, हेंच स्वराज्याचें खरें शिक्षण होय. " आत्मविश्वास हा प्रभावी वक्तृत्वाचा जो एक गुण तो त्यांच्या रोमरोमांत भिनला होता. लंडनमध्यें एकदां सुरेंद्रनाथांची ओळख करून देतांना अध्यक्षांनीं ' आधुनिक भारताच्या असंतोषाचे जनक ' असें त्याचें वर्णन केलें. त्या वर्णनाला संमति देऊन आपल्या भाषणांत सुरेंद्रनाथ म्हणाले:

> " असंतोष म्हणजे सामुदायिक जागृति आणि जागृत विवेकबुद्धि. मानवतेच्या कल्याणासाठीं जे झटतात, त्यांच्याविषयीं तरुणांना आपुलकी वाटते व त्यांचा आदेश तरुणांना ध्यावासा वाटतो. मला सानंद अभिमान वाटतो कीं माझ्या शिकवणीचा बंगालच्या मनावर फार परिणाम झाला."

मात्र सुरेंद्रनाथांच्या भाषणांत आत्मविश्वासाचा जोम असला तरी आत्मप्रौढीचा दर्प कधीं नसे. ज्याचें श्रेय त्याला देण्यांत ते कधीं कुचराई करीत नसत. इंग्रजांना उद्देशून ते एकदां म्हणाले,

> " व्यक्तिस्वातंत्र्याच्या हक्कांनीं तुमचें सारें वाङ्मय, इतिहास, आणि काव्य बहरलेलें आहे. ( ऐका, ऐका. ) इंग्रजी इतिहासाचीं तेजस्वी पानें वाचतांना व्यक्ति स्वातंत्र्याच्या प्रेमानें भारून जाणार नाहीं, असा मनुष्य विरळा ! पण आम्हांला मात्र तें व्यक्तिस्वातंत्र्य उपभोगण्याचा हक्क नाकारण्यांत येतो !"

अशा तऱ्हेनें इंग्रजी जनतेला ते आवाहन करीत. निर्भत्सना करण्याऐवजी विधायक टीकेचा कौल लावून श्रोत्यांना जिंकण्यांत सुरेंद्रनाथ कुशल होते.

पण केवळ आपल्या देशाची बाजू मांडणें किंवा भावनेच्या उर्मि उठविणें हें एकच सुरेंद्रांच्या वक्तृत्त्वाचें कार्य होतें असें नाहीं. कित्येकदां महत्त्वाच्या विषयाचें निरूपण बाबूजी मोठ्या कौशल्यानें करीत. लंडनमधील बादशाही पत्रपरिषदेंत वृत्तपत्रावर त्यांनीं केलेलें चिरस्मरणीय भाषण त्यांच्या मनोरंजक पण उद्बोधक वक्तृत्वाचा नमुना म्हणून देण्यासारखें आहे.

> "आपण आज वाङ्मय आणि पत्रपांडित्य यांचे संबंध कोणते याची चर्चा करण्यासाठीं जमलों आहोंत. पत्रकाराची व्याख्या काय? ती करणें कठीण आहे. वाङ्मय म्हणजे तरी काय? शक्ति, सामर्थ्य, प्रतीक कीं स्पष्टीकरण?......"

असा सुंदर प्रस्ताव करून बाबूजींनीं आपल्या विषयांत लोकांना तन्मय करून सोडलें. मधूनमधून ते प्रश्न करीत. सुरेंद्रनाथांची वक्तृत्त्वाची पद्धति कित्येकदां अशी असे कीं, आपल्या मनाचें कपाट ते लोकांपुढें खुलें करीत आहेत आणि मनांत उत्पन्न होणारे संशय व त्यांचें निरसन यांचें ज्ञान श्रोत्यांना करून देत आहेत, असें वाटे. यावेळीं सुरेंद्रनाथ आणि श्रोते यांच्यांतलें भिन्नत्त्व नाहींसें होई. श्रोतेहि मनानें सुरेंद्रनाथांबरोबर विचार करूं लागत आणि त्या विचाराच्या ओघांत सुरेंद्रांच्याच निर्णयाला पोंचत. वक्तृत्त्वाचें श्रेष्ठ यश याहून दुसरें कोणतें असणार?

> "व्यासपीठावर बोलणाऱ्या वक्त्याबद्दल तीन प्रश्न विचारले जातात. एक, "कोण बोलतो आहे?" दुसरा, "कसा बोलतो आहे?" आणि तिसरा प्रश्न, "काय बोलतो आहे?" आणि असें म्हणतात कीं, अखेर 'काय बोलतो आहे?' हा प्रश्न या तीनमध्यें मागेंच पडतो. (हंशा)"

असे चतुरालापहि बाबूजींच्या भाषणांत येत, नाहीं असें नाहीं. परंतु असल्या खेळकर पातळीवर उतरण्याचा त्यांचा स्वभावधर्म नव्हता. नेहमीं उदात्त

वातावरणांत रंगून जायचें व श्रोत्यांनाहि घेऊन जायचें हेंच बानूर्जींच्या वक्तृत्त्वाचें उद्दिष्ट असे.

आधुनिक भारताच्या पंच पंच उषःकालीं उठून स्वातंत्र्यदेवीच्या स्फूर्तिदायक भूपाळ्या ज्यांनीं म्हटल्या त्यांत सुरेंद्रनाथ प्रमुख होत. याच भूपाळ्यांनीं अनेक शतकें घोरत पडलेली हिंदी जनता झोपेंतून जागी होऊन आळोखे पिळोखे देऊं लागली. आणि पुढें टिळक-गांधींना तिला नीट उठवून कार्यप्रवृत्त करणें सोपें झालें. आपलीं मनें पाश्चात्य वाङ्मयांत खोल गेलीं आहेत, असें त्यांनीं अहमदाबाद येथील काँग्रेसच्या अध्यक्षीय भाषणांत म्हटलें. परंतु आपल्या देशाच्या प्राचीन इतिहासांतील उच्च मूल्यें व उदात्त भावना यांमध्यें आपलें अंतःकरण विहरत असलें पाहिजे, हेंहि त्यांनीं आग्रहानें सांगितलें. ते तत्त्वनिष्ठ नेमस्त होते. सुप्रसिद्ध मजूर नेते केर हार्डी यांनीं सुरेंद्रनाथांचें व्यक्तित्त्व त्यांच्या लौकिकापेक्षांहि मोठें आहे, असा अभिप्राय दिला आहे. " असामान्य पाश्चात्य वक्त्यांप्रमाणें सुरेंद्रनाथ जो विषय हातीं घेत, त्यांत ते विरघळून जात. " असें एक युरोपियन् गृहस्थ म्हणतात. बानूर्जींच्या वक्तृत्त्वाचें सामर्थ्य व सौंदर्य यांतूनच उत्पन्न झालें आहे. वक्तृत्त्वांत धग येण्यास वक्तृत्त्वकलेइतकेंच वक्त्याचें दांडगें व्यक्तिमत्त्वहि कारण होतें. या सिद्धांताचा परमोच्च आदर्श देशभक्त सुरेंद्रनाथ बानर्जींहून दुसरा कोणता असेल ?

## अभ्यासाच्या वाटा

१. सुरेंद्रनाथांना सरकारी नोकरी कां सोडावी लागली ? त्यानंतर त्यांनीं कोणत्या क्षेत्रांत प्रवेश केला ?

२. सुरेंद्रनाथांच्या काँग्रेसमधील कार्याची माहिती द्या.

३. सुरेंद्रनाथांचा खासगी जीवनक्रम कसा असे ?

४. ' लोकशाहींत वक्तृत्त्वाला फार महत्त्व आहे. ' विवेचन करा.

५. सुरेंद्रनाथांच्या मताप्रमाणें वक्तृत्व कोणत्या आधारावर वाढतें ? कोणत्या गोष्टींची वक्तृत्त्वाला अत्यंत आवश्यकता असते ?

६. बंगाल प्रांताचें वैशिष्ट्य म्हणून तुम्ही काय सांगाल ?

## गोपाळ कृष्ण गोखले : : : २

" देशाच्या चिंतनांत दिवस घालवा आणि रात्रीं देशाच्या उन्नतीचीं स्वप्नें पहा." असा उपदेश करणारे देशभक्त गोपाळ कृष्ण गोखले स्वतः प्रतिक्षणीं तेंच आचरण करीत. त्यांनीं आपल्या सर्व बौद्धिक शक्ति वाढविल्या, त्या देशाच्या उपयोगीं आपणांस अधिकांत अधिक पडतां येईल, या हेतूनेंच. राजकारणांत छक्कीपणा त्यांना नको होता. सत्य आणि सौजन्य यांना फांटा देऊन राजकारणाचे डाव खेळणें, त्यांना मंजूर



नव्हतें. गोखले तळमळीचे देशभक्त होते आणि सौजन्यानें त्यांच्या भावनेला मर्यादा व तेज आलेलें दिसे. त्यांच्या वक्तृत्त्वाचे सर्व यश याच सर्व गोष्टींत आहे. गोखल्यांच्या वक्तृत्त्वाविषयीं साहित्यसम्राट् कै. तात्यासाहेब केळकर यांनीं फार समर्पक वर्णन केलें आहें. तें वाचलें म्हणजे कळकळ, अभ्यास, आणि ज्ञान यांच्या जोरावर साधें वक्तृत्वहि कसें मनोहर होतें, हें दिसून येईल. तात्यासाहेब लिहितात—

" त्यांची वाणी मृदु, मोहक असल्यामुळें आणि त्यांच्या बोलण्यांत सच्चेपणा व कळकळ ही मूर्तिमंत प्रकट होत असल्यानें त्यांची छाप तज्ञ, निष्णात अशा अनुभविक व हुशार अधिकाऱ्यांवरहि पडे. त्यांच्या भाषणांचे

मुख्य गुण, म्हटले म्हणजे भाषण लहान असो मोठें असो, त्यांत प्रमेय व अनुमान हीं एकाद्या सुंदर इमारतीप्रमाणें प्रमाणबद्ध असत. आधार व आंकडे पाहून, पारखून घेतलेले असावयाचे. प्रत्येक वाक्यागणिक उद्दिष्टांचें पाऊल पुढें पडत असावयाचें आणि या सर्वांवर प्रांजलपणा व मृदुलपणा हीं बारीक हातानें पसरलेलीं असावयाचीं···वक्तृत्त्वाची जी ठरीव कल्पना आहे, त्या दृष्टीनें गोखल्यांना कदाचित् वक्ते म्हणतां येणार नाहीं; पण मन वळविणें किंवा दुसऱ्यांना आपलेसें करणें, हा जो वक्तृत्त्वाचा हेतु व परिणाम तो सिद्ध करण्यास इतर नामांकित वक्त्यांपेक्षांहि गोखल्यांचा हातखंडा असे. याचें कारण एकच कीं, त्यांत प्रसाद, प्रांजलपणा, बुद्धिमत्ता व कळकळ हीं खेंचून भरलेलीं असत. यांतच त्यांचा वर्ण व बाह्यरूप यांची भर पडे. त्याहिपेक्षां खरा गुण म्हटला म्हणजे त्यांच्या भाषणांत ज्यांना एकदां गुरुजन किंवा नेते त्यांनीं मानले, त्यांच्याविषयींच काय, पण समोरच्या प्रेक्षकांविषयींहि त्यांची विनयबुद्धि प्रकट होई. त्यांच्या भाषणांत आवेश असला तरी अपशब्द नसे, आणि मर्मज्ञपणा असला तरी कुचाळी नसे." गोखल्यांच्या सभापांडित्याचें यथातथ्य वर्णन देतांना केळकरांनीं उत्तम वक्तृत्त्वाचें तंत्रहि सुबोध रीतीनें सांगून टाकिलें नाहीं काय?

## जन्म आणि शिक्षण

रत्नागिरी जिल्ह्यानें भारताला अनेक नररत्नें दिलीं. त्यांपैकींच गोपाळ कृष्ण गोखले हे होत. गोखले घराण्याचें वेळणेश्वर हें गांव रत्नागिरी जिल्ह्यांत चिपळूणनजीक आहे. याच कोंकणांत इ.स. ९ मे १८६६ रोजीं गोपाळरावांचा जन्म कोतळूक या आपल्या आजोळगांवीं झाला. घरची गरिबी होती. वडील कृष्णराव कागलला कारकून होते. तेथेंच गोपाळरावांचें मराठी शिक्षण झालें. पुढें इंग्रजी शिक्षणासाठीं ते कोल्हापूरास आले. शिक्षणाच्या ऐन मध्यावरच गोपाळरावांचे वडील निवर्तले! पण वडील बंधु गोविंदराव यांनीं स्वतःच्या शिक्षणास स्वार्थत्यागपूर्वक रामराम ठोकून गोपाळचें शिक्षण पुरें

करण्याचा थोरपणा दाखविला. गोपाळराव पंधराव्या वर्षी मॅट्रिक झाले. पुढें पुणें, कोल्हापूर, मुंबई अशीं त्रिस्थळीं यात्रा करून त्यांना महाविद्यालयीन शिक्षण पुरें करावें लागलें. इ. स. १८८४ मध्यें वयाच्या अठराव्या वर्षींच ते बी. ए. पास झाले. पुढें त्यांनीं वकिलीचाहि अभ्यास केला.

## सुखाचा राजमार्ग सोडला !

इतक्या लहान वयांत विद्यासंपन्न झालेल्या गोपाळरावांना ऐहिक वैभवाचा राजमार्ग अगदीं खुला होता. मोठें अधिकाराचें पद मिळून त्यांना सत्ता-संपत्तीच्या शिखरावर चढून गाद्यागिरद्यांवर लोळत राहतां येणें अगदीं शक्य होतें. पण तो मोह त्यांनीं टाळला हाच त्यांचा मोठेपणा. गोपाळराव अलौकिक बुद्धीचे नव्हते. बुद्धि दुय्यम दर्जाची, पण कळकळ भरपूर आणि मोठ्या ध्येयाविषयीं जिव्हाळा अनिवार. या सुमारास शास्त्रीबुवांच्या ' निबंध-माले'नें तरुणांच्या मनांत स्वदेशाभिमानाची ज्योत पेटविली होती. न्याय-मूर्ति रानडे यांचें विशाल व्यक्तित्व जीवनाच्या अनेक महत्त्वाच्या शाखांत नवभारताला स्फूर्ति देत होतें. टिळक-आगरकर हे तेजस्वी तरुण याच वेळीं चमकूं लागले. सार्वजनिक कार्यास या तरुणांनीं धडाडीनें सुरुवात केली आणि वयाच्या ऐन पंचविशींत एकशें एक दिवसांचा देहदंड हंसत मुखानें पत्करला. या सर्व गोष्टींचा परिणाम यौवनाच्या उंबरठ्यावर येऊन ठेपलेल्या ध्येयनिष्ठ गोपाळरावांच्या मनावर झाल्याशिवाय राहिला नाहीं. ' निर्वाहापुरतें अन्न आच्छादन ' घेऊन देशसेवा करण्याचा त्यांनीं संकल्प केला आणि तो अखेरपर्यंत पार पाडला.

## नैतिक गुण बुद्धीपेक्षां अधिक तेजस्वी

विद्यार्थिदशेंत सांगण्यासारखें कांहीं घडलें नाहीं. घरची गरीबी असली तरी गोपाळराव अत्यंत स्वाभिमानी होते. ते मन लावून अभ्यास करीत. आपले बंधु आपल्यासाठीं त्याग करतात, ही जाणीव गोपाळरावांना होती.

दररोज दहीं घेण्याचें खानावळींत ठरविलें, पण हा जादा खर्च जेवणाचे खाडे करून त्यांनीं भरून काढला. एका मित्रानें भरीस घातल्यामुळें नाटकाच्या तिकिटास त्यांना एकदां आठ आणे द्यावे लागले. पुढें महिनाभर रात्रीं बत्ती बंद करून महिन्यांत आठ आण्यांची बचत केली. एवढा काळ नगरपालिकेच्या कंदिलावर ते अभ्यास करीत ! साध्याच गोष्टी आहेत या. पण त्यावरून गोपाळरावांची कळकळ व कर्तव्यदक्षता दिसून येते. सत्याची चाड हाहि त्यांचा गुण लहानपणापासून प्रकट झालेला दिसतो. एकदां मुलांनीं घरून गणितें करून नेलीं आणि वर्गांत गोपाळरावांचेंच तेवढें बरोबर आलें. शिक्षकांनीं गोपाळची प्रशंसा सुरू करतांच त्याला रडें कोसळलें. ' मी तें स्वतः सोडविलें नाहीं, दुसऱ्याचें पाहून केलें ' असें रडतरडत गोपाळ सांगूं लागला. ही ऋजुता किती मोलाची आहे ! याच सत्यप्रीतीमुळें गोपाळरावांचें राजकारणहि सरळ व नेमस्तपणाचें झालें. ' राजकारण अध्यात्ममय झालें पाहिजे ' म्हणजे पाचपेंचाऐवजीं त्याला सत्याचा आधार घेतला पाहिजे, हें गोखल्यांनीं पुढें जन्मभर उपदेशिलें. त्याचा उगम बाल्यांतील त्यांच्या वरील ऋजुतेंत दिसून येतो.

## अध्यापनकाल

आगरकरांचा त्याग व सरळपणा गोखल्यांना विमोहित करी. त्यांच्याच प्रेरणेनें ते डेक्कन एज्युकेशन सोसायटीचे सभासद् होऊन सोसायटीच्या शिक्षणसंस्थांत शिकवूं लागले. मनःपूर्वकता हा गोपाळरावांचा स्वभावधर्मच होता. दुपारीं वर्गांत शिकविण्याकरितां सकाळीं तीन तास ते तयारींत घालवीत. मुलांना गलबताचें स्वरूप यथार्थ समजावून देतां यावें यासाठीं गोपाळराव मुंबईला जाऊन गलबत प्रत्यक्ष पाहून आले ! वृत्तपत्रांत ते लेख लिहीत. पाठांतरावर त्यांचा विशेष भर असे. महाविद्यालयांत असतां 'फ्रेंच राज्यक्रांती'वरील बर्कचा उत्कृष्ट ग्रंथ त्यांचे हातीं आला. सुरेंद्रनाथांप्रमाणें बर्कनें गोखल्यांनाहि भुरळ पाडली. वक्तृत्व आणि उदारमतवाद ह्या दोन देणग्या बर्क-वाङ्मयानें गोखल्यांना दिल्या.

पब्लिक सर्व्हिसच्या परीक्षेला बसणाऱ्या मुलांकरितां गोखले वर्ग चालवीत. इ. स. १८८६-८७ सालीं शाळांतील मुलांना उपयोगीं पडावें म्हणून त्यांनीं एक अंकगणिताचें पुस्तक लिहिलें. टिळक हे श्रेष्ठ दर्जाचे गणिती. त्यांनीं तें वाचून पसंत केलें आणि छापण्यास गोखल्यांना उत्तेजन दिलें. ह्या पुस्तकाचा कल्पनेबाहेर प्रचार झाला. या पुस्तकाबद्दल गोखल्यांना प्रकाशक मॅकमिलन् कंपनीकडून दरमहा १२५ रु. आमरण मिळत होते! पुढें फर्ग्युसन् महाविद्यालय निघालें आणि संचालक मंडळींत बरेच मतभेद झाले. टिळक बाहेर पडले. कालांतरानें आगरकर अकालींच मृत्युमुखीं पडले! पण गोपाळरावांनीं धीर खचूं न देतां फर्ग्युसन् महाविद्यालयाचें काळजीनें संगोपन-संवर्धन केलें. या संस्थेवर त्यांचें विलक्षण प्रेम होतें. पुढें राजकीय जीवनाचा व्याप विलक्षण वाढल्यानंतर या संस्थेंतून ते सेवानिवृत्त झाले. त्यांना सत्कार-पूर्वक सर्वांनीं निरोप दिला. तेव्हां गोपाळरावांनीं केलेलें आभाराचें भाषण अत्यंत हृदयस्पर्शी आहे.

"या संस्थेंत मला स्थैर्य लाभलें आणि ज्यांच्याशीं सहकार्य करण्यांत आनंद आणि सद्‌भाग्य आहे असे मातबर सहकारी मला मिळाले. या सहकाऱ्यांनीं औदार्यानें माझ्या दोषांकडे कानाडोळा करून माझ्या अल्पस्वल्प सेवेचें प्रमाणाबाहेर कौतुक केलें. हें सर्व आठवून मन गहिंवरून येतें. पण आतां हें सर्व सोडून राजकारणाच्या अनिश्चित व वादळी सागरांत मला तारूं लोटावें लागत आहे. पण मला माझा आंतला आवाज हा मार्ग पत्करण्यास सांगत आहे आणि विश्वास ठेवा, देशाच्या हितासाठींच अधिक स्वतंत्र्यतेचो पण तितकीच जबाबदारीची ही नवी भूमिका मी पत्करीत आहें. या देशांतील सार्वजनिक जीवनांत पारितोषिकें मिळण्याचा संभव कमी आणि कसोटीचे प्रसंग व निरुत्साही करणारे क्षण पुष्कळ. कार्याचा विस्तार अफाट, पण शेवट काय होईल याची कल्पना नाहीं. पण एक गोष्ट निश्चित. माझ्यासारखी ज्या कोणाला या कार्याची

गोडी लागेल त्यांना यांत आशा व श्रद्धा वाटेल आणि निःस्वार्थ-पूर्वक केलेल्या प्रयत्नामुळें मिळणारें समाधान ते खचित मिळवितील."

## "घेतली एकदां अतां उडी"

न्यायमूर्ति रानड्यांचे हाताखालीं गोखल्यांनीं राजकारणाचे प्राथमिक धडे घेतले. सार्वजनिक सभेच्या त्रैमासिकाकरितां गोखले लेख लिहीत. प्रथम ते रानड्यांना दाखवीत. गोपाळरावांची भाषाशैली प्रथम फार बोजड होती. पहिला लेख प्रसिद्ध होण्यापूर्वी त्यांचे कितीतरी लेख न्यायमूर्तींनीं नापसंत केले होते. पण गोखल्यांनीं गुरूचा शब्द मानला आणि आपल्या लेखनांत दुरुस्ती करण्याविषयीं कधीं कंटाळा केला नाहीं. आज दोनचार फुटकळ लेखांचे तुरे लावून कलावंत म्हणून मिरविणाऱ्यांच्या तुलनेनें हें गोखल्यांचें उदाहरण केवढें उज्ज्वल दिसतें पहा! इतिहास, अर्थशास्त्र, अंदाजपत्रकें यांचा कसून अभ्यास रानड्यांनीं गोखल्यांकडून करून घेतला. सर्वज्ञ गुरु आणि अभ्यासू शिष्य. 'समसमां संयोग कीं जाहला.' रानड्यांच्या प्रेरणेवरूनच इ. स. १८९० च्या राष्ट्रीय सभेंत गोखल्यांनीं चटकदार व मुद्देसूद भाषण केलें. पुढें बेळगांव येथें आठवी प्रांतिक परिषद भरली असतां सर फेरोजशहा मेथांच्या अभिनंदनपर गोखल्यांनीं केलेलें भाषण अतिशय सुंदर वठलें. या व अशा भाषणांनीं भारताच्या क्षितिजावर एका तेजस्वी व नयनमनोहर ताऱ्याचा उदय होत आहे हें सर्वांना कळून आलें. इ. स. १८९६ मध्यें वेल्बी कमिशनपुढें साक्ष देण्यास गोपाळराव विलायतेस गेले. त्यांनीं अजून तिशी ओलांडली नव्हती; पण इतक्या लहान वयांत आपल्या मातृभूमीची बाजू त्यांनीं इतकी साधार, सावेश व वक्तृत्वपूर्ण रीतीनें परदेशापुढें मांडली कीं, सर्वत्र त्यांचें नांव दुमदुमूं लागलें.

## चढती कमान

यानंतर गोखल्यांच्या यशाची कमान चढतच गेली. इ. स. १९०० सालीं प्रांतिक कौन्सिलांत ते गेले आणि पुढें इ.स. १९०२ सालीं व्हायसरॉयच्या वरिष्ठ

कौन्सिलांत फेरोजशहांनीं आपली जागा त्यांच्यासाठीं रिकामी करून दिली. दोन्ही कौन्सिलांत आपल्या विद्वत्तेची व साक्षेपीपणाची चमक गोपाळरावांनीं सतत दाखविली. लोकहिताच्या दृष्टीनें सरकारी कामकाजांतली प्रत्येक बाब ते तपासून पहात. त्यांचीं अंदाज पत्रकांवरलीं भाषणें म्हणजे भारताच्या तत्कालीन स्थितीची उत्कृष्ट चिकित्साच होय. कर्झनसारख्या हुकूमशहालासुद्धां गोखल्यांच्या भरीव विवेचनाची भीड पडे. एरव्हीं कौन्सिलांतील कामाकाजाकडे ढुंकूनहि न पाहणारीं माणसें कलकत्त्यास गोखल्यांचें भाषण असलें कीं तिकिटें काढून सभागृह व्यापून टाकीत असें नामदार शास्त्र्यांनीं म्हटलें आहे. गोखले म्हणजे चालतें बोलतें अर्थशास्त्र; गोखले म्हणजे देशहिताची जिवंत कळकळ. तीमुळेंच लोक आकृष्ट होत.

## १९०५ महत्त्वपूर्ण संवत्सर

कर्झनसाहेबांनीं बंगालची फाळणी केल्यामुळें लोकमत फारच प्रक्षुब्ध झालें होतें. बंगालनें आपल्या मानहानीविरुद्ध चालविलेली चळवळ भारतांत सर्वत्र पसरूं लागली. बंगालचें दुखणें तेंच सर्व भारताचें दुखणें अशी भावना बळावली. गोखले यांनीं विलायतचा दौरा करून ही सर्व परिस्थिति तेथील जबाबदार इंग्रजांच्या कानावर घातली. याच वर्षीं त्यांनीं ‘ भारत सेवक समाज ’ स्थापन केला. देशासाठीं सर्व जीवन समर्पण करावयाचें, संपत्तीचा संचय करावयाचा नाहीं, अशी शपथ घ्यायची हा विधि सदस्य होणारास करावा लागे. सध्यां पुणें येथें समाजाची जी डौलदार व प्रशांत इमारत आहे, तिच्या जवळील टेकडीवरच, गोखल्यांनीं एका मंगल क्षणीं आपल्या चारपांच निवडक सहकाऱ्यांसह ही शपथ घेतली. जगत्कल्याणार्थ झटणारे ऋषि, ‘ बहुजन–हिताय, बहुजन–सुखाय ’ हिंडणारे बौद्ध भिक्षु, आसेतुहिमाचल चळवळीचें सामर्थ्य निर्माण करणारे रामदासी महंत, मिशनरी इत्यादि लोकसेवकांची उदात्त परंपरा आधुनिक सुशिक्षितांनीं चालवावी, अशी गोखल्यांना तळमळ वाटे. याचसाठीं भारत-सेवक-समाजाचा पाया त्यांनीं घातला.

याच वर्षी बनारस येथें भरलेल्या काँग्रेसचे अध्यक्ष त्यांना निवडण्यांत आलें. ही निवड सर्वांनाच पसंत पडली. बनारस शहरानें तर सम्राटाप्रमाणें त्यांचें स्वागत केलें. या काँग्रेसच्या अध्यक्षीय भाषणांत कर्झनची औरंगजेबाशीं तुलना करून गोखल्यांनीं आपल्या अंगचा सर्व जहालपणा व्यक्त केला. भारताचें ध्येय वसाहतीचें स्वराज्य असावें हें त्यांनीं प्रतिपादन केलें आणि करबंदीची चळवळसुद्धां सनदशीर साधनांत पडते असें ठासून सांगितलें. भारताच्या भवितव्याबद्दल प्रतिक्षणीं त्यांना वाटणारी कळकळ या त्यांच्या भाषणांत ओतप्रोत भरलेली आहे.

> "आपल्या स्वराज्यविषयक लक्ष्यांचें नैतिक रहस्य सध्यांच्या संस्था-जीवनांत नवी व्यवस्था व्हावी यांत इतकेंसें नाहीं, ती गोष्ट आपण घडवून आणूं शकूं. परंतु या लक्ष्यामुळें येणारें सामर्थ्य आपल्या जीवनांत आपणांस कायमचें लाभणार आहे, हा खरा फायदा होय. राजकारणापेक्षां एकंदर जनतेचें जीवन अधिक व्यापक व अधिक खोल आहे. आपला प्रयत्न प्रामाणिक असेल तर आपल्या अपयशांनींहि हें जीवन संपन्न होईल. अशी संपन्नता येण्यास प्रस्तुतची स्वदेशी चळवळ फार उपयुक्त ठरणार आहे."

असल्या हृदयस्पर्शी व तेजस्वी उद्‌गारांमुळें बनारसचें गोखल्यांचें अध्यक्षीय भाषण देशांतल्या नरम-गरम सर्वच गटांना फार पसंत पडलें.

## अलौकिक शिष्याचा लाभ

पुढें गोखल्यांनीं राष्ट्रसभेच्या प्रचारार्थ सर्व देशभर दौरा काढला. इ. स. १९०७ सालीं सुरत काँग्रेसमध्यें बखेडा होऊन राष्ट्रीय पक्ष बाहेर पडला ! इ. स. १९०८ सालीं लोकमान्य टिळकांना सहा वर्षांची शिक्षा झाली. या अवधींत गोखल्यांना कामाचा विलक्षण ताण पडला. त्यांनीं विलायतेची यात्रा केली. पब्लिक सर्व्हिस कमिशन स्थापन झाल्यावर त्याचे सदस्य म्हणून काम केलें. याच वेळीं म. गांधींनीं आफ्रिकेंतील हिंदी लोकांच्या हालअपेष्टांना वाचा

झोटली होती. शांततेनें जुलमी कायदे सामुदायिक रीतीनें मोडून सरकारला नमविण्याचें एक अपूर्व तंत्र गांधींजींनीं तेथें काढलें. सत्याग्रहाच्या या नव्या प्रयोगाकडे जगाचें लक्ष वेधलें. या कामीं भारतांत पैसे व सहानुभूति गोळा करण्याकरितां गांधीजी आले असतां गोखल्यांनीं त्यांना तनमनधनानें साह्य केलें.

न्यायमूर्ति रानडे यांच्यासारखा थोर गुरु गोखल्यांना मिळाला तसाच गांधीजींसारखा जगद्वंद्य शिष्य लाभला. एवढ्या तोलाचे गुरुशिष्य मिळणें हें भाग्य जगांत क्वचित्च कोणाच्या वांट्याला आलें असेल. भारतांतील सर्व पुढाऱ्यांची गांधीजींनीं भेट घेतली. कोणी हिमालयाप्रमाणें दुर्लंध्य तर कोणी महासागराप्रमाणें अथांग. गोखले मात्र गंगेप्रमाणें गांधीजींना भासले. या पवित्र तीर्थांत आपणांस सुखानें अवगाहन करतां येईल असा विश्वास गांधीजींना वाटूं लागला. देशहिताची तळमळ, सत्याची चाड, सौजन्य इत्यादि गोखल्यांच्या गुणांवर गांधींजी अगदीं मोहित होऊन गेले. पुढें ब्रिटिश सरकारच्या प्रेरणेवरून गोखले दाक्षिण आफ्रिकेंत गेले. तेव्हां एका थोर देशाचा सुसंस्कृत व सात्त्विक प्रतिनिधी म्हणून तेथील सरकार व जनता यांनीं गोखल्यांचें जें स्वागत केलें त्याला तोड नाहीं ! आफ्रिकेंत हिंदी लोकांवर अपमानकारक डोईपट्टीचा कर तेथील सरकारनें बसविला होता. तो गोखल्यांच्या वजनामुळें रद्द झाला. हा विजय तात्पुरताच ठरला ही गोष्ट वेगळी ! पण गांधीजींचा अपूर्व सत्याग्रह व वजनदार शिष्टाई यांमुळें देशाबाहेर भारताची इभ्रत वाढली हें खास.

## " गेले गोपाळ कृष्ण हा ! हाय ! "

परंतु देशांत अहोरात्र काम आणि शिवाय स्वदेशीं-परदेशीं दौरे यांमुळें गोपाळरावांची बाहेरून डौलदार दिसणारी देहयष्टि आंतून पोंखरून निबळ होती. हृदयविकाराचे झटके त्यांना वारंवार येत. अशा स्थितींतहि हिंदु-मुस्लिम

ऐक्याची मुहूर्तमेढ रोवण्याची शिकस्त ते करीत होते. इ. स. १९१४ सालीं लोकमान्य टिळक सुटले. पहिल्यापासून जहाल व मवाळ यांना एकत्र आणण्याचा गोखले यांचा प्रयत्न असे. पण आपल्या नेमस्तपणास बाध न येईल याची ते खबरदारी घेत आणि यामुळें पुष्कळदां त्यांच्या वागण्याचा अर्थ लोकांस न कळून त्यांच्यावर टीका होई. तीमुळें गोखल्यांचा मनस्ताप वाढे. अशा स्थितींत त्यांची प्रकृति झपाट्यानें खालावत गेली. गांधीजी त्यांना भेटायला पुण्यास आले. गोखल्यांना त्या सुमारास मूर्च्छा आली. गांधीजींनीं आपला पट्टशिष्य या नात्यानें भारत सेवक समाजाचें धुरीणत्व घ्यावें असें गोखल्यांनीं त्यांना म्हटलें. पण ईश्वरी नेम तसा नव्हता. इ. स. पुढें १९ फेब्रुवारी १९१५ रोजीं हा थोर देशभक्त निजधामास गेला ! भारतच नव्हे तर सर्व ब्रिटिश साम्राज्य शोकमग्न झालें !

" म्हणतात झोप आली शिक्षा ऐकूनीहि त्वरित ज्यास
ते धीर बाळ टिळकहि आजच रडतात कां सनिश्वास ? "

असें कविवर्य गोविंदाग्रजांनीं वर्णन केलें आहे. गोखल्यांच्या अंत्यविधीचें वेळीं टिळकांनीं ' हिंदुस्थानांतील हिरा, महाराष्ट्राचें नररत्न ' असा त्यांचा उल्लेख करून श्रद्धांजलि वाहिली. देशासाठीं चंदनाप्रमाणें झिजत असतां गोखल्यांना मृत्यु आला.

## खाजगी

गोपाळराव गोखले यांची गणना सुंदर पुरुषांत करावी लागेल. त्यांचा वर्ण उज्ज्वल आणि नाकडोळे रेखीव होते. शरीर डौलदार दिसे. पोषाखाच्या बाबतींत ते फार नीट-नेटके असत. ते युरोपियन सूट घालत तरी डोक्यावरील पगडी त्यांनीं कधीं सोडली नाहीं. शिष्टाचार पाळण्यांत ते कधीं कसूर करीत नसत. एका युरोपियन महिलेला त्यांनीं एकदां टाईप करून पत्र पाठविलें. पण लगेच तिची माफीहि मागितली. कारण इंग्रजी लोकांत स्त्रियांना पत्र पाठवायाचें तें टंकलिखित पाठवीत नाहींत, हस्ताक्षरांतच पाठवितात. सौजन्य हा त्यांचा

स्वभावधर्म असे. ज्याला एकदां त्यांनीं पूज्य मानिलें त्यांच्यासंबंधीं थट्टा-मस्करींतसुद्धां ते उथळ शब्द उच्चारायचे नाहींत. रानडे यांच्यांवरील त्यांची भक्ति केवळ अलोट होती. रानडे यांनीं दिलेलें एक उपरणें त्यांनीं गुरुप्रसाद म्हणून आमरण मोठ्या भक्तीनें जवळ बाळगिलें. महत्त्वाच्या प्रसंगीं गोखले तें शुभचिन्ह अंगावर घेऊन जात. गांधींनीं आफ्रिकेंत तें एकदां इस्त्री करण्यासाठीं मागितलें तेव्हां गांधीजी कदाचित् आपल्या इस्त्रीच्या प्रयोगांत हा आपला गुरुप्रसाद खराब व निकामी करून टाकतील असें गोखल्यांना भय पडलें! दादाभाई, मेथा, भांडारकर, तेलंग यांच्याविषयीं गोपाळ-रावांना असाच गाढ आदर असे.

गोखल्यांना सत्याची चाड विशेष होती. लहानपणची गणितासंबंधींची एक घटना वर आलीच आहे. विलायतेंत असतांना, पुणें येथें सोल्जरांनीं केलेल्या अत्याचाराबद्दल आपण अवास्तव टीका केल्याचें त्यांना कळलें तेव्हां त्यांनीं माफी मागितली. यांत फार मोठें मनोधैर्य होतें. त्यांच्या विरोधकांनीं त्यांना 'भ्याड' वगैरे विशेषणें दिलीं. पण गोपाळरावांनीं तो सर्व अपमान मुकाट्यानें गिळून आपणांस जें सत्य वाटलें त्याप्रमाणें वर्तन केलें.

गोपाळराव मनानें फार हळवे होते. परदुःखानें त्यांचें अंतःकरण व्यथित होई. एकदां त्यांच्या गाडीखालीं एक कुत्रें सांपडलें. त्यांना इतका धक्का बसला कीं, त्यांनीं त्या कुत्र्याला इस्पितळांत पोंचवून त्याच्या औषधपाण्याची व्यवस्था केली! निरनिराळ्या कला शिकण्याचा त्यांना नाद असे. संगीत, क्रीडा यांतहि आपण मागें राहूं नये असें त्यांना वाटे, ते पुढें पत्ते खेळावयास शिकले. पण यांतहि वैयक्तिक गौरवाच्या भावनेऐवजीं देशप्रीतीचीच भावना प्रभावी होती. ते म्हणत, 'हिंदी माणूस अमुक विषयांत मागें आहे असें कोणी म्हणूं नये.' त्यांचा स्वभाव कांहींसा लहान मुलासारखा होता. उतावीळपणा, नादिष्टपणा फार. एकदम कुणाला टाकून बोलतील. पण लगेच आपली चूक लक्षांत आली कीं जाऊन त्याची माफी मागतील. सन्मानांकडे त्यांनीं पाठ फिर-विली होती. त्यांना सरकारनें वेळोवेळीं अनेक मोठमोठ्या पदव्या देऊं केल्या.

पण त्या त्यांनीं साभार नाकारल्या. पुणें येथें गोखल्यांना श्रद्धांजलि देण्यासाठीं भरलेल्या एका गृहस्थांनीं त्यांचें फार सुंदर वर्णन केलें. ते म्हणाले : “ ॲरिस्टॉटल याच्या व्याख्येप्रमाणें गोखल्यांच्या गुणांनीं अवगुण व गुणातिरेक या दोहोंमधल्या सुवर्णबिंदूचा बरोबर छेद केला होता. त्यांच्या अंगीं धारिष्ट नव्हतें. पण धैर्य उत्तम प्रकारचें होतें. तीव्र मतभेदपात्रता होती, परंतु भांडखोरपणा नव्हता. शब्दांत गोडी किंवा मवाळी होती. परंतु त्यांनीं तोंडदेखलेपणा किंवा तोंडपुजेपणा केल्याचें कोणास माहित नाहीं. वस्तुमात्रास होणारा त्यांचा शब्दस्पर्श मृदू होता; पण तत्त्वाला ते कठोर होते. त्यांच्या हातांत मखमालीचे हातमोजे असले तरी आंतली मूठ पोलादी होती. ते सुविनीत असत, पण कोणास भिऊन वागत नसत. ”

## तपश्चर्या

उत्तम वक्तृत्व ही एक श्रेष्ठ दर्जाची कला आहे आणि प्रत्येक कलेची अशी दीर्घ साधना असते तशीच या कलेची आहे. स्वतःचा गळा हें एकच साधन घेऊन वक्त्याला आपलें कौशल्य दाखवितां येते. एखाद्या तंतकाराची एक सतार मोडली तर तो ती टाकून दुसरी घेईल. पण आपलें हत्यार बदलण्याची अशी सोय वक्त्याला नाहीं. स्वतःच्या गळ्याच्या एकाच हत्यारावर त्याला सर्व प्रपंच निभावून न्यावा लागतो. भाषण स्वच्छ, परिणामकारक व डौलदार वठावें यासाठीं वक्त्याला गळ्यावर हुकमत मिळवावी लागते. विचार व भावना यांस अनुसरून उच्चाराचे चढउतार त्याला साधले पाहिजेत. आवाजांतील आवेश, कंप, कारुण्य ही एक शब्दावेगळी स्वतंत्र भाषा आहे. ती शब्दार्थांशीं जुळली म्हणजे वक्त्यानें आपल्या कलेची सिद्धि बरोबर मिळविली असें म्हणतां येईल.

मनःपूर्वकता हा गोखल्यांचा गुण होता आणि श्रमांत ते कधींहि कुचराई करीत नसत. त्यामुळें शब्दांची समृद्धि व विषयांचें ज्ञान मिळविण्यासाठीं त्यांनीं अपरिमित कष्ट घेतले. बर्कचे ओजस्वी लेख, स्कॉटचें रसाळ काव्य,

किंवा 'टाईम्स' पत्रांतील मार्मिक लेख ते मुखोद्गत करीत. अर्थशास्त्राच्या अभ्यासांत तर त्यांचा हात धरणारा एकादाच निघेल. सरकारी अहवालांचीं ते पारायणें करीत. 'विचारांत सामर्थ्य पाहिजे, नुसते शब्द घसघशीत असून काय उपयोग?' असें त्यांना त्यांचे गुरुवर्य न्यायमूर्ति रानडे यांनीं एकदां सांगितलें होतें. तें गोखल्यांनीं मनांत पक्कें बाणवून घेतलें. अध्ययन व अवलोकन यांशिवाय विचार पक्के व बलशाली होत नाहींत आणि म्हणूनच त्या बाबतींत गोखल्यांनीं यत्किंचितहि कसूर केली नाहीं. गोखले इंग्रजी-प्रमाणें मराठी भाषेंतहि अस्खलित व सुंदर भाषण करीत.

## गोखल्यांचें वैशिष्ट्य

गोखल्यांच्या भाषणांत नाट्य मात्र फार कमी होतें. १९ व्या शतकांत व तत्पूर्वी नामांकित भारतीय व परकीय वक्ते हावभावांनीं व गर्जनापूर्वक भाषणें करून सभा जिंकीत. त्यांचीं वाक्यें पल्लेदार असत आणि उपमा-उत्प्रेक्षा-उल्लेख यांचा साज त्यांवर चढविलेला असे. सुरेंद्रनाथ या परंपरेचें मोठेंच उदाहरण होय. पण गोखल्यांच्या भाषणांत ही रोषणाई नसे. त्यांचा आवाज बारीक होता. मुद्राभिनयाची मदतहि ते फारशी घेऊं शकत नसत. मध्ययुगीन अलंकार व सजावट यांचें अवजड ऐश्वर्य जाऊन त्याजागीं सुट-सुटीत पोषाखाची पद्धति पडत चालली, त्याप्रमाणें वक्तृत्वकलेंतहि शब्दांची आतषबाजी जाऊन साधेपणा येऊं लागला. या बदलाचे प्रतिनिधि गोपाळराव गोखले होत असें म्हणावें लागेल.

पण भाषणांत साधेपणा असला तरी सद्भावनेला आवाहन करण्याचें गोखल्यांचें सामर्थ्य विलक्षण होतें. राजा रामपालसिंग यांचे अध्यक्षतेखालीं लखनौ येथें इ. स. १९०७ च्या फेब्रुवारींत गोखल्यांचें एक उत्कृष्ट भाषण झालें.

"भारताचा औद्योगिक प्रश्न भयंकर असला तरी तो राजकीय प्रश्नापेक्षां अधिक भयंकर खास नाहीं. आणि माझ्या मतें हे दोन

प्रश्न एकमेकांत गुंतलेलेच आहेत. भारतासाठीं कष्ट करायचे म्हणजे आपल्या जन्मभूमीसाठीं, आपल्या वाडवडिलांच्या भूमीसाठीं, आणि मुलाबाळांच्या भूमीसाठीं झटायचें. देवानें या देशावर अनेक दृष्टींनीं कृपा केली, पण माणसानें या देशाची सेवा नीट केली नाहीं. आणि परमेश्वरी इच्छेप्रमाणें आपण कांहीं करूं शकलों, तर ही आपली मातृभूमि पुढें जाईल आणि जगाच्या राष्ट्रांत मानाचें स्थान मिळवील."

असे शब्द ऐकून तेथील प्रेक्षकगण मोहून गेला. मातृभूमीचें हेंच स्तोत्र त्यांनीं सर्वत्र असेंच आळविलें. त्याच महिन्यांत अलाहाबाद येथें पंडित मोतीलाल नेहरू यांच्या अध्यक्षतेखालीं झालेल्या भाषणांत गोखल्यांनीं म्हटलें.

"आपण देशाच्या प्रगतीचा असा एक टप्पा गांठला आहे कीं आज आपली जमेची बाजू लहानच असणार, आणि आपणांस अपयशास सतत तोंड द्यावें लागणार. नियतीनें संग्रामांत या आघाडीवर आपणांस नेमलें आहे. आणि येथील काम पुरें केलें म्हणजेच आपली जबाबदारी संपणार आहे. उद्यांच्या आपल्या देशबांधवांना मातृभूमीची पूजा निःसंशय अनेक यशोमालिका चढवून बांधतां येईल, पण आज आमच्या पिढीला मात्र केवळ अपयश पत्करून तिची सेवा करावी लागणार आहे. पण या अपयशांतून जो लढा उदयाला येईल त्यानेंच महत्कार्य साधणार आहे."

## शब्दाचें महत्त्व

ज्या भाषेंत आपणांला वक्तृत्व करावयाचें आहे, त्या भाषेचें खोल ज्ञान वक्त्याला असणें अवश्य आहे. वक्त्याजवळ केवळ शब्दसंग्रह मोठा असून उपयोगीं नाहीं. भाषेच्या सौंदर्याचें रहस्य त्याला सापडलें असलें पाहिजे. वापरावयाच्या प्रत्येक शब्दाचा अर्थ, ध्वनि आणि नाद यांची वक्त्याला नीट कल्पना आली पाहिजे. संस्कृतांत याविषयीं एक सुंदर सूत्र आहे. "एक शब्द पूर्णपणें कळला आणि अचूकपणें योजतां आला,

म्हणजे तो स्वर्गलोकांत कामधेनूसारखा आपणांस साह्यकरी होतो ” केवढा शब्दाचा महिमा आहे पहा! अर्ल ऑफ् चॅथम् आपला मुलगा विल्यम् पिट याच्याकडून उत्तम ग्रंथ मोठ्यानें वाचून घेई आणि तो वाचत असतां मध्येंच त्याला थांबवून पुढें शब्द कोणता असेल हें विचारी. या अभ्यासामुळें समर्पक शब्दांचा उपयोग करण्याची विलक्षण शक्ति विल्यम् पिटच्या अंगीं आली. गोखल्यांनीं आदर्श वाङ्मयांतील उतारे पाठ करावेत आणि खुल्या हवेवर ते घडाघड म्हणावेत. एक शब्द चुकला कीं एक आणा बाजूस काढून ठेवायचा आणि असे आठ आणे झाले कीं जेवणास फांटा द्यायचा! या आख्यायिकेवरून शब्दसिद्धीसाठीं गोपाळरावांनीं केवढी घोर तपश्चर्या केली, तें कळून येईल.

## सौजन्य

आपल्या तोंडून चुकीचा किंवा वावगा शब्द जाऊं नये, याविषयीं गोखले फार दक्ष असत. पेरिक्लिस् नांवाचा प्राचीन ग्रीक तत्त्वचिंतक व व्याख्याता जाहीर सभेंत भाषण करण्यापूर्वी परमेश्वराची प्रार्थना करी कीं, “ हे परमेश्वरा आजच्या प्रसंगास न शोभेल असा एकहि शब्द माझ्या तोंडून जाऊं देऊं नको. ” हीच गोखल्यांची वृत्ति असे. अर्थात् ही वृत्ति सौजन्याच्या पोटीं जन्मास येते. गोखल्यांच्या अंतःकरणांत सौजन्य अगदीं ओसंडत असे. गुरुजनांविषयीं, उच्च ध्येयांविषयीं, श्रोत्यांविषयीं त्यांच्या मनांत सतत आदर असल्यानें ते खालच्या पातळीवर येऊन कधीं बोलले नाहींत. कायदेकौन्सिलांत आपलीं मतें ते तडफेनें मांडीत आणि कित्येकदां सरकारच्या प्रतिगामी धोरणाचा खरपूस समाचार घेत. परंतु अशा आवेशपूर्ण भाषणांतहि ओंगळ शब्दांनीं त्यांचें भाषण कधींहि दूषित झालें नाहीं.

कांहींतरी प्रक्षोभक बोललें, कुणाची तरी रेवडी उडविली, किंवा अतिशयोक्तीचा भडक रंग दिला म्हणजे वक्तृत्व रंगतें, असें पुष्कळांना वाटतें.

पण असें वक्तृत्व कांहीं उच्च दर्जाचें म्हणतां येणार नाहीं. असल्या उथळ वक्तृत्वास फारशी बुद्धि किंवा मोठें व्यक्तित्व लागत नाहीं. आपण एक जादूचा प्रयोग किंवा डोंबाऱ्याचा खेळ पाहिला इतकीच श्रोत्यांची अशा भाषणाबद्दल भावना होते. पण श्रोत्यांचीं अंतःकरणें जिंकावयाचीं असतील, त्यांना आपला दृष्टिकोन द्यावयाचा असेल तर असल्या आडमाप शाब्दिक गोलंदाजीचा कांहीं उपयोग नाहीं. सौजन्य आणि उच्च अभिरुचि यांनींच तें कार्य साधतें. नुसता वक्ता व्यासपीठावर येऊन उभा राहिला आणि त्यानें भाषणास सुरुवात केली कीं, या वक्त्याचे अंगीं सौजन्य आहे कीं नाहीं हें सभा ओळखते. भाषणाची नांदी उद्धटपणें झाली तर लगेच श्रोते बिथरतात. नुसत्या सौजन्यपूर्ण संबोधनानेंसुद्धां केवढा अनुकूल परिणाम होतो हें श्रीमत् स्वामी विवेकानंदांच्या उदाहरणावरून कळून येण्यासारखें आहे. शिकागो येथें भरलेल्या जगद्धर्मपरिषदेंत स्वामीजी बोलायला उभे राहिले आणि धीरगंभीर व तितक्याच प्रेमळ वाणीनें त्यांनीं श्रोतृसमुदायास म्हटलें–"माझ्या बंधुभगिनींनो !" 'सभ्य स्त्रीपुरुषहो !' असले औपचारिक व रुक्ष संबोधन ऐकण्यास सरावलेल्या अमेरिकन श्रोत्यांना या नव्या प्रेमळ आवाहनानें कांहीं नवीन अनुभूति आली. त्यांच्या हृदयांच्या तारांवर या संबोधनानें गोड झंकार निर्माण केले. केवळ एका मधुर संबोधनानें स्वामीजींनीं अमेरिकन लोकांचीं मनें जिंकलीं. असो. गोखल्यांचें बळ हेंच होतें. स्वदेशीं किंवा इंग्लंडमध्यें अथवा आफ्रिकेंत श्रोते त्यांच्या सौजन्यपूर्ण वाणीनें आकर्षिले जात.

## वक्तृत्वाचा हेतु कोणता ?

वक्तृत्वकलेच्या विलासांत तीन अंगें असतात. मुख्य अर्थातच वक्ता; दुसरें, अंग श्रोतृसमुदायांतील प्रत्येक व्यक्ति; आणि तिसरें, सर्व श्रोत्यांचें सामुदायिक मत. वक्ता बोलणारा उत्तम असला तरी प्रत्येक श्रोत्याला त्यांत रस वाटला पाहिजे आणि सर्वांचें मिळून जें मन आहे त्याचें रंजन झालें पाहिजे. कित्येकदां असें होतें श्रोत्यांतील कांहीं व्यक्तींना वक्त्याचें भाषण पसंत पडतें, पण सर्व श्रोतृवृंद

कांहीं विशेष प्रसन्न होत नाहीं. वक्ता, प्रत्येक श्रोता, आणि सर्व समुदाय यांची समरसता होईल तेव्हां वक्तृत्व खरें यशस्वी ठरलें असें म्हणतां येईल. गायकाचा सूर आणि तंबोरा यांचा स्वरमेळ झाला आणि गायन तबल्याच्या ठेकांत येऊं लागलें म्हणजेंच तें गायन शुद्ध व मधुर लागतें तसें हें आहे. गोखले यांच्यासारख्या थोर वक्त्यांना हें ठाऊक असतें. आणि म्हणून जेथें श्रोत्यांचें व आपलें सामरस्य होण्याचा संभव नाहीं तेथें ते जात नाहींत. गोखले हव्या त्या सभेंत कधीं बोलत नसत. यामुळें त्यांच्यावर अहंपणाचा आरोप केला जाई; कित्येकदां त्यांच्याविषयीं पुष्कळ गैरसमजहि झाले. पण गोखल्यांनीं आपलें व्रत कधीं सोडलें नाहीं. आतां प्रतिकूल श्रोत्यांच्या पुढें जाऊन आपल्या अमोघ वाणीनें त्यांनाहि जिंकणारे जहांबाज वक्ते असतात हें खरें आहे. अशांपैकीं कित्येकांना तर श्रोतृवंद विरोधी आहे या एकाच कारणानें विशेष स्फुरण चढतें. पण गोखले असल्या सभापंडितांपैकीं नव्हते. याचें कारण त्यांच्या अंगीं वक्तृत्वगुण कमी होते असें नाहीं, तर वक्तृत्वकलेविषयीं त्यांची कल्पनाच वेगळी होती. इंग्लंडमधील डिझरायली, लॉईड जॉर्ज, चर्चिल, बेव्हन इत्यादि कडवे मुत्सद्दी किंवा आमच्याइकडील पाल, राजगोपाळाचार्य यांच्यासारखे झुंझार नेते यांना व्यासपीठ हें समरांगण वाटतें. प्रतिपक्षाला नामोहरम करण्यासाठीं शब्दांचें अचूक शरसंधान करायचें एवढेंच ते जाणतात. गोखल्यांची वक्तृत्वविषयक कल्पना अशी नव्हती. व्यासपीठावरून श्रोत्यांच्या अंतःकरणांत नवीं ध्येयें प्रस्थापित करावीं, महान् विभूतींच्या श्रेष्ठतेचें रहस्य त्यांना सांगावें हें गोखले यांना वक्तृत्वाचें उद्दिष्ट वाटे. ते धनुर्धराच्या आवेशानें व्यासपीठावर चढत नसत तर एक लोकसेवक या नम्र भूमिकेंत तेथें प्रवेश करीत.

## विभूति-वर्णन

पण विनोदांचा किंवा आग्रहाचा अभाव असला तरी गोखले यांच्या भाषणांत सरसता कमी असें मात्र नाहीं. त्यांचें अंतःकरण भक्तिमान् होतें.

जेव्हां जेव्हां आदरणीय पुरुषांविषयीं बोलण्याचा प्रसंग येई तेव्हां त्यांची रसवंती फार बहरला येई.

" चाळीस वर्षें रानड्यांनीं आपल्यासाठीं परिश्रम केले, एकाच क्षेत्रांत नव्हे तर सर्वच सामाजिक चळवळींत ते होते. अनन्य निष्ठेनें, चिकाटीनें, आणि तन्मयतेनें ते झटले. निराशेचे शेंकडों प्रसंग आले असतांहि ते कधीं डगमगले नाहींत. आपल्यासाठीं त्यांनीं केलेलें कार्य, आपणांपुढें त्यांनीं ठेवलेलीं वैयक्तिक व सामाजिक ध्येयें, आणि देशाच्या हितासाठीं आपल्यापुढें त्यांनीं ठेवलेला उच्च आदर्श— ही सर्व आपणांला लाभलेली बहुमोल संपदा आहे. निसर्गानें मुक्त हातानें दिलेल्या बौद्धिक गुणांमुळेंच त्यांना एवढी सेवा करतां आली हें खरें आहे. पण दीर्घोद्योग, कडक शिस्त व इतर नैतिक गुण यांची जोड जर बौद्धिक गुणांना नसती तर त्यांचा इतका उपयोग त्यासच झाला नसता. रानड्यांच्या अंगीं थोर प्रमाणांत असलेल्या नुसत्या नैतिक गुणांनींहि त्यांना आपल्या देशबांधवांमध्यें श्रेष्ठ स्थान मिळालें असतें."

मुंबईच्या गव्हर्नरचे अध्यक्षतेखालीं झालेल्या सभेंत गोखल्यांनीं आपल्या थोर गुरूचें असें माहात्म्य वर्णन केलें. हीच त्यांची बुद्धि पितामह दादाभाई नवरोजींबद्दलहि होती. दादाभाईंच्या जन्मदिनानिमित्त झालेल्या एका सभेंत गोपाळराव सद्गदित होऊन म्हणाले :

" सभ्य गृहस्थ हो ! केवढें उदात्त जीवन हें ! या जीवनांतील ती मधुर पवित्रता, तो साधेपणा, ती क्षमाशीलता, तो उदात्त त्याग ती उच्च देशप्रीति, तें अगाध प्रेम, ती ध्येयासाठीं काम करण्याची अफाट शक्ति—या सर्वांचा साकल्यानें जो विचार करील त्याला कुणातरी थोर आत्मशक्तीच्या सान्निध्यांत असल्याचा भास होईल. असा पुरुष ज्या लोकांत निर्माण झाला त्यांचा भविष्यकाळ खास आशादायक आहे. मग तीस कोटींत असा एकादा का पुरुष असेना ! "

पण गुरुजनांविषयींच गोखले इतक्या भक्तिमानतेनें बोलत असें नाहीं. त्या काळीं महात्मा गांधी गोखल्यांच्या मानानें हिंदी राजकारणांतले उमेदवारच म्हणावे लागतील. परंतु गांधीजींच्या अंगच्या साधुत्वाचा गोखल्यांना अगदीं अचूक व तात्काळ साक्षात्कार झाला. माणसांतलि श्रेष्ठता ओळखण्यास श्रेष्ठ माणूस लागतो हें कांहीं खोटें नाहीं. महात्माजी जेव्हां भारतांत आफ्रिकेंतील हिंदी लोकांसाठीं मदत मागण्यास आले तेव्हां गोखल्यांनीं या युगप्रवर्तकाची ओळख भारताला करून दिली. एका सभेंत गांधीजींविषयीं बोलतांना ते म्हणाले—

> " गांधींचें नांव घेतांना जगावरील कुठल्याहि भारतीयाचें अंतःकरण अभिमानानें व उच्च भावनांनीं भरून येईल. सभ्य गृहस्थहो ! गांधींच्या निकट मी आलों हा माझ्या जीवनांतील महालाभ मी समजतों. एवढा पवित्र, एवढा शूर, एवढा उदारधी आणि एवढा उदात्त पुरुष आज पृथ्वीच्या पाठीवर दुसरा नाहीं. गांधीसारखे महात्मे साधें व्रतस्थ आचरण ठेवून सत्यन्यायासाठीं आपलें सर्वस्व अर्पितात. आपल्या दुर्बल देशबांधवांच्या नेत्रांना ते स्पर्श करतात, तेव्हां जादूची कांडी फिरल्याप्रमाणें त्यांना नवें जग दिसूं लागतें. हा माणूस शूरांतला शूर आणि देशभक्तांतला देशभक्त आहे. याच्या ठायीं भारतीय मानव्यानें परमोच्च पातळी गांठली आहे. "

गांधीजींचा अलौकिक अवतार ज्यांनीं पूर्ण विकसित झालेला पाहिला त्यांना या उद्गारांत कदाचित् कांहीं विशेष वाटणार नाहीं. पण सुमारें अर्धशतकापूर्वीं जेव्हां गांधीजींचें अवतारकार्य नुकतेंच सुरू झालें होतें तेव्हां गोखल्यांनीं त्यांचें असामान्य तेज नेमकें जाणलें हें आश्चर्य नव्हे काय ? आपणांस गुरु मानणाऱ्या एका कनिष्ठ लोकसेवकाची ओतप्रोत प्रशंसा करण्यांत त्यांनीं धन्यता मानली. या सर्वांवरून गोखल्यांचें द्रष्टेपण व उदार हृदय स्पष्ट दिसून येतें.

## अमर उपदेश

नामदार गोपाळ कृष्ण गोखले यांचें चरित्र विद्यार्थ्यांना विशेष मार्ग-दर्शक होण्यासारखें आहे. कारण गोखल्यांनीं आपलें मोठेंपण तपश्चर्या करून मिळविलें. त्यांची उद्यमशीलता, त्यांची गुरुभक्ति, त्यांची ज्ञानलालसा, आणि विशेष म्हणजे त्यांचें सौजन्य व देशभक्ति हीं सदासर्वकाळ ध्रुवताऱ्याप्रमाणें विद्यार्थ्यांना उच्च आदर्शाची वाट दाखवीत राहतील. इंग्रजांच्या चांगुल-पणाबद्दल गोखल्यांना पराकाष्ठेचा विश्वास वाटे. त्याचप्रमाणें जहाल व दहशत-वादी चळवळी त्यांना पसंत पडत नसत. त्यामुळें त्यांच्यावर मवाळपणाचा आरोप केला जाई. टिळकांसारखा प्रतापशाली प्रतिस्पर्धी त्याच काळांत चमकत राहिल्यानें सौम्यप्रकृति गोखल्यांचें चरित्र कांहींसें फिकट वाटूं लागलें. आज आपला देश स्वतंत्र झाला आहे. तेव्हां मवाळ-जहाल वादाचें शेवाळ बाजूला करून आपण गोखल्यांच्या चरित्राचें शुद्ध प्रतिबिंब पाहूं या. यांत आम्हांला आजच्या काळाला किंबहुना सर्वच काळांत स्फूर्तिदायक ठरेल असें विचारधन खास सांपडेल.

> “ आपल्या मातृभूमीविषयींचें प्रेम इतकें जाज्वल्य असलें पाहिजे कीं, त्यामुळें कुठल्याहि त्यागाचें शुद्ध आनंदांत रूपांतर व्हावें. आज नवीन कल्पनांची जरूरी नाहीं, स्वार्थत्यागाची आहे; शब्दाची नाहीं, कामाची आहे. अष्टौप्रहर काम करा, सुप्रभातीं उठून कामास लागा आणि रात्र पडल्यावरहि काम करीत रहा. उद्यां आपल्या अदृष्टांत काय लिहिलें आहे हें कुणासच ठाऊक नाहीं; आपल्या कष्टाचीं फळें आपण डोळे मिटण्यापूर्वीं मिळतील कीं नाहीं हेंहि सांगतां येणार नाहीं. परंतु देशभक्तीनें प्रेरित झालेल्या, श्रद्धा व त्याग यायोगें चिवट व उदात्त बनलेल्या लोकांना या जगांत अशक्य असें कांहींच नाहीं. अशीं माणसें मोठ्या प्रमाणांत आपल्या सेवेसाठीं पुढें यावीं असें भारतमातेस आज वाटत आहे.”

भारतसेवक गोखल्यांनीं आपल्या वेळच्या तरुणांना असा उपदेश केला. तोच आजहि तितकाच टवटवीत व उपयुक्त ठरत नाहीं काय ?

## अभ्यासाच्या वाटा

१. गोखल्यांनीं देशसेवेचें व्रत घेण्याचें कां ठरविलें ?

२. राजकारणक्षेत्रांत गोखल्यांनीं कोणती कामगिरी केली तें सविस्तर लिहा.

३. गोखल्यांच्या ठिकाणचे कर्तव्यतत्परता, सत्यप्रीति वगैरे गुण लहानपणापासूनच दृष्टोत्पत्तीस आले होते हें कशावरून ? त्यांच्या खाजगी जीवनाबद्दल तुम्हांस काय माहिती आहे ?

४. गोखल्यांच्या वक्तृत्वाचें कै. तात्यासाहेब केळकर यांनीं वर्णन केलें आहे, त्याचा मतितार्थ द्या.

५. गोखल्यांच्या वक्तृत्वांतील विशेष गुण कोणते ? त्यांचें सविस्तर वर्णन करा.

६. " गोखल्यांच्या चरित्रांतून विद्यार्थ्यांना पुष्कळ गोष्टी घेतां येतील." स्पष्टीकरण करा.

" वक्ता सभेंत असें भाषण करो कीं ज्या भाषणानें ऐकणारांचीं मनें प्रफुल्लित होतील, डोळे व कान संतृप्त होऊन भूक, झोंप, दुःख यांचा त्यांना विसर पडेल; काळ किती गेला याचें भान त्यांना राहणार नाहीं;



दुसरें कांहीं निकडीचें काम असलें तर त्याचेंहि विस्मरण होईल आणि उत्कंठेची तार अशी ताणली जाईल कीं वक्ता थांबला कीं, श्रोत्यांना खरोखर दुःख होईल." अशा अर्थाचें एक संस्कृत सुभाषित आहे. उत्तम वक्तृत्वाचें सर्व वर्णन यांत थोडक्यांत आलें आहे. भाषणाचें सौंदर्य कशांत असतें याविषयीं श्री. हर्ष या कवीनें याहूनहि थोड्या शब्दांत फार मार्मिक वर्णन केलें आहे. तो म्हणजे " उगाच पाल्हाळ लावणें आणि अति संक्षिप्त बोलणें, हे दोन भाषणाचे विषासारखे दोष आहेत. बोलणें मोजकें असावें, परंतु त्यांत पूर्ण स्पष्टताहि असावी. " उत्तम वक्त्याच्या भाषणांत नेमकें हेंच आढळतें. असें ' मितले आणि रसाळ ' बोल ऐकविणाऱ्या वक्त्यांत नेक नामदार श्रीनिवासशास्त्री यांची गणना प्रामुख्यानें करतां येईल. आजच्या काळांत त्यांच्याइतकें शुद्ध, डौलदार, उदात्त भाषण करणारे वक्ते फारच दुर्मिळ होत, असें म्हटल्यास फारशी अतिशयोक्ति म्हणतां येणार नाहीं. मंडलाकार परिषदेंत त्यांचें उत्कृष्ट भाषण ऐकून एक इंग्लिश उमराव म्हणाला, " एवढा

थोर वाचस्पति आपल्या साम्राज्यांत असतांना इंग्रज सरकार त्याचा कांहींच कसा उपयोग करून घेत नाहीं!" इंग्रज सरकारच्या प्रेरणेनें श्रीनिवासशास्त्री सर्व जगभर हिंडले. त्यामुळें त्यांच्या वाणीची प्रभा सर्व जगभर फांकली. एकोणिसाव्या शतकांत युरोपांत जे अनेक जगविख्यात वक्ते होऊन गेले त्यांच्या तोडीचे श्रीनिवासशास्त्री होते असें जाणकार सांगतात.

## जन्म आणि शिक्षण

मद्र देशांत ह्या विद्वान् उदारमतवाद्याचा जन्म २२ सप्टें.१८६९साली झाला. श्रीनिवासशास्त्री यांचें शिक्षण कुंभकोणम् येथें झालें. ते नमुनेदार मेहनती विद्यार्थी होते. पदवी घेतल्यानंतर त्यांनीं अध्यापनाचा व्यवसाय सुरू केला. खरोखर शास्त्री जन्मसिद्ध शिक्षक होते. परंतु केवळ शाळा किंवा महाविद्यालय एवढ्याच क्षेत्रांत त्याचें अध्यापन-कौशल्य मर्यादित व्हावें, असा योग नव्हता. नामदार गोखल्यांनीं या ध्येयनिष्ठ तरुणाला आपल्या सांप्रदायांत दाखल करून घेतलें आणि इ. स. १९०७ सालीं भारत-सेवक-समाजांत शास्त्र्यांचा प्रवेश झाला. तेव्हांपासून अखेरपर्यंत या संस्थेचे ते एक आधारस्तंभ होते. इ.स. १९१५ सालीं गोखले स्वर्गस्थ झाले, तेव्हां त्यांचे परात्परशिष्य गांधी होते आणि त्यांनींच आपल्या भारत सेवक समाजाचें धुरीणत्व आपल्या मागें पत्करावें, अशी गोखल्यांची फार फार इच्छा होती. पण गांधीजींचें सर्वच लोकविलक्षण असल्यानें भारत-सेवक-समाजांत दाखल होण्यास त्यांनीं गोखल्यांना नम्रतापूर्वक नकार दिला. तेव्हां अखेर या संस्थेच्या नेतृत्वाची माळ श्रीनिवासशास्त्री यांच्या गळ्यांत पडली. आपल्या थोर गुरूच्या सात्त्विक व नेमस्त परंपरा शास्त्र्यांनीं उत्तम सांभाळल्या आणि या संस्थेची प्रतिष्ठा कायम ठेविली. भारत-सेवक-समाजांत प्रथमच दाखल झाल्यामुळें सत्ता व संपत्ति मिळविण्याकडे त्यांनीं तेव्हांपासूनच पाठ फिरविली. आपल्या देशाची बाजू जगापुढें मांडण्याचें फार थोर काम त्यांनीं आमरण कळकळीनें केलें

## राजकारण

शास्त्र्यांच्या वक्तृत्वाचा पहिला बहर मद्रास प्रांतिक कायदेमंडळांत आला आणि नंतर इ. स. १९१६ सालीं मध्यवर्ती बादशाही कौन्सिलांत त्यांची नेमणूक झाल्यानें त्यांना अखिल भारतीय व्यासपीठ मिळालें. सत्यप्रिय, व्यासंगी आणि आर्जवी अशा या नेत्याची छाप इंग्रज सरकारवर फार पडली आणि भारताची पहाणी करण्याकरितां स्टेट सेक्रेटरी मॉटेग्यु जेव्हां इकडे आले तेव्हां श्रीनिवासशास्त्र्यांची मदत त्यांना अतोनात झाली. आज स्वतंत्र भारतांत अनेक आंतरराष्ट्रीय परिषदांत आपलीं शिष्टमंडळें व नेते चमकतांना दिसतात. परंतु भारत तेव्हां परतंत्र होता आणि त्याला आजचा दर्जा व प्रतिष्ठा मिळाली नव्हती तेव्हां अशा परिषदेंत शास्त्र्यांनीं भारताची उत्तम वकिली केली. त्या त्यांच्या कामगिरीबद्दल भारतानें त्यांचें ऋणीच राहिलें पाहिजे. इ. स. १९२१ सालीं ब्रिटिश साम्राज्यांतील मुत्सद्यांची परिषद भरली. शास्त्री भारताचे प्रतिनिधि म्हणून निवडले गेले. पुढें राष्ट्र-संघ व वॉशिंग्टन् परिषद् यांतहि सरकारनें भारताचे प्रतिनिधि म्हणून त्यांनाच पाठविलें. या सर्व ठिकाणीं आपल्या साधार, प्रांजल, पण सौजन्य-मधुर वक्तृत्वानें शास्त्र्यांनीं सर्वांना वेधून घेतलें. भारताच्या या प्रतिनिधीचें यश म्हणजे भारताला अभिमानाचा विषय झाला.

## पृथ्वी-प्रदक्षिणा

शास्त्र्यांना प्रिव्ही-कौन्सिलर होण्याचा बहुमान मिळाला, त्याचप्रमाणें लंडन शहराचें नागरिकत्वहि त्यांना अर्पण करण्यांत आलें. त्यावेळीं तर या सन्मानाची विशेष महती होती. ब्रिटिश सरकार त्यांच्याकडे एक थोर स्नेही व सल्लागार या दृष्टीनें पहात असे. त्या काळीं सर्व ब्रिटिश साम्राज्य-भर पसरलेल्या भारतीयांची स्थिति फार वाईट होती. परतंत्र देशाचे नागरिक म्हणून त्यांना कांहींसें तुच्छतापूर्वक वागविण्यांत येई. अनेक वसाहतींतून

अशीं गाऱ्हाणीं येऊं लागलीं. आफ्रिकेंतल्या भारतीयांच्या हालअपेष्टांचा निरास करण्यासाठीं गांधीजींनीं आपलें अपूर्व सत्याग्रहास्त्र अभिमंत्रित केलें, हें प्रसिद्धच आहे. श्रीनिवासशास्त्री मनानें मवाळ. त्यांचे मार्गहि तडजोडीचे—पण स्वबांधवांच्या दुःस्थितीबद्दल त्यांचें कोमल अंतःकरण कमी दुःखित होई, असें मात्र नाहीं. ब्रिटिश सरकारकडे त्यांनीं कळकळीनें याविषयीं दाद मागितली. ब्रिटिश सरकारच्या सल्ल्यावरून इतर ब्रिटिश वसाहतींत आपल्या देशबांधवांची स्थिति कशी आहे हें पाहण्यासाठीं शास्त्र्यांनीं पृथ्वी प्रदक्षिणाच केली. दक्षिण आफ्रिका, केनिया, आस्ट्रेलिया इतर सर्व ठिकाणीं ते हिंडले. आपल्या देशबांधवांच्या तक्रारी, अडचणी व हालअपेष्टा त्यांनीं समजावून घेतल्या, त्यांना धीर दिला, आणि ब्रिटिश सरकारकडे सर्व गाऱ्हाण्यांचें स्तोम पोचविलें.

या कामीं हिंडत असतां शास्त्र्यांचा वाक्सुगंध अक्षरशः दाही दिशांना पसरला. ब्रिटिश साम्राज्यांतील सर्व वसाहतींनीं समानतेनें व भ्रातृभावानें एकमेकांशीं, वागावें असा ते सर्वत्र उपदेश करीत. पूर्वीं जें झालें तें गंगेस मिळालें, पण यापुढें ब्रिटिश साम्राज्यांतील सर्व देश संघटित व बलिष्ट राष्ट्रकुल म्हणून एकत्र आले आणि सहकार्यानें व एकोप्यानें वागूं लागले, तर जगांत सुधारणा व संस्कृति यांचें पाऊल खास पुढें पडेल अशी शास्त्र्यांची श्रद्धा होती. आपली श्रद्धा अनाठायीं असें त्यांना कित्येक ठिकाणीं घडलेल्या कटु प्रसंगांनीं समजून येई. पण त्यांच्या तोंडून कडवट शब्द कधीं बाहेर पडले नाहींत. सर्व वसाहतींचें सख्य व ऐक्य यांचा संदेश ते ठिकठिकाणीं कळकळीनें सांगत. आपल्या देशाची वकिली हें तर ते पवित्र कर्तव्य मानीत पण या देशाला बरोबरीचा दर्जा देऊन साम्राज्यांत ठेवण्यानें जगाच्या विकासाला व शांततेला मदत होणार आहे, हेंहि ते सर्वांना पटवीत.

शास्त्र्यांच्या या प्रांजल हितोपदेशाचा मोठमोठ्या मुत्सद्यांवर परिणाम झाल्याखेरीज रहात नसे. इ. स. १९२२ ऑक्टोबरला न्यूझीलंडमध्यें शास्त्र्यांच्या सन्मानार्थ एक मोठी मेजवानी तेथील इंग्रज नेत्यांनीं दिली. अध्यक्ष सर

गॉडफ्रे लॅगडन् शास्त्र्यांचा परिचय करून देतांना म्हणाले, " शिष्टाईसाठीं लागणारे सर्व गुण व नैतिक लायकी शास्त्री यांच्या अंगीं फार मोठ्या प्रमाणांत आहे. त्यांच्या मागें लोकसेवेची मोठी पुण्याई आहे. त्यांची कार्यक्षमता, त्यांची संस्कृति आणि त्यांची उज्ज्वल वाक्पटुता यामुळें त्यांच्याबद्दल भारतांतच नव्हे तर सर्वच वसाहतींत गाढ प्रेमादर वाटत आहे. " याच वेळीं गॉड्फ्रेनीं पंतप्रधान ह्यूजेस् यांचें शास्त्र्यांना आलेलें पत्र वाचून दाखविलें. शास्त्र्यांच्या कामगिरीचा गौरवपूर्ण उल्लेख करून ह्यूजेस्नीं म्हटलें होतें :

> " आपल्या भेटीला साम्राज्याच्या दृष्टीनें फार महत्त्व आहे. ऑस्ट्रेलियांतील लोकांना साम्राज्याची भव्यता व गुंतागुंत कळण्यास आपल्या भेटीनें मदत झाली आहे. आपल्या उपस्थितीनेंहि आम्हांपैकीं पुष्कळांना पुष्कळच शिकतां आलें. आपल्या आगमनानें व अनुपम वाणीनें पूर्वग्रह व अज्ञान यांचा पडदा दूर झाला आणि भारताची वस्तुस्थिति आम्हांला समजली. येथील लोकसभेंत व बाहेर आपण लोकमतावर संस्कार केले आणि आपल्या भेटीपूर्वीं जें अशक्य होतें तें शक्य करून दाखविलें. "

या उद्‌गारांवरून शास्त्र्यांच्या उच्च भूमिकेचा इतरांच्या मनावर किती सुपरिणाम होत असे, हे दिसून येईल. ब्रिटिश सरकारशीं त्यांची वृत्ति स्नेहभावाची होती हें खरें. पण त्यामुळें त्यांच्या वागण्यांत नेमस्तपणा असला तरी मिंधेपणा कधींच आला नाहीं. इतर वसाहतींत केवळ आपल्या देशाविषयीं ते आक्रोश मांडीत नसत, तर निरनिराळ्या मानव वंशाच्या लोकांनीं एकत्र यावें व एकमेकांत समजून घ्यावें, असा त्यांचा प्रयत्न असे. पंथभेदांनीं व परस्पर विरोधी अभिमानांनीं बुजबुजलेल्या या जगांत जर राष्ट्राराष्ट्रांत कांहीं सद्‌भाव टिकला असेल, तर तो शास्त्र्यांसारख्या शांतिदूताच्या विधायक शिकवणुकीमुळेंच होय.

## राजकारणांतील आणखी कामगिरी

आफ्रिकेंतील हिंदी लोकांच्या जीवनाचा प्रश्न अजूनहि बिकट होताच. गांधीजींच्या सत्याग्रहामुळें तेथील अरेराव सरकार थोडें नमलें होतें. पण

भारतीय स्वातंत्र्यसंग्रामाच्या चळवळीस वाहून घेण्यासाठीं गांधीजींनीं आफ्रिकेचा कायमचा निरोप घेतल्यानंतर पुनः तेथील सरकार बिथरलें. या बिकट प्रश्नांत शास्त्र्यांनीं खूप मेहनत घेतली. ब्रिटिश सरकारनें त्यांना आफ्रिकेचे हाय–कमिशनर नेमलें. इ. स. १९२७ ते इ. स. १९२९ एवढा काळ शास्त्र्यांनीं आफ्रिकेंत काढला आणि आपल्या निःस्सीम सेवेनें तेथील हिंदी बांधवांना दिलासा दिला. नंतर भारतामध्यें नेमल्या गेलेल्या मजूर शिष्टमंडळावर त्यांनीं जागा पत्करली. श्रमजीवि वर्गाच्या जीवनाची सूक्ष्म पहाणी करीत ते या शिष्टमंडळाबरोबर हिंडले.

यानंतर मंडलाकार परिषदेसाठीं ते विलायतेस गेले. त्या ठिकाणीं त्यांची ऋजुता, व्यासंग व वक्तृत्व यांची विलक्षण मोहिनी इंग्लिश लोकांवर पडली. विशेषतः भारताच्या राष्ट्रीय ऐक्याचा विध्वंस करणाऱ्या अनेक शक्ती तेथें वावरत होत्या. त्यांच्याशीं शास्त्र्यांनीं अतिशय पद्धतशीर सामना दिला. परंतु साम्राज्यशाहीचा दुर्योधनी हट्ट, जातिनिष्ठांच्या कारवाया आणि आमच्यांतील फाटाफुटी यांमुळें शास्त्र्यांच्या प्रयत्नांचें फारसें चीज झालें नाहीं. इकडे भारतामध्यें राष्ट्रीय संग्रामाची तीव्रता वाढत होती. शास्त्र्यांच्या नेमस्त वृत्तीला ही चळवळ पसंत पडण्यासारखी नव्हती. त्यामुळें त्यांचा आणि राष्ट्रीय नेत्यांचा बराच विरोध आला. पंडित जवाहरलाल नेहरू यांच्यासारख्या राष्ट्रनेत्यांना शास्त्र्यांवर कडक टीका करावी लागली. असो. दुसऱ्या महायुद्धांत जगांत एवढा प्रचंड संघर्ष सुरू झाला कीं, शास्त्र्यां-सारख्या नेमस्त व मृदु माणसाला राजकारणांतील प्रबळ प्रवाहाशीं समरस होणें शक्य होईना. प्रकृतीहि ढासळत चालली होती. शेवटीं आपल्या आवडत्या शिक्षणक्षेत्राकडे त्यांची दृष्टि वळली. जीवनाला अध्यापक म्हणून सुरुवात करून अखेर विद्यापीठाचें कुलगुरु व्हावयाचें, असें डॉ. जयकरांच्याप्रमाणें शास्त्र्यांच्याहि बाबतींत घडलें. राजहंसाचें खरें बळ व त्याचा खरा विलास उत्कृष्ट सरोवरांतच व्हावयाचा. त्याप्रमाणें श्रीनिवासशास्त्र्यांच्यासारखे जातिवंत शिक्षक विद्यामंदिराच्या सभामंडपांतच प्रभावी ठरावयाचे.

अन्नामलाय विद्यापीठाचे शास्त्री कुलगुरु झाले आणि आपल्या जीवनाच्या सायंकाळीं तपस्येचा लाभ त्यांनीं त्या विद्यापीठास दिला. भारत-सेवक-समाजाची चिंताहि ते वहात असतच. इ. स. १७ एप्रिल १९४६ रोजीं हा थोर पुरुष स्वर्गवासी झाला.

## दर्शनीयत्व, सोज्ज्वलपणा

वक्त्याला दर्शनीयत्व फार साह्यकारक होतें. व्यासपीठावर आल्यानंतर वक्त्याची आकृति भव्य व तेजाळ असेल, तर अर्धें काम फत्ते होतें. नेक नामदार श्रीनिवासशास्त्री यांना ही निसर्गाची देणगी चांगली मिळाली होती. त्यांची उंची बरीच असून शरीर प्रमाणबद्ध होतें. डोळे अत्यंत पाणीदार असून कपाळावर बुद्धीची प्रभा फाकलेली दिसे. बर्फाच्छादित शिखराप्रमाणें त्यांच्या उत्तमांगावरील शुभ्र फेटा त्यांना फार शोभून दिसे. मुद्रेवर सात्त्विकता व तपश्चर्या यांचें शीतल तेज असें दिसें कीं, या पुरुषाचें दर्शन होतांच माणसानें आपोआप हात जोडावेत. यालाच अतिशय स्वच्छ व मधुर आवाजाची जोड मिळाल्यानें त्यांच्या नैसर्गिक संपदेवर कळसच चढला होता.

शास्त्री हे अत्यंत भावना-प्रधान गृहस्थ होते. त्यामुळें त्यांच्या मनाचें पुष्कळदां अतिशय हाल होत. इंग्रज सरकार हट्टीपणानें स्वराज्यदानास दिरंगाई करीत आहे, याचा तर त्यांना राग येईच, परंतु आमच्या जलाल व क्रांतिकारक देशभक्तांनीं स्फोटक मार्गाचा अवलंब करावा हेंहि त्यांना वेदना देई. प्रत्यक्ष प्रतिकाराच्या चळवळीमुळें इंग्रज व हिंदी जनता यांचें मनोमीलन होण्यास अडचणी येत आहेत, अशा जाणिवेनें ते व्याकुळ होत. मंडलाकार परिषदेंत गांधींना आपला सत्याग्रह संग्राम आवरा, अशी विनंति करतांना याच मनांतील द्वंद्वामुळें ते अत्यंत कष्टी झाले आणि त्यांना मूर्च्छा आली ! असो स्वातंत्र्य संग्रामाच्या मार्गाला त्यांचा विरोध असला, तरी गांधीजींचें महानुभावित्व ते जाणून होते. आणि राष्ट्रीय नेत्यांना शास्त्र्यांच्या विषयीं मोठा आदर वाटे. शास्त्र्यांचा त्याग फार मोठा होता. भारत-

सेवक-समाजांत शिरतांना त्यांनी घेतलेली अपरिग्रहाची शपथ फार कसोशीनें पाळली. समिति, शिष्टमंडळ यांवर असतांना किंवा हायकमिशनरसारख्या उच्च पदावर गेल्यावर जो तनखा मिळे, त्यापैकीं अवश्य तेवढा खर्च करून बाकी राहिलेला सर्व पैसा ते भारत-सेवक-समाजास देत. आपल्या विद्यार्थ्यां-पैकीं किंवा अनुयायांपैकीं कोणी गरजू दिसला तर त्याला मदत करण्यास ते पुढें सरसावत.

शास्त्री हाडाचे शिक्षक होते आणि ही त्यांची वृत्ति नेहमीं अनेक गोष्टींत दिसून येई. एकदां गांधीजींच्या पत्रांतील भाषेच्या चुका दुरुस्त करून गांधीजींना तें पत्र त्यांनीं परत पाठविलें. गांधींची विनोदबुद्धि अतिशय तल्लख. त्यांनीं तें शास्त्र्यांनीं दुरुस्त केलेलें पत्र प्रसिद्ध केलें, मात्र प्रास्ताविक जोडतांना मिष्किलपणें म्हटलें, “ श्री. शास्त्री हे खरेखुरे शाळा-मास्तर आहेत. त्यांनीं माझ्या पत्रांतील शुद्धलेखनाच्या चुका दुरुस्त करून हें सिद्ध केलें आहे.” या दोघां श्रेष्ठ गुरुबंधूंचा असा विनोद पुष्कळ चाले. असो. अत्यंत चारित्र्यवान् देशसेवक म्हणून श्रीनिवासशास्त्र्यांचें महत्त्व सदैव राहील.

## वाणीचें वैभव

गेल्या शतकांत इंग्लंडमध्यें ग्लॅडस्टन् म्हणून महान् वक्ता होऊन गेला. ग्रेट ब्रिटनचें पंतप्रधानपद एकाहून अनेकदां त्यानें भोगलें. ग्लॅडस्टन् हा बहुढंगी वक्ता होता. लोकसभेला तर तो आपल्या वक्तृत्वानें भारून टाकीच, पण मैदानी व प्रचाराच्या सभेंतसुद्धां तो नुसता वाघ असे. अंडीं आणि शेरी मदिरा यांचें मिश्रण टेबलावर ठेवून मधून मधून त्याचे घुटके घेत तो आपण भाषण चालू ठेवी. एकदां अंदाजपत्रकावर बोलतांना अस्खलितपणें पांच तास बोलून त्यानें एक विक्रम प्रस्थापित केला. या सभापंडितानें भाषेचा साधेपणा ही वक्तृत्व कलेंतील यशाची गुरुकिल्ली असें सांगितलें आहे. ग्लॅडस्टन् म्हणे :

“ सुबोध भाषेचा अभ्यास करा. प्रत्येक वेळीं अधिक साधा शब्द निवडण्याकडे दृष्टि असावी. वाक्यें लहान असावींत. अर्थात् स्पष्टता असावी. आपल्या मुद्यांविरुद्ध शंका काढून आपल्या मताची पारख करून घ्यावी. या कामीं प्रतिपक्षी किंवा टीकाकार यांना शंकाकुशंका काढण्याची संधि देऊं नये. ज्या विषयावर बोलायचें, त्याचें उत्तम अध्ययन केलेलें असावें आणि या अध्ययनावरच मुख्य भिस्त टेवून त्यांतून निवडक शब्द सुचतील, असें करावें. ”

जणूं हा कित्ता डोळ्यापुढें ठेवूनच ना. शास्त्रींनीं आपल्या वक्तृत्वाची जोपासना केली असें वाटेल. शास्त्री भाषण सहसा लिहून आणीत नसत. लेखणीपेक्षां वाणीवर त्यांचा विशेष भरवसा आहे. किंबहुना त्यांना लिहिण्याचा कंटाळा असावा असें वाटतें. आपले परमपूज्य गुरु नामदार गोपाळ कृष्ण गोखले यांचें चरित्र व अवतारकार्य यांवर ग्रंथ लिहिण्याची त्यांची फार इच्छा होती. हा ग्रंथ पुरा झाला असता तर वाङ्मय व राजकारण या दोन्ही दालनांत मोठी भर पडली असती. परंतु शास्त्र्यांच्या हातून तें कार्य झालें नाहीं. म्हैसूर विद्यापीठांत गोखले यांच्यावर एक व्याख्यानमाला त्यांनीं गुंफली आणि त्याच लहानशा पुस्तकावर आपणांला आज भागवावें लागतें. असो. अगदीं महत्त्वाच्या परिषदेंतहि ऐनवेळीं ते भाषण करण्यास उठत. वृत्तपत्रकार आगाऊ भाषणाची प्रत मागण्यास शास्त्र्यांच्याकडे गेले म्हणजे बहुधा त्यांची निराशाच होई! परंतु आपल्या सर्व शक्ति वक्तृत्व-कलेवर केंद्रित करून त्यांनीं एक परमोच्च आदर्श निर्माण केला होता. साध्या शब्दांतलें सौंदर्य आणि कल्पनेची भव्यता पाहावयाची असेल तर नामदार शास्त्र्यांचें वक्तृत्व ऐकावें, असेंच वाटे. शास्त्र्यांचें चिंतन नेहमींच चाले. पण भाषणाची मात्र पूर्वतयारी अशी फारच थोडी ते करीत. पण ते जातिवंत शिक्षक होते त्यामुळें जें सांगावयाचें तें सुबोध व हृदयस्पर्शी कसें करतां येईल, याची अतोनात दक्षता ते घेत.

आवाज ही गायकाप्रमाणें वक्त्यालाहि अत्यंत अवश्य अशी गोष्ट आहे. श्रीनिवासशास्त्री या बाबतींत फार भाग्यवान् होते. त्यांचा आवाज गोड व रेखीव होता आणि तरीहि त्याला उंची होती. कांहीं माणसें नाकाडोळ्यांनीं देखणी असतात, पण त्यांचें एकंदर व्यक्तित्व अगदीं अळणी असतें, त्यांचा प्रभाव मुळींच पडत नाहीं. कांहीं आवाजाचें माधुर्य असें फिकें असतें. शास्त्र्यांचें असें नव्हतें. त्यांच्या कंठांतून शब्द निघाला कीं तो मधुर वाटेच, पण रुबाबदारहि वाटे. त्यांचें श्रोत्यांच्या मनावर वजन पडे. असा आवाज हीं एक ईश्वरदत्त देणगी आहे. परंतु कित्येक गायनसम्राट् मूळ आवाजी सुरेल नसतांना केवळ अलोट मेहनत घेऊन ती चित्ताकर्षक करतात, तसें वक्त्याला करतां येणें शक्य आहे. शास्त्र्यांची एक गोष्ट लक्षांत ठेवणें जरूर आहे कीं, देवानें दिलेली देणगी त्यांनीं काळजीपूर्वक जतन केली आणि तिच्यावर उत्कृष्ट संस्कार करून तिचें सौंदर्य त्यांनीं अपरिमित वाढविलें.

शास्त्र्यांचें भाषण अगदीं संथ सुरू होई. प्रत्येक शब्दाचा उच्चार स्पष्ट व आघातपूर्ण असे. उच्चार शुद्ध असले तरी त्यांत स्वतंत्र डौल असे. केवळ साहेबांच्या उच्चारपद्धतीचें अनुकरण म्हणजे उत्तम इंग्रजी असला गैरसमज त्यांच्या डोक्यांत नव्हता. उलट, इंग्रजी माणसालाहि अनुकरणीय वाटावें, असें उच्चाराचें मोहकपण त्यांच्या वक्तृत्वांत होतें. मृत्यूपूर्वीं महाराष्ट्राचे लोकप्रिय डॉक्टर भडकमकर यांच्या षष्ठ्यब्दिपूर्तीच्या समारंभास अध्यक्ष म्हणून नाम. शास्त्री आले होते. हा समारंभ केवळ अपूर्व असाच झाला. राजेमहाराजे, उद्योगसम्राट्, अधिकारी, कलावंत, विद्वान् आणि सामान्य रसिक यांचा एवढा मोठा मेळावा क्वचितच जमला असेल. शास्त्री प्रकृतीनें खंगलेच होते. अध्यक्षीय भाषणास सुरुवात करतांना ते म्हणाले, "आजच्या श्रोतृवृंदाची ही प्रचंड संख्या आणि त्यांत नामवंत मंडळींची एवढ्या मोठ्या प्रमाणावर उपस्थिति पाहून मी अगदीं भारावून गेलों. मी प्रवास करण्याच्या स्थितींत नव्हतों. परंतु डॉक्टर भडकमकर यांनीं एकदां माझे प्राण वांचविले होते तेव्हां त्यांच्या जीवनांतील या महत्त्वाच्या प्रसंगीं प्राण

धोक्यांत घालूनहि येथवर यावें, अशी मला उत्कट इच्छा झाली." यानंतर वैद्यक व्यवसाय हा जगांतला अत्यंत श्रेष्ठ असा व्यवसाय कसा आहे आणि याविषयीं इंग्लंडनें केवढीं उच्च मूल्यें प्रस्थापित केलीं आहेत, याची सुरस माहिती शास्त्र्यांनीं दिली. यावेळीं सभा तटस्थ राहून एका उदात्त प्रवचनाचा लाभ घेत होती आणि शेवटीं आपल्या भावनाप्रधान शब्दांत शास्त्री म्हणाले, "डॉक्टर महाशय, या थोर परंपरेंतच आपलें स्थान आहे." तेव्हां सारी सभा अक्षरशः गहिंवरली. आपण ज्या थोर भिषग्वराच्या सत्कारासाठीं येथें आलों आहोंत, त्याचें खरें श्रेष्ठपण आज आपणांस कळलें असेंच सर्वांना वाटलें.

विमान हळूहळू जमिनीवरून गति घेत ज्याप्रमाणें अंतराळांत चढतें त्याप्रमाणें शास्त्र्यांचें वक्तृत्व असे. त्यांच्या त्या वक्तृत्वयानांत श्रोते उत्सुकतेनें बसत आणि कांहीं वेळानें आपण ध्येयाच्या आकाशांत आलों आहों, असें त्यांना आढळून येई. प्रत्येक माणसामध्यें सद्भाव असतो, त्याप्रमाणें ज्ञाताच्या पलीकडे जाण्याची शक्ति पण असते. पण सामान्य माणूस स्वावलंबनानें कांहीं उदात्त विचारांची पातळी गाठूं शकत नाहीं. त्यासाठीं कलावंताचें त्यास साह्य होतें. या दृष्टीनें वक्ता हा फार मोठा कलावंत नाहीं काय? श्रोत्यांच्या सद्भावना फुलवून त्याला ध्येयाच्या उच्च शिखरावर घेऊन जाण्याचें काम शास्त्र्यांसारखा उत्तम वक्ता करतो. कांहीं वक्ते आपल्या भाषणाचे शेवटीं उदात्त वातावरण निर्माण करतात, पण पुनः सामान्य पातळीवर येऊन सारा डौल बिघडवून टाकतात. शेवटीं उथळ उल्लेख किंवा कोट्या करणें किंवा आपण काय म्हणालों याचें पुनः टिपण देण्याचा यत्न करणें यामुळें भाषणाचा शेवट नासून जातो. वक्त्यानें श्रोत्यांना ज्या उंच पातळींवर नेलें असेल, तेथेंच ठेवून भाषण संपवायचें ही खरी कला होय. शास्त्री या कलेंत अत्यंत निपुण होते.

## कमला-व्याख्यानमाला

कलकत्ता विद्यापीठामध्यें सर आशुतोष मुकर्जी यांनीं आपली प्रिय कन्या कमला हिच्या स्मरणार्थ एक व्याख्यानमाला ठेविली आहे. दरवर्षीं कोणातरी

वक्तृत्त्वसंपन्न गाढ पंडितास ही व्याख्यानमाला देण्याची विनंति करण्यांत येते. इ.स. १९२७ सालीं नामदार श्रीनिवासशास्त्री यांना ही व्याख्यानमाला गुंफण्यास निमंत्रण आलें. नागरिकांच्या हक्काबद्दल अत्यंत सोप्या शब्दांत शास्त्र्यांनीं ह्या आपल्या व्याख्यानांत चर्चा केली आहे. आज स्वतंत्र भारताची उभारणी करतांना नागरिक हक्कांविषयीं विशेष विचार केला जातो. त्यावेळीं तशी स्थिति नव्हती. तरी माणसाच्या मूलभूत हक्कांविषयीं शास्त्र्यांनीं फार उदार विचार मांडले आहेत. आजच काय परंतु भविष्यकाळींहि त्यांचा ताजेपणा फारसा कमी होणार नाहीं. मनुष्याचे हक्क म्हणजे काय याविषयीं शास्त्री अगदीं सुबोध रीतीनें सांगतात—

> " समाजानें मान्य केलेली पद्धति, नियम अथवा व्यवस्था हें हक्कांचें मुख्य तत्त्व होय. या तत्त्वांमुळें नागरिकाच्या नैतिक कल्याणाचा मार्ग खुला होतो. "

मात्र हे नागरिक हक्क केवळ मीच एकटा उपभोगेन असा आप्पलपोटेपणा नाणसांत उपयोगी नाहीं. हक्क हे आपले असतात त्याप्रमाणें दुसऱ्याचेहि असतात. दुसऱ्याच्या हक्कांना जर आपल्या हक्कांनीं बाध आला तर नागरिक स्वातंत्र्य कोठें राहिलें ? याविषयीं शास्त्री म्हणतात.

> " आपण सदैव आक्रमकाच्या विरुद्ध उभे राहिलें पाहिजे. केवळ आपल्या हक्कावर गदा आली म्हणजेच खवळून उठावयाचें, असें नाहीं. आपल्या शेजाऱ्याच्या स्वातंत्र्यावर घाला पडला, किंबहुना आपल्या शत्रूचे हक्क अनिष्ट मार्गांनीं तुडवले जाऊं लागले, तरीहि आपण प्रतिकार केला पाहिजे. नागरिक कर्तव्याचें हेंच मुख्य बीज आहे. "

या व्याख्यानांतून शास्त्र्यांनीं उत्तम नागरिकाचा आदर्श उभा केला. जगांत संघर्ष होण्यास जीं कारणें होतात तीं व्यक्तीनें आपल्या सामाजिक जीवनांत कशीं दूर करावींत याचें उत्तम मार्गदर्शन त्यांनीं या व्याख्यानमालेंत केलें. या सर्व व्याख्यानांवर सुसंस्कृति आणि उदारमतवाद यांची सात्त्विक अशी प्रभा पसरली आहे. हीं व्याख्यानें म्हणजे नागरिकशास्त्रावरील एक महत्त्वाचा प्रबंधच होय.

## ' माझे गुरु '

म्हैसूर येथें आपले पूज्य गुरु नामदार गोखले यांच्यासंबंधीं ना. शास्त्री यांनीं एका व्याख्यानमालेंत सुंदर प्रवचन केलें आहे. पुणें येथें इ. स. १९२३ मध्यें गोखले यांच्या स्मृतिदिनाचे वेळीं शास्त्र्यांचें एक उत्कृष्ट भाषण झालें. या भाषणांत त्यानीं गोखल्यांच्या थोरपणाचें रहस्य तर हळुवारपणें सांगितलेंच, परंतु एकंदर थोर विभूतींच्या अंतरंगांत शिरण्याची गुरुकिल्लीच जणूं श्रोत्यांच्या हातीं दिली.

> " मीं गोखल्यांच्या अमर व्यक्तित्वाचें मुख्य वैशिष्टय विस्तारें-करून सांगितलें तर तुम्ही तें ऐकून घ्याल अशी आशा वाटते. तुम्हां सर्वांना ठाऊक आहे, आपल्या कार्याचें त्यांना इतकें महत्त्व वाटे कीं, त्यांतला कुठलाहि तपशील त्यांना क्षुद्र वाटत नसे. आपलें कार्य सर्वांगसुंदर करण्यासाठीं ते अपरंपार श्रम घेत. परंतु इतकें असून खऱ्या थोर पुरुषाप्रमाणें काल हा बदल करणारा आहे, हें जाणून आपल्या मागें भारत-सेवक-समाजाच्या सदस्यांनीं अमुकच निर्णय घ्यावेत अशा तऱ्हेनें त्यांनीं हात बांधून ठेवले नाहींत. "

आपल्या सामान्य माणसाचें नेमकें या विरुद्ध कसें असतें आणि आपण आपल्या इच्छा व आपले निर्णय मागच्या माणसावर कसे लादतो, हें शास्त्र्यांनीं सांगून या पार्श्वभूमीवर गोखल्यांच्या थोरवीचें सुंदर चित्र रेखाटलें.

> " जीवनाच्या शेवटच्या क्षणीं अनासक्तीची वृत्ति त्यांच्यांत आली होती, याविषयीं मला शंका नाहीं. ते आपल्याशीं म्हणाले, ' मी आतां जात आहें. माझें काम दुसऱ्याच्या हातांत जाणार. आतां योग्यायोग्य काय तें ठरविण्याची जबाबदारी त्यांच्यावर, माझ्या मतें जें उत्कृष्ट होतें त्याची स्मृति माझे निष्ठावान् अनुयायी ठेवतीलच. पण उत्कृष्ट काय याविषयीं त्यांचें मत कदाचित् वेगळेंच असेल. मी त्यांच्यावर बंधनें ठेवणार नाहीं.'

अशा रीतीनें संन्यासाच्या भरांत मायामोहांतून वर येण्याचा मोठा प्रयत्न करून त्यांनीं स्वतःला आपल्या कार्यांतून बाहेर खेचलें. ही अनासक्त वृत्ति भारतांतील असामान्य पुरुषांनीं जाणली आहे व अनुभवली आहे. अनेकदां विनंति करूनहि गोखल्यांनीं आपलें मौन सोडलें नाहीं हें त्यांच्या थोरवीचें निदर्शक आहे. ”

हें सारेंच भाषण अगदीं पहिल्या दर्जाचें आहे. गाढ आदराची भावना, आठवणी व आख्यायिका यांनीं मृत महात्म्याचें शब्दचित्र हुबेहूब रेखाटलेलें, आणि उच्च मूल्यांची पखरण जागोजाग केलेली. या भाषणांत लहान लहान वाक्यांनीं थोर तत्त्वें व्यक्त करण्याची अजब कुशलता नामदार शास्त्री यांनीं दाखविली आहे.

## मदिरा कीं नवनीत ? ‘ भावनेची भाषा ’

कित्येकदां चांगलीं माणसें उपमा देतात पण त्यायोगें उपमेयाचें नीट वर्णन होण्याऐवजीं त्याची विकृतिच होते. मद्रासचे सत्यमूर्ति हे मोठे खंदे व झुंजार वक्ते. एकदां शास्त्र्यांचें भाषण झाल्यावर सत्यमूर्ति बोलावयास उठले. सत्यमूर्तींनीं आरंभच पुढील वाक्यानें केला, कीं, ‘ शास्त्र्यांच्या भाषणाची मदिरा घेऊन तुम्ही धुंद झाला आहांत तेव्हां माझें ताक आतां तुम्हांला काय आवडणार ? ’ उपमा विचित्र होती. शास्त्र्यांच्या भाषणानें माणसाचीं मनें प्रसन्न होत आणि अंतराळीं विहरूं लागत हें खरें. पण तीं धुंद होत नसत. सत्यमूर्तींनीं शास्त्र्यांच्या भाषणाची मोहिनी किती जबरदस्त पडते, हें सांगण्याकरितां मदिरेचें उपमान वापरलें. पण या सात्त्विक ब्राह्मणाच्या नवनीतासारख्या वाणीला आपण निष्कारण तामसी रूप देत आहों याचें सत्यमूर्तींना भान राहिलें नाहीं. शास्त्र्यांच्या भाषणांत सुगंध असे. पण अंधारांत दुरून वाऱ्यावरून येणाऱ्या रातराणीच्या सुवासासारखा तो मंदमधुर भासे. उंची अत्तराचा घमघमाट सुटतो तसा त्यांच्या भाषणांत उग्र दर्प कधींहि येत नसे. आवाजाचा स्थूल व सूक्ष्म चढउतार ही एक स्वतंत्र भाषाच आहे. एका इंग्रजी पंडितानें या

भाषेला ‘ भावनेची भाषा ’ असें सुंदर नांव दिलें आहे. ही ‘ भावनेची भाषा’ सर्व जगालाच कळते असें तो म्हणतो. ना. शास्त्री या भाषेंतले प्रभुच होते असें म्हणावें लागेल. त्यांच्या आवाजांतील कंप, ओलावा, गांभीर्य इत्यादि सूक्ष्म छटांमुळें शब्दांचे अर्थ न कळणारा माणूसहि शास्त्री कोणत्या पातळीवर आहेत, कोणती रसनिर्मिति करीत आहेत, हें स्थूल मानानें जाणूं शके. फार थोडे वक्ते ही ‘ भावनेची भाषा ’ इतक्या सुंदर रीतीनें बोलूं शकतात. शास्त्र्यांची प्रवृत्ति गंभीर होती. त्यांचें भाषण नेहमींच सरस होई, पण त्यांत विनोदाचा शिडकावा क्वचित्च आढळे. मात्र ज्यावेळीं ते विनोदाची नाजूक डूब देत तेव्हांहि त्यांचें वाक्चातुर्य दिसून येई. ऑस्ट्रेलियांत एका समारंभप्रसंगीं आपल्या नगरसंचाराबद्दल बोलतांना ते म्हणाले :

“ हें तुमचें नगर मला सर्वत्र दाखविण्यांत आलें. या अद्भुत स्थळीं वळणावळणावर नवें सौंदर्य मला दिसलें आणि आनंदाचे मळे पिकले. कदाचित् एकाद्या लाजाळू सुंदरीप्रमाणें अजून कित्येक रम्य स्थळें या नगरीनें मजपासून झांकून, ठेविलीं असतील आणि तीं मला कधीं दिसणारहि नाहींत. ( हंशा ). ”

## नैसर्गिक विकास

अनेक मुद्यांचे परिच्छेद एकमेकांना डकवून केलेली गोधडी, हें खरें वक्तृत्व होऊं शकत नाहीं. कांहीं वक्ते माहिती पुष्कळ सांगतात. त्यांचा आशयहि विचार करण्यासारखा असतो. परंतु एका मुद्यांतून दुसरा कोंब फुटावा, असा विवेचनाचा नैसर्गिक व सहज विकास त्यांना साधत नाहीं. कळी, फूल, फळ हा जसा वनस्पतींच्या वाढीचा क्रम असतो, त्याप्रमाणें भाषणाचा आरंभ, मध्य व शेवट तीनहि एकाच वस्तूचीं रूपांतरें असलीं पाहिजेत. श्रीनिवासशास्त्री यांचा भाषणाचा विकास असा जिवंत व नैसर्गिक वाटे. भडक चित्रें मुद्दाम रंगविण्याकडे त्यांचा कल मुळींच नसे. पण आपली समंजस

व रास्त भूमिका अधिक स्पष्ट करण्यासाठीं ते कित्येकदां थोडेसे गडद रंग आपल्या शब्दचित्रांत भरीत.

रौलेट बिलावरील त्यांच्या भाषणांत हा प्रकार दिसून येतो. रौलेट बिल हें इंग्रज सरकारनें भारतीयांचे नागरिक हक्क नष्ट करून टाकण्याकरितां पुढें आणलें होतें. हा ‘ काळा ’ कायदा भयंकर स्वरूपाचा आहे, अशी हिंदी लोकांची खात्री पटली होती. या कायद्याच्या निषेधासाठीं ‘ काळा ’ रविवार पाळण्याचा आदेश गांधीजींनीं दिला होता आणि तो भारतीयांनीं फार मोठ्या प्रमाणावर पाळला. असला हा कायदा कायदेमंडळाच्या ऐरणीवर घडला जात असतांनाच ना. शास्त्र्यांनीं त्याला कडक विरोध केला. या कायद्यानें राष्ट्रीय चळवळ मारली तर जाणार नाहींच पण अराजक लोकांना मात्र फावेल असा स्पष्ट इषारा त्यांनीं दिला.

> “ अराजक वृत्तीच्या माणसाला राजकीय सुधारणा नको असतात हें कटु सत्य आहे. कां ? तेंच आम्हीं समजून घेणें जरूर आहे. जो संघर्ष व लोकांच्या भावनांची जी खळबळ अराजक माणसाला पाहिजे असते, ती सरकार लोकसत्तेकडे झुकल्यास नष्ट होईल असें भय त्याला असतें. जबाबदारीचें स्वराज्य दिलें, जनतेच्या कल्याणाचे कायदे पास झाले तर जनता कांहीं काळ शांत राहील आणि अराजक माणसाला आपलें कार्य करणें कठीण होईल. ”

रौलेट ॲक्टसारख्या कायद्यांनीं अराजकांचा हेतु सफल होईल असें त्यांनीं बजाविलें.

शास्त्र्यांचें वक्तृत्व आवाहन करणारें असे, आदेश देणारें नसे. तरी कित्येकदां श्रोत्यांची भावना तापली म्हणजे विधायक आदेश देण्याचा ते यशस्वी प्रयत्न करीत. नाशिक येथील परिषदेंत ते म्हणाले :

> “ या, सर्वजण या आणि शाश्वतासाठीं झटा. ज्यांच्या अंतःकरणाला संवेदना आहेत, ज्यांच्या आत्म्यांना उच्च हेतु आहे त्या सर्वांनीं या थोर

कार्यांत सहभागी व्हावें. तुम्हीं थोडी भर घाला किंवा जास्त घाला, तुम्हीं लेखणी वापरा किंवा वाणी वापरा, तुमचीं अंतःकरणें शुद्ध पाहिजेत आणि तुमचा निश्चय मर्दासारखा असला पाहिजे. संकटें आणि अडचणी यांचा आपण बाऊ करतां कामा नये. त्या तर मोठ्या आहेतच पण आपल्या बाजूच्या लढाऊ शक्तीहि कांहीं कमी नाहींत. हिंदी रक्त आणि हिंदी धन कधींहि वायां जाणार नाहीं."

## जगदैक्याचीं स्वप्नें

आधुनिक जगांत जीं तळमळीचीं माणसें जगच्छांतीसाठीं झटत राहिलीं, त्यांत श्रीनिवासशास्त्र्यांना पहिल्या श्रेणींत बसवावें लागेल. भाषण परिषदेंत करायचें असो किंवा मेजवानीनंतर आभाराचें असो, माणसामाणसांत एकोपा व प्रेम निर्माण व्हावें, हा त्यांचा सूर असे. ने. ना. शास्त्री ब्रिटिश वसाहतीच्या दौऱ्यावर निघाले तेव्हां सिमला येथें त्यांना निरोप देण्याकरितां एक थाटाचा उपहार देण्यांत आला. ( इ. स. १९२२ ) त्यावेळीं शास्त्र्यांनीं अत्यंत संस्मरणीय असें भाषण केलें. 'एका ज्वालामुखीचा गडगडाट ऐकूं येत आहे आणि लौकरच पृथ्वी शेषाच्या टाळूपर्यंत हादरेल असा उत्पात होणें शक्य आहे.' असें उद्गार काढून शास्त्र्यांनीं मनुष्यांनीं हें संकट टाळण्याकरितां काय केलें पाहिजे याचें उत्कृष्ट मार्गदर्शन केलें. जगच्छांतीचीं स्वप्नें पाहणारे ते सत्त्वगुणी महापुरुष होते.

बानर्जी यांच्याप्रमाणें शास्त्र्यांचा वक्तृत्वाचा धों धों असा उंच जलप्रपात कधीं दिसला नाहीं. त्यांचें वक्तृत्व रणशिंग नव्हतें, तर रुद्रवीणा होती. क्वचित् स्निग्धगंभीर तर क्वचित् मधुर असे सुस्वर तीमधून ऐकूं येत. विध्वंस नव्हे तर रचना हें शास्त्र्यांचें जीवितकार्य होतें आणि त्यासाठीं त्यांनीं कित्येकदां सर्व पक्षांचीं बोलणीं सोसूनहि आपली उच्च भूमिका कायम ठेविली. भारताला एक थोर संस्कृति आहे, परंतु पाश्चात्य लोकसत्तेनेंहि नवीं मूल्यें निर्माण केलीं आहेत. या दोन्हींचा संगम झाला म्हणजेच जगाची

सर्वांगीण प्रगति होऊन हिंसा, द्वेष इ०ना मूठमाती मिळेल, अशी शास्त्र्यांची श्रद्धा होती. भारताचा सांस्कृतिक संदेश जगभर पोंचवावयाचा आणि बाहेरील लोकांच्या भावना-कल्पना जाणून त्या भारताच्या अंतरंगाला समजावून द्यायच्या, हें कार्य आधुनिक भारतांत अनेक थोर लोकांनीं केलें. विवेकानंदांनीं धर्मक्षेत्रांत तें केलें; रवींद्रांनीं साहित्याच्या द्वारां केलें; राधाकृष्णन् तात्त्विक भूमिकेवरून तें कार्य करीत आहेत; याच कार्यांत नेक नामदार श्रीनिवासशास्त्री यांनीं आपलें जीवित घालविलें. श्रीनिवासशास्त्र्यांची भूमिका राजकीय होती आणि वाणी हें त्यांचें प्रमुख साधन होतें. आज त्यांचीं व्याख्यानें वाचलीं तर संस्कृतीच्या विद्यार्थ्यांना त्यांपासून पुष्कळ शिकतां येईल. जगांतील दूरदूरचीं माणसें एकमेकांना जाणूं लागलीं, एकमेकांच्या उपयोगी पडूं लागलीं, राष्ट्राराष्ट्रांतली समजूत वाढली तर मानवी इतिहासांत एक नवें सुवर्णपर्व निर्माण होईल. हें पर्व उघडावें यासाठीं आजवर मानवतेच्या अनेक हितकर्त्यांनीं आपली हयात घालविली. त्यांच्या उज्ज्वल मालिकेंत श्रीनिवासशास्त्री यांचें स्थान अढळ आहे.

## अभ्यासाच्या वाटा

१. श्रीनिवासशास्त्री यांनीं राजकारणांत कोणती कामगिरी केली तें सविस्तर लिहा.

२. "प्रभावी वक्ते" या दृष्टीनें श्रीनिवासशास्त्री यांचे अंगीं कोणते गुण होते ?

३. श्रीनिवासशास्त्री यांच्या वक्तृत्त्वांतील विशेष कोणते ? तें लिहा.

४. "थोर वाचस्पति" हे गौरवपर उद्गार श्रीनिवासशास्त्र्यांच्या बाबतींत कोणी काढले ? ही पदवी त्यांना कां देण्यांत येते ?

५. श्रीनिवासशास्त्री यांनीं केलेल्या कांहीं उत्कृष्ट व्याख्यानांतील नमुनेदार परिच्छेद लिहा, ही व्याख्यानें कोणत्या प्रसंगीं झालीं तेंहि नमुद करा.

इ. स. १९५०च्या हिंवाळ्यांतली गोष्ट. पुणें विद्यापीठातर्फे इंडियन् सायन्स कॉंग्रेसचें अधिवेशन पुण्यास बोलावण्यांत आलें होतें. फर्ग्युसन् कॉलेजच्या मागें टेकडीजवळ भव्य शामियान्यांत अधिवेशन सुरू झालें.



स्वदेशांतीलच, नव्हे तर परदेशांतीलहि अनेक नामांकित विज्ञानमहर्षी या कॉंग्रेसला आलेले आणि भारताचे आवडते पंतप्रधान पं. नेहरू हे मुद्दाम या सोहळ्यासाठीं हजर राहिलेले. मग उत्साहाची भरती काय विचारतां ? पण सुरवातीलाच कांहीं विचित्र घोटाळे झाले. एकाद्या नवशिक्या खेळाडूनें कॅरमबोर्डवर रचून ठेवलेल्या डावाला टोला मारून आरंभ केला तर दोन्ही पक्षांच्या चकत्या अगदीं वेड्यावाकड्या उधळल्या जातात आणि प्रथम कांहीं वेळ डाव दोन्ही पक्षांना अडचणीचा होऊन बसतो, तसें झालें. आरंभच नीट वेळेवर झाला नाहीं. पं. पंतप्रधान आले म्हणून आदरानें व आनंदानें सभा उभी राहिली तों ते पंतप्रधान नसून,

तो मुंबईचा एक साधा मंत्री निघाला आणि खुद्द पंडितजी आले तेव्हां त्यांना उत्थापन देण्याकडे सभेचें लक्ष कुणी वेधलें नाहीं ! प्रास्ताविक भाषणांत एका जबाबदार व्यक्तीनें या अधिवेशनाचा क्रमांक चुकीचा सांगितला आणि पंतप्रधान या अधिवेशनाचे अध्यक्ष आहेत असा चुकीचा उल्लेख केला. वास्तविक नियोजित अध्यक्ष होते प्रो. महालनवीस. ही प्रमादपरंपरा कुठवर चालणार कळेना ! एकंदर वातावरण अगदीं बदसूर होऊन गेलें. इतक्यांत पुणें विद्यापीठाचे कुलगुरु ने. ना. डॉ. मुकुंद रामराव उर्फ बाबासाहेब जयकर बोलायला उभे राहिले. नुसत्या सलामीच्या वाक्यांनीं श्रोतृवृंदातली खळबळ एकदम थांबली. गान–सम्राटानें दोन तंबोऱ्यांच्या साथीनें नुसता स्वर लावण्यास सुरुवात केली कीं, प्रत्येक श्रोत्याच्या अंतःकरणाचीं गिरिकंदरें त्यायोगें घुमघुमून निघतात, त्याप्रमाणें जयकरांच्या गंभीर, लयबद्ध, व वेधक वाणीनें श्रोत्यांना वेढून टाकलें. पाहिल्या वक्त्याच्या भाषणांत अधिवेशनाचा क्रमांक चुकला होता, तो अगदीं सफाईनें दुरुस्त करून प्रा. महालनवीस यांचा त्यांनीं अध्यक्ष म्हणून परिचय करून दिला. पंडितजी व्यासपीठावर आहेत, याची मातब्बरी तर सांगायची, पण ते अध्यक्ष नाहींत हेंहि सुचवायचें अशी अवघड कसरत मोठ्या डौलदारपणें त्यांनीं केली. "आपले आवडते पंत-प्रधान हे येथें अध्यक्ष म्हणून आलेले नसून प्रस्तुत महोत्सवाची शोभा वाढविण्या-साठीं आलेले आहेत." अशी कुशल शब्दयोजना त्यांनीं केली. आणि मग, "पुणें विद्यापीठ वय आणि आकार यांनीं लहान असलें, तरी अनुग्रह करण्याची त्याची व्याप्ति अथवा मर्यादा मात्र लहान नाहीं." असा प्रस्ताव करून शेवटीं ज्ञान–विज्ञानचर्चेच्या उंच पातळीवर लोकांना नेलें. दहा-पंधरा मिनिटांचेंच भाषण. पण किती सुंदर, किती हृदयस्पर्शी ! तें आंतरराष्ट्रीय ख्यातीचें विद्वन्मंडळ चकित होऊन गेलें. घाटाच्या माथ्यावर आल्यावर जसें आपण आश्चर्यानें आल्या वाटेकडे व तळच्या प्रदेशाकडे पाहतों तद्वत् कुलगुरु आसनस्थ झाल्यावर श्रोते त्यांच्या भाषणाचा विचार करूं लागले. समयज्ञ आणि कलाचतुर वक्ता म्हणून जयकरांची प्रसिद्धि आहे, ती योग्यच आहे असेंच सर्वजण म्हणत होते.

## बालपण व शिक्षण

जयकरांचें कुटुंब पाठारे प्रभुज्ञातींत फार प्रसिद्ध आहे. जयकरांचे मातामह रावसाहेब वासुदेव जगन्नाथ कीर्तिकर हे व्यासंगी कार्यकर्ते होते. लक्ष्मी व सरस्वती दोघींचीहि कीर्तिकरावर अलोट कृपा. जयकरांचे वडील त्यांच्या जन्मकाळींच निवर्तले. तेव्हां रावसाहेब कीर्तिकरांनीं आपल्या एकुलत्या एक मुलीच्या या मुलाचें फार काळजीपूर्वक संगोपन केलें. आपल्या सात्त्विक व उदार मातेचाहि जयकरांच्या जीवितावर फार परिणाम झाला. ऐश्वर्यांत उणें कांहींच नव्हतें. पण या ऐश्वर्यांत नैसर्गिक बुद्धिमत्तेचा आपल्या ' मॅक'च्या अंगचा अंकुर सतत वाढीला लागावा याची विलक्षण दक्षता आजोबा घेत. ( जयकरांना त्यांचे आजोबा गमतीनें 'मॅक' म्हणत.'मॅक्' हें मुकुंदचें इंग्लिश धर्तीवरील संक्षिप्त रूप.) जी इंग्रजी भाषा जयकर आज सहज लीलेनें वापरून शेंकडों सूक्ष्म अर्थध्वनींचें जग श्रोत्यांपुढें निर्माण करतात, तिचें अध्ययन कौमारकालांत आजोबांनीं आपणांकडून कसें करवून घेतलें याविषयीं ते सांगतात, " माझे आजोबा इंग्रजी उच्चारांविषयीं फार दक्ष असत. उन्हाळ्याच्या सुट्टींत आम्हीं लोणावळ्यास जात असूं. तेव्हां पांच पंचवीस उत्तम इंग्रजी पुस्तकें मला ते घेऊन देत. सुट्टींत ऐषाराम, क्रीडा, करमणूक यांना उणीव नसली तरी एवढीं पुस्तकें वाचून झालींच पाहिजेत, असा त्यांचा दंडक असे. आणि या पुस्तकांतील सुंदर भाषा व उत्तम विचार अधोरेखित करून मला ते समजावून देत व पुनः पुनः वाचून घेत. संस्कृत उत्तम व्हावें यासाठीं मला शिकवावयाला एक मीमांसक शास्त्री त्यांनीं बारा वर्षें ठेविला होता."

नातवानें आजोबांच्या आस्थेचें चीज केलें. वयाला अजून पंचविशीहि झाली नसेल तो एम्. ए. व एल्. एल्. बी. अशा पदव्या जयकरांनीं यशस्वी रीतीनें मिळविल्या. इ. स. १९०२ मध्यें हा शिक्षणक्रम पूर्ण झाला. आतां वकिली सुरू करावयाची. परंतु जयकरांचा कल स्वभावतः वकिलीकडे नव्हता. ज्ञान-संपादन आणि ज्ञानदान हीं त्यांना पवित्र व्रतें वाटत. नुकत्याच स्थापन

झालेल्या आर्यन् एज्युकेशन सोसायटीच्या शाळेंत अध्यापनाचें काम त्यांनीं पत्करलें. प्रख्यात कायदेपंडित म्हणून पुढें चमकूं लागल्यावरदेखील, एल्फिन्स्टन् कॉलेजमध्यें प्रोफेसर व्हावें ही आपली महत्त्वाकांक्षा होती, असें जयकर बोलून दाखवीत. असो. पण जयकरांनीं अध्यापनांत गुंतून पडावें असा योग नव्हता. विलायतेस जाऊन त्यांनीं बॅरिस्टर होऊन यावें, असें आजोबा व मातुःश्री या दोघांनाहि वाटे. पण पोर इतक्या दूर आपणांपासून पाठविण्याची कल्पना त्यांना असह्य होई. तरी अखेर जयकर विलायतेस गेले आणि बॅरिस्टर होऊन आले.

## साधना

वक्तृत्वाची साधना जयकरांनीं कुमार वयांतच सुरू केली. पाठारे प्रभु-समाजांत दर शनिवारीं एक सभा होई. या सभेंत कुणीतरी एकादा विषय घेऊन बोलावें अशी पद्धति असे. पण जयकरांच्या संकोची स्वभावामुळें ते या सभेंत भाग घेण्याचें टाळीत. अखेर त्यांना सभासदांनीं एकदां अध्यक्षच म्हणून नियोजित केलें. तेव्हां मात्र इलाजच उरला नाहीं आणि आपलें पहिलें भाषण त्यांनीं अगोदर तयारी करून उत्तम वठविलें. पुढें हा क्रम अखंड चालू राहिला आणि जयकर कायदेपंडित होऊन परदेशहून परतले तेव्हां वाणीची सिद्धि घेऊनच त्यांनीं वरिष्ठ न्यायालयांत प्रवेश केला. व्यवसायांतलें यश जरी त्यांना हळूहळू मिळत गेलें तरी आपल्या पक्षकाराची बाजू मांडतांना प्रथमपासूनच मुद्देसूदपणा, कायद्याचें ज्ञान व वक्तृत्व हे जयकरांचे गुण प्रकट झाले. त्यांचें न्यायमंदिरांतील एक भाषण ऐकून सर फेरोजशहा मेथा हे या तरुण बॅरिस्टराचें अभिनंदन करण्यास आले. हिंदु कायदा हा जयकरांचा खास विषय झाला आणि आज हिंदुधर्मशास्त्राविषयींची त्यांची अभिज्ञता त्रिखंडांत विख्यात आहे.

## राजकीय जीवन

जयकर गर्भश्रीमंत, सुविद्य व सौंदर्यवादी. राजकारणासारख्या धकाधकीच्या विषयाकडे त्यांचा विशेष ओढा नसे. किंबहुना राजकारण हें त्यांच्या गुण-

संपदेमुळें त्यांच्यावर लादलें गेलें. मुंबई नगरपालिकेचे ते सभासद होते आणि पुढें सामाजिक कार्यांत ते भाग घेत. या प्रभावी वक्त्याला लोकमान्य टिळकांनीं होमरूल लीगच्या राजकारणांत ओढलें. इ. स. १९१८ सालीं लोणावळें येथें प्रांतिक परिषदेचे जयकर अध्यक्ष होते. आपल्या देशाची स्वराज्याची मागणी जयकर आपल्या वाक्चातुर्यानें परदेशांत पटवून देतील, हा टिळकांना विश्वास वाटे. नंतर जालियनवाला बाग प्रकरणांत राष्ट्रीय सभेनें चौकशी-कमिटी नेमली. तिचें काम सतत दोन वर्षें अंग मोडून जयकरांनीं केलें. गांधी युगांत जयकर कांहींसे गांधी-विरोधकच होते. गांधी विरक्त तर जयकर राजविलासी; गांधी सत्यपूजक तर, जयकर सौंदर्य-शोधक, गांधीजींचें राजकारण बहुजन-समाजांत चाललेलें तर जयकरांची प्रतिभा उच्च बौद्धिक वातावरणांतच चमकावयाची. कौन्सिल-प्रवेशाला गांधींचा विरोध तर तो जयकरांना मुख्य कार्यक्रम वाटे. असे अनेक प्रवृत्तिभेद दोघांत होते. पण प्रथम स्वराज्य-पक्ष, नंतर प्रतिसरकार पक्ष यांत राहून जयकरांनीं गांधीजींच्या धोरणाला कडाडून विरोध केला, तरी दोघांचें मनोमन सामरस्य फार असे. अनेक महत्त्वाचे निर्णय घेतांना गांधीजी प्रथम जयकरांचा सल्ला घेत. उलट, सरकार व गांधीजी यांच्यांत समेट घडवून आणण्यासाठीं जयकरांनीं लोकांची अप्रियता पत्करूनहि 'शांतिदूता'चें काम अनेकदां केलें.

मुंबई आणि मध्यवर्ती कायदेमंडळांत जयकरांच्या वक्तृत्वाला खरें उधाण आलें. मध्यवर्ती कायदेमंडळांत तर कांहीं दिवस ते विरोधी पक्षाचे नेतेहि होते. पुढें मंडलाकार परिषदेच्या तीनहि बैठकांना भारताचे प्रतिनिधी म्हणून जयकर लंडनला गेले. यावेळीं जयकरांच्या वक्तृत्वाचा सुगंध सर्वत्र पसरला. मोठमोठे दिमाखखोर इंग्रज मुत्सद्दी आणि गर्विष्ठ गोरे उमराव जयकरांचें भाषण सुरू झाले कीं एकचित्त होऊन तें ऐकूं लागत. "तुमच्या वक्तृत्वकलेचा एकषष्ठांश मला द्याल तर मी संतुष्ट होईन." असें लॉर्ड हॅलिफॅक्स त्यांना म्हणाले. सडेतोड पण संयमी, साधार पण सुबोध, मधुर पण आशयपूर्ण असें वक्तृत्व करून परदेशापुढें जयकरांनीं आपल्या मातृ-

भूमीची बाजू मोठ्या कौशल्यानें मांडली. इ. स. १९३७ सालीं भारतांतील उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ति म्हणून त्यांची नेमणूक झाली. ग्रेट ब्रिटनमधील प्रिव्ही कौन्सिलचे ते न्यायधीश होतेच.

## अनेक क्षेत्रात गौरव

जयकरांच्या तल्लख बुद्धीला अनेक पैलू आहेत. त्यांच्या सुसंस्कृत व संपन्न व्यक्तित्त्वामुळें ते जेथें जातील, तेथें प्रकाश व माधुर्य यांची समृद्धि होते. मुंबई येथें इ. स. १९३८ मध्यें भरलेल्या महाराष्ट्र साहित्य संमेलनाचे ते स्वागताध्यक्ष होते. अ. भा. शारीरिक शिक्षण परिषदेनेंहि त्यांच्या नेतृत्त्वाचा आधार घेतला (इ. स. १९४२). पाटणा, लखनौ, नागपूर इत्यादि विद्यापीठांनीं पदवीदान समारंभाचे पाहुणे म्हणून त्यांना बोलावून त्यांच्या उत्कृष्ट दीक्षान्त भाषणांचा लाभ तरुणांना दिला. अलाहाबाद व ऑक्सफोर्ड या विद्यापीठांनीं दिलेल्या पदव्या म्हणजे जयकरांच्या विद्वत्तेवर देशी विदेशी विद्वज्जनांनीं केलेलें शिक्कामोर्तब होय.

## पुणें विद्यापीठाचे कुलगुरु

पुणें विद्यापीठाची स्थापना व संवर्धन हें महत्कार्य म्हणजे जयकरांच्या कर्तृत्त्वाच्या मंदिरावरील सुवर्णकळस ठरेल. महाराष्ट्राला स्वतंत्र विद्यापीठ पाहिजे, या कल्पनेचा उदय झाला तेव्हांपासून जयकरांनीं तिची जोपासना केली. इ. स. १९४८ सालीं म्हणजे पांच वर्षांपूर्वी हें विद्यापीठ स्थापन झालें तेव्हां कुलगुरु म्हणून जयकरांचीच नेमणूक करण्यांत सरकारनें मोठेंच औचित्य दाखविलें. एवढा विख्यात, तपोवृद्ध, खानदानी कुलगुरु या विद्यापीठाला मिळाल्यामुळें विद्यापीठाचें निम्मेंअधिक कार्य झालें. शिक्षणाच्या पवित्र गंगेंत आयुष्याच्या आरंभीं जयकरांनीं नौका सोडली. नंतर राजकारणाच्या सागरांत अनेक वादळांना तोंड देऊन वृद्धपणीं पुनः त्याच पवित्र गंगेंत ते प्रवेश करीत आहेत. मात्र अध्यापन ही लहानशी क्रीडानौका असली

तरी कुलगुरुपद ही मोठी आगबोट आहे. जयकरांनीं तिचें सुकाणूं हातीं घेतलें आहे, यांत सर्वांना संतोष आहे. पण त्यांना या कामीं प्रत्यक्षाप्रत्यक्ष ताप कमी होतो असें नाहीं. विद्यापीठाच्या कामासाठीं जयकर मुंबई सोडून 'पुणेंकर' झाले आहेत.

## स्वभावविशेष

जयकर ऐश्वर्यांत वाढले आणि त्या ऐश्वर्याला साजेसें यशहि त्यांनीं मिळविलें. त्यामुळें त्यांच्या स्वभावांत साहजिकच तालेवारपणा आला आहे. यांतच त्यांची विलक्षण सौंदर्यदृष्टि व उच्च अभिरुचि मिसळल्यामुळें कामाच्या बाबतींत ते फार काटेकोर झाले आहेत. सर्व कसें नीटनीटकें, व्यवस्थित व वक्तशीर पाहिजे. एका निमंत्रण पत्रिकेवरील शब्दांत एका अक्षराची चूक राहिली तर त्यांनीं सर्व पत्रिका पुनः छापून घेण्यास फर्माविलें! एका ठिकाणीं गळ्याभोंवतीं लपेटण्यास उपरणें पाहिजे होतें. यजमानानें ठेवणींतलीं कांहीं उपरणीं पुढें करतां, आपल्या कोटाची व उपरण्याची जोडी शोभते कीं नाहीं, हें पाहण्यासाठीं त्यांनीं वेळ घेतला. पुणें येथील लॉ कॉलेजसमोरील त्यांचें रमणीय निवासस्थान पाहिलें तर बाहेरील विस्तीर्ण बागेंतल्या फुलांच्या निवडीपासून तों अभ्यासिकेंतील पुस्तकाच्या रांगांपर्यंत रंगसंगती व मांडणी यांची कांहीं विशिष्ट शान दिसून येते. पदवीदान समारंभाचें भाषण असो किंवा मामुली पत्र असो शब्दयोजनेंतला डौल जराहि बिघडतां कामां नये. हा त्यांचा कटाक्ष असतो. अगदीं साध्या कामावरहि आपल्या व्यक्तित्वाची छाप असावी अशी त्यांची कलावंताची दृष्टि आहे.

संगीत हा जयकरांचा आवडता छंद आहे. अनेक मैफली त्यांनीं तन्मयतेनें ऐकल्या असून स्वतः ते सतार उत्तम वाजवूं शकतात. बीनकार बंदेअल्लीखां बैठकींतून रागावून निघून कसे गेले आणि पहाटें मलबार हिलवर एका निर्जन प्रासादापुढें त्यांनीं आपल्या अंगुलीचा अलौकिक प्रभाव कसा दाखविला, तिरखवांचे वडील एक मोठी मेणबत्ती संपेपर्यंत म्हणजे सहा सहा

तास एक साधाच तबल्याचा बोल त्यांच्याकडून कसा वाजवून घेत, असे अनेक अनुभव व आख्यायिका सांगतांना जयकर रंगून जातात. नाट्य, नृत्य यांचीहि त्यांना आवड आहे आणि या ललितकला केवळ श्रोता किंवा प्रेक्षक म्हणून ते जाणीत नाहींत. चौदाव्या नाट्यसंमेलनाच्या अध्यक्षपदावरून त्यांनीं केलेलें भाषण किंवा अनेक गायन विद्यालयांच्या समारंभांत अध्यक्षीय नात्यानें सांगितलेले चार शब्द ज्यांनीं ऐकले असतील त्यांना या कलांच्या बाबतींत जयकरांचा अभ्यास किती खोल आहे तें दिसून येईल.

जयकर सुधारणाप्रेमी आहेत तसेच स्वातंत्र्याचे भोक्ते आहेत. अनेक राजकीय गटांशीं त्यांचें ऋणानुबंध जडले, पण त्यांनीं आपला स्वतंत्र बाणा कायम ठेवला. परकीय सरकारशीं वागतांनाहि ते लाचारीनें वागले नाहींत. लॉर्ड विलिंग्डननें लोकमान्यांसारख्या विख्यात नेत्यास बोलूं दिलें नाहीं, याबद्दल त्यांनीं साहेब-मजकुराची तेथल्या तेथें हजेरी घेतली. इंग्रज सरकारनें देऊं केलेली ‘ सर ’ पदवीहि त्यांनीं नाकारली. एकादी गोष्ट मनानें पटल्या-नंतर ती निर्भीडपणें सांगणें, ही तत्त्वनिष्ठा त्यांनीं आयुष्यांत अनेक वेळां दाखविली. जात्यंध मुसलमानांवर तर त्यांनीं निर्भयपणें जाहीर टीका केलीच, पण आपल्या हिंदुत्वनिष्ठांच्या सनातनीपणावर कोरडे उडविण्यासहि ते भ्याले नाहींत. एकादें अप्रिय काम हातीं घ्यायचें आणि तें लोकप्रिय झाल्या-नंतर लोकांच्या हवालीं करून त्यांतून निवृत्त व्हावें लागायचें, असा त्यांच्या जीवनाचा विचित्र योगायोग आहे. पण या योगायोगाबद्दल ते दुःखी नाहींत. निळे डोंगर, हिरवी झाडी आणि सभोंवार पसरलेली पुण्यनगरी यांच्या सुंदर चौकटींत शोभणाऱ्या आपल्या हिरव्या निवासस्थानीं बसून ते महाराष्ट्राच्या विद्याक्षेत्रांतील सूत्रें आज निश्चयपूर्वक हालवीत असतात. शरीर क्षीण झालेलें दिसलें तरी रुबाब कायम आहे आणि आवाजांत निश्चयाचा करडेपणा प्रत्ययास येतो. जयकर हे मोठे कर्मयोगी आहेत. ऐश्वर्यानें किंवा सौंदर्य-दृष्टीमुळें हा कर्मयोग क्षीण तर झाला नाहींच, पण उलट प्रखरच झाला. या वयांतील कुलगुरूंच्या कामांतला उरक व जीवनाविषयीं त्यांना वाटणारी हौस केवळ अलौकिक म्हणावी लागेल.

## भाषेचा अभ्यास

जयकरांच्या वक्तृत्त्वांत भाषेचा डौल हा मुख्य गुण दिसतो. हा अर्थातच सहजासहजीं प्राप्त झालेला नाहीं. इंग्रजीचा अभ्यास जयकरांनीं फार कसोशीनें केला. फर्ग्युसन कॉलेजमधील इंग्रजी वाङ्मयमंडळाच्या दुसऱ्या वाढदिवसाचे दिवशीं बोलतांना जयकरांनीं या तपश्चर्येचीं सूत्रें अत्यंत सुबोधपणें सांगितलीं आहेत. इंग्रजीच नव्हे, कुठलीहि भाषा मनःपूर्वक अभ्यासतांना या सूत्रांचा विद्यार्थ्यांना फार उपयोग होण्यासारखा आहे.

भाषा शिकणें म्हणजे केवळ शब्दसंग्रह वाढविणें किंवा आपलें जिव्हास्त्र परजून घेणें, एवढेंच नाहीं. केवळ सफाईदार व सुसंस्कृत बोलतां येणें हाहि भाषेच्या अध्ययनाचा हेतु होऊं शकत नाहीं. उत्कृष्ट साहित्यिक स्वतंत्रबुद्धीचा, सहनशील, व मनामिळाऊ असतो. जगांतील गुंतागुतींतून एकत्व पहाण्याचें सामर्थ्य त्याजवळ असतें आणि मानवी दुःखाचें निवारण करण्याच्या हरएक उदात्त प्रयत्नांत तो सहभागी होण्याची इच्छा धरतो. साहित्याचा अभ्यास म्हणजे या उच्च भूमिकेशीं समरस होणें असें जयकर सांगतात. साहित्याच्या अभ्यासानें तुमचें जीवन उदात्त व हळुवार झालें पाहिजे. त्याचप्रमाणें जी भाषा तुम्ही शिकत असाल ती ज्या लोकांची भाषा आहे त्यांची संस्कृति व इतिहास तुम्हीं जिव्हाळ्यानें पाहिला पाहिजे. त्या लोकांबद्दल आस्था व आदर असल्यास हें सहज शक्य होतें.

वरील भाषणांत वक्ता होण्यासाठीं तपश्चर्या कशी करावी याविषयीं जयकर म्हणाले.

> " पूर्ण आत्मपरीक्षण करून आपली आवडनिवड कोणती हें समजावून घ्या आणि आपल्या अभ्यासाचें क्षेत्र निश्चित करा. वक्तृत्त्वाचे अनेक आदर्श तुम्हांला आढळतील. यांतहि तुम्हांला निवड करावी लागेल. आज एक आदर्श पुढें ठेवायचा, उद्यां तो

टाकून दुसरा घ्यायचा, असें करू नका. केवळ अनुकरण करून कांहीं जमणार नाहीं. छायेचें अनुकरण केल्यानें कधीं मूळ वस्तू हातीं येईल काय ? आपल्या निवडीच्या क्षेत्रांत हलक्यासलक्या यशांनीं संतुष्ट होऊं नका. उच्च ध्येयें ठेवा आणि शिखर गांठेपर्यंत थांबूं नका. आज व्यासपीठावर काय अथवा न्यायमंदिरांत काय कुठेंहि साधी भाषाशैलीच मान्य समजली जाते. एकादा वक्ता साधें बोलतो म्हणजे सोपें बोलण्याची कलाच फक्त त्यानें कमावली आहे असें नाहीं. त्याच्या कल्पना त्याच्या मनांत स्वच्छ असतात म्हणून त्याची भाषा सोपी येते. सुबोधपणा हा विचारांच्या सुबोधतेंतून जन्माला येतो. म्हणून आपणांस काय सांगावयाचें आहे तें निश्चित केलें पाहिजे."

याच व्याख्यानाचे शेवटीं जयकरांनीं साधेपणा हा उच्च शैलीचा गाभा होय असें सांगितलें आणि त्यासाठीं बायबल्, रामायण, महाभारत इत्यादि महान् धर्मकाव्यें आत्मसात् करावीं, असा आदेश दिला.

## श्रोते हा महत्त्वाचा घटक

वक्तृत्वकलेंत श्रोत्यांचा भाग फार महत्त्वाचा आहे हें विसरून चालणार नाहीं. वक्त्याच्या दृष्टीनें तें अंतीम न्यायासन आहे. वक्त्यानें आरंभ आणि शेवट अगदीं बेमालूम केला पाहिजे. एकवेळ आरंभ जरा फिकट झाला तरी चालेल. कारण पुढें भाषणांच्या ओघांत वक्त्यानें रंग भरला म्हणजे आरंभींची निरसता श्रोते विसरतात. परंतु शेवट जर का वक्त्यानें अगदीं रूक्ष केला कीं त्याचें वक्तृत्व वायां गेलें ! बिघडलेला तो शेवट सुधारून केव्हां व कसा घेतां येणार ? आपल्या भाषणाचा आरंभ वेधक होईल आणि शेवटीं श्रोत्यांना हुरहूर लावून सोडील याबद्दल कुशल वक्ता दक्ष असतो. या कामीं जयकरांचा हातखंडा आहे. आणि याचें कारण भाषणाची तयारी करतांना श्रोत्यांचा विचार जयकर मुख्यतः करतात. याविषयीं अगदीं स्पष्ट कल्पना देतांना ते म्हणाले—

" कोठलेंहि भाषण लिहून काढून तें श्रोत्यांपुढें वाचायचें, असें

मी करीत नाहीं. वक्तृत्व हें वक्ता व श्रोतृसमुदाय यांचें मनोमीलन असतें. वक्ता आपल्या हातांतील टिपणांकडे मधूनमधून पहात बोलूं लागला किंवा आगाऊ लिहून आणलेलें भाषण कागदांत डोकें घालून वाचूं लागला तर श्रोते आपुलकीनें वक्त्याकडे पहात नाहींत. उभयतांचें मनोमीलन होऊंच शकत नाहीं. आपल्या उपनिषदांत डोळे हीं आत्म्याचीं गवाक्षें आहेत, असें म्हटलें आहे. ही उपमा मला फार समर्पक वाटते. या गवाक्षांतून आत्म्याचा प्रकाश बाहेर पडत असतो. मी बोलतांना श्रोत्यांच्या नेत्रांकडे पहात, त्यांतून दिसणाऱ्या आत्मप्रकाशांतून भाषणाला चढती-वाढती स्फूर्ति मिळवीत असतों. हा आपला सन्मित्र व हितचिंतक असून आपल्या हिताकरितां सर्व जीव घालून कांहीं समजून देत आहे अशी भावना श्रोत्यांना वाटली पाहिजे."

भाषण दहा मिनिटांचें असो किंवा दीड तासांचें असो जयकर त्याची अगोदर तयारी केल्याशिवाय बोलायचे नाहींत. आपल्या आरामखुर्चींत स्वस्थ बसून ते योजलेल्या भाषणाचा आराखडा मनापुढें तयार करतात. त्यांतले रंग मात्र ऐनवेळीं भाषणाचे वेळीं ते भरतात. स्मरणशक्ति ही वक्तृत्वाला साह्य होणारी फार मोठी मानसिक शक्ति आहे, असें जयकर सांगतात. आणि ही शक्ति वाढवावी तितकी वाढूं शकते, असें त्यांचें मत आहे. इन्व्हरॅरिटी नांवाच्या विख्यात इंग्रजी बॅरिस्टरानें स्मरणशक्तीचें महत्त्व जयकरांच्या मनावर ठसविलें. हातांत टिपणाचा बोटभर कागदहि न घेतां इन्व्हरॅरिटी न्यायासनापुढें तासचे तास आपल्या अशीलाची बाजू मांडी. अशा वक्तृत्वामुळें वक्त्याच्या बुद्धिमत्तेविषयीं विशेष दबदबा श्रोत्यांना वाटूं लागतो.

## हृदयपरिवर्तन हें सूत्र

वक्त्याच्या बोलण्यांत हट्ट व दुराग्रह दिसेल तर श्रोते बिचकण्याचा संभव असतो. जयकर कधीं आपलीं मतें अट्टाहासानें श्रोत्यांच्या मनाव

थापण्याचा प्रयत्न करीत नाहींत. तत्त्वज्ञान, काव्य, इतिहास या सर्वांतच सत्य हा आत्मा असतो. वक्तृत्वांतहि तेंच आहे. पण प्रत्येक विषयांतलीं सत्य प्रकट करण्याची तऱ्हा निराळी असते. कवि सौंदर्य निर्माण करतो आणि त्या सौंदर्याच्या द्वारां सत्य रसिकांच्या अंतःकरणाला येऊन भिडतें. हेंच कार्य वक्ता आपल्याशीं हितगुज करून करतो. 'माझें हें म्हणणें आहे आणि तें खरें आहे.' असें वक्त्यानें ठांसून सांगितलें आणि त्यांवर आधार-दृष्टांतांची कितीहि आरास चढविली असली तरी जोंवर श्रोत्यांच्या अंतःकरणाशीं त्याचे शब्द सलगी करीत नाहींत तोंवर तें वक्तृत्व होऊं शकणार नाहीं. श्रोत्यांना विश्वासांत घेऊन त्यांच्या हृदयांत परिवर्तन घडवीत वक्त्यानें सत्यापुढें त्यांना आणून उभें केलें पाहिजे. ही हृदय-परिवर्तनाची जादू ज्याला अवगत झाली त्यानें जिंकली म्हणून समजावें.

कांहीं वर्षांपूर्वी पुणें येथील कायद्याच्या विद्यार्थ्यांपुढें जयकरांचें सुश्राव्य व्याख्यान झालें. यशस्वी वकील होण्याची गुरुकिल्ली सांगतांना जयकरांनीं म्हटलें,

> "आपला पक्षकार निर्दोषी आहे असें आग्रहानें न्यायाधीशाला सांगत राहूं नका. त्यायोगें तुमचें यश दूरावेल. तुम्ही आपली बाजू अशा आर्जवानें व अशा मुद्देसूत रीतीनें मांडा कीं, तुमच्या पक्ष-काराची निर्दोषता न्यायाधीशाला त्यांतून अप्रत्यक्षपणें समजून यावी, मात्र आपण हें शोधून काढलें असा अभिमान त्याला वाटावा. वकिलाला पाहिजे असलेला निर्णय आपण शोधून काढला, असा अभिमान व समाधान जो न्यायाधीशाला देतो, तो वकील कल्पनें-बाहेर यशस्वी होतो."

या यशस्वी वकिलीचें हेंच तंत्र उत्तम वक्तृत्वालाहि लागूं नाहीं काय? न्यायाधीशाच्या ऐवजीं श्रोतृवर्ग आणि पक्षकाराऐवजीं व्याख्यानाचा विषय एवढाच बदल करावयाचा.

## अभिनय, अंगविक्षेप नकोत

बॉंबे डिबेटिंग सोसायटीपुढें वक्तृत्त्वावर बोलतांना फार मोठा आवाज आणि अंगविक्षेप यांची वक्तृत्त्वाला जरूरी नाहीं, असें जयकरांनीं सांगितलें. एका काळीं वक्तृत्त्वांत अभिनयाला फार प्राधान्य असे. व्यासपीठावर नव्हे तर न्यायमंदिरांतहि वक्ते भृकुटि चढवून, आवाज फुलवून, हातवारे करून बोलत. वक्तृत्त्वाची ती ' राणा भीमदेवी ' पद्धति आज मागें पडली आहे. आज तसें नाट्यपूर्ण भाषण कोणी करूं लागला तर त्याचें हंसेंच होईल. पण याचा अर्थ असा मात्र नव्हे कीं, वक्त्यानें अगदीं ठोकळ्यासारखें उभें राहिलें तरी चालेल. जें वक्ता सांगेल तें तल्लीन होऊन सांगत असेल तर त्याच्या मुद्रेवर त्या त्याप्रमाणें भाव उमटलेच पाहिजेत. न्यायमूर्ति रानडे यांचें भाषण चालू असतां एकदां दिवे गेले. पण अंधारांतहि त्यांच्या भाषणानें श्रोत्यांच्या मनाची पकड घेतली. कारण त्यांच्या स्वरांत भावना होती आणि तीमुळें त्यांची भव्य मूर्ति दिसत नसतांहि लोकांना त्यांच्या भाषणाचा रसास्वाद उत्तम घेतां येत होता. नभोवाणीवरून जीं भाषणें ऐकतांना श्रोते रंगून जातात, त्यांत हा गुण असतो. असो. वक्त्यानें प्रसिद्ध नटाचा आव आणून व्यासपीठाची रंगभूमि करणें किंवा निर्जीव पुतळ्याप्रमाणें हालचाल न करतां नुसता शब्दोच्चार करीत राहणें, हीं दोन टोकें होत. हीं टोकें वगळून परिणामकारक पद्धतीनें कसें बोलावें याचा आदर्श जयकर आहेत.

## गोचर वर्णनपद्धति

जयकरांचा आवाज भरदार आहे आणि प्रत्येक शब्द स्पष्ट, योग्य आघात देऊन उच्चारायची त्यांची पद्धति फार परिणामकारक ठरते. अगदीं सामान्य गोष्ट सांगतांनासुद्धां ती डौलदार गोचर पद्धतीनें सांगण्याची जयकरांची हातोटी पाहण्यासारखी असते. अशा वेळीं एकादें साधेंच पण समर्पक संस्कृत काव्य किंवा इंग्रजी अवतरण देऊन निवेदनाची शोभा ते वाढवितात. एकदां

हिंदुस्थानचा दौरा करून ते पुण्यास आले असतां एका व्याख्यानाच्या आरंभीं ह्या आपल्या पर्यटनाचा उल्लेख करून म्हणाले, " गेले कांहीं दिवस या द्वीपांतून त्या द्वीपाला जाणाऱ्या काफल्यांसारखी माझी स्थिति झाली आहे. " द्वीपात् द्वीपमटान्ति सार्थाः " हिमालयाच्या प्रदीर्घ छायांपासून तहत कन्याकुमारीच्या विस्तीर्ण वाळवंटापर्यंत मी मजला मारीत होतों..." अशा शब्दयोजनेनें आणि विशेषतः त्या शब्दांतील महत्त्वाच्या शब्दांचे दीर्घ-गंभीर उच्चार केल्यानें एकदम विशाल भारताची कल्पना श्रोत्यांच्या मनावर चटकन् ठसते. उपमा-दृष्टांत श्रोत्यांना सहज समजतील आणि वर्ण्यविषयाचें चित्र व माहात्म्य व त्यांयोगें त्यांना बरोबर कळेल, याविषयीं जयकर दक्षता घेतात. सुसंस्कृति आणि औचित्य यांविषयीं तर त्यांचा फार कटाक्ष आहे. देश-भक्त लाला लजपतराय पुण्यास आले असतां त्यांच्या स्वागताची सभा झाली, त्यावेळीं जयकर अध्यक्ष होते. ( दुर्दैवानें लालाजींची ती पुण्यास अखेरचीच भेट ठरली ! ) यावेळीं जयकरांचें प्रास्ताविक भाषण म्हणजे सौजन्य व भक्तिशीलता यांचा सुंदर संगमच होता.

> " आज या ठिकाणीं मी आलों, तो भाषण ऐकण्याकरितां आलों, भाषण करण्याकरितां नव्हे. लाल, बाल आणि पाल या त्रिमूर्तींचा परिचय कोणास नाहीं ? यापैकीं बाल स्वर्गस्थ झाले, पाल बंगालमध्यें आहेत आणि आज या ठिकाणीं त्या दिव्य अग्नीचा हा एकाकी अवशेष आपणांस पाहावयास मिळत आहे."

यांत एक अगदीं सूक्ष्म गोष्ट लक्षांत घेणें जरूर आहे. लाल-बाल-पाल या त्रिमूर्तींपैकीं पाल हे शेवटीं शेवटीं अगदीं मवाळ व प्रतिगामी झाले. राजकीय नेतृत्त्वाच्या दृष्टीनें त्यांना शून्य किंमत उरली ! पण लालाजींची ओळख करून देतांना या अप्रिय गोष्टीला स्पर्श न करतां जयकरांनीं आपलें भाषण केलें. यांत त्यांच्या वाणींतला संयम व औचित्य दिसून येतें.

## वकिली व विवादपटुत्व

प्रत्येक थोर वक्ता हा विवादपटु असेलच असें नाहीं. त्याप्रमाणें आपल्या बाजूची त्याला उत्कृष्ट वकिलीहि साधेलच असें म्हणतां येणार नाहीं

जयकरांचें वक्तृत्व मुख्यतः विधायक स्वरूपाचें असलें तरी वेळ आली म्हणजे विवादपटुत्वानें प्रतिपक्षास नामोहरम करण्यांत त्यांचा हातखंडा आहे. मध्यवर्ती असेंब्लींत खंदे सरकारी नेते याच त्यांच्या गुणामुळें जयकरांना भिऊन असत. कलकत्ता येथें सर्वपक्षीय परिषद भरली असतां जिनांनीं उर्मट व एकांतिक भाषण करून फड मारला. या अरेरावानें सभेवर मारलेली छाप पुसून कुणी काढायची ? कुणी पक्षातीत भूमिका घेतलेली, कुणी यजमान म्हणून शिष्टाचाराखालीं दबलेले. अखेर अलाहाबादच्या त्या राजकारणपटु 'महापंडिता'नें (कै. मोतीलाल) जयकरांना चिठ्ठी पाठवून पुढें येण्यास विनविलें; आणि गांधींनीं बोलण्यासंबंधीं आपणांस विनंति केली आहे, असें लिहिलें. जयकर थोडे नाखुषीनें पुढें आले. आपल्या भारदस्त पण लढाऊ भाषणानें जिनांनीं रचलेला पत्त्यांचा बंगला त्यांनीं जमीनदोस्त केला. जिना चडफडत, पाय आपटीत चालते झाले !

इ. स. १९४१ सालीं राजकीय विचारांसाठीं अ–पक्षपरिषद भरली असतां एका उपटसुंभ मुस्लिम नेत्यानें कुचेष्टापूर्वक तिचें वर्णन 'मागें सैनिक नसलेल्या नुसत्या सेनानींची परिषद' असें केलें. परिषदेंतील भाषणांत याचा समाचार घेतांना जयकर म्हणाले, "आपल्या परिषदेचें वर्णन एका मुस्लिम पुढाऱ्यानें 'मागें सैनिक नसलेल्या सेनानींची परिषद' असें केलें आहे. पण सेनानींना सुद्धां सैनिकाच्या पेशांतून जावें लागतें, हें सदर गृहस्थ विसरले. बाकी एकामागून एक सैनिक आपणांस सोडून जातो आहे, अशा पोकळ सेनेचे प्रमुख होण्यापेक्षां एकांडे सेनानी पुष्कळ बरे." प्रस्तुत मुस्लिम नेत्याच्या संघटनेंतले अनुयायी त्याला भराभर सोडून जात होते, म्हणून जयकरांनीं हा नेमका टोमणा दिला.

पण टोल्यास टोला हाणण्यांत आनंद मानणें, हा जयकरांचा स्वभावधर्म नाहीं. आपल्या बाजूचें बिनतोड व मोहक समर्थन करून श्रोत्यांच्या मनाचा ताबा मिळविणें, या कलेंत ते प्रवीण आहेत. मग होमरूल, संयुक्त मतदार-संघ, पुणें विद्यापीठ, संगीताची महती, कुठलाही विषय असो, माणसांना

आपल्या वाक्जालांत ओढून झुलवीत, अधिकाधिक प्रसन्न करीत, तें आपलें म्हणणें गळीं उतरवितील. त्यांच्या अंगच्या या असामान्य कौशल्याची लोकमान्य टिळकांसारख्या लोकोत्तर पुरुषाला पूर्ण जाणीव होती. म्हणूनच होमरूलच्या शिष्ट-मंडळाबरोबर जयकरांनीं विलायतेस यावें म्हणून त्यांच्याकडे ते धरणें धरून बसले. कांहीं खाजगी कारणामुळें जयकर जाऊं शकले नाहींत, ही गोष्ट वेगळी. नेक नामदार श्रीनिवासशास्त्री यांच्यासारख्या त्रिखंडकीर्ति वक्त्यानेंहि जयकरांचें मंडलाकार परिषदेंतील एक सुंदर भाषण ऐकून त्यांना सद्गदित होऊन म्हटलें, " जयकर, तुमच्यासारखी वकिली करायला मला यायला पाहिजे होती. " एका इंग्रजी उमरावानें जयकरांच्या वकिली कौशल्यावर खूष होऊन त्यांना म्हटलें, " माझ्यावर कधीं खटला झाला तर मी तुम्हांलाच वकील देईन. "

## सौंदर्यपूजन

पण विवादपटुत्व अथवा वकिली हे कांहीं जयकरांच्या वक्तृत्वाचे खरें वैभव नव्हें. श्रोते जयकरांचें भाषण ऐकायला जातात तेव्हां कोणाचा खरपूस समाचार घेतला जाईल किंवा आपली बाजू मांडण्याची कसरत पहायला मिळेल या अपेक्षेनें नाहीं. नायडू किंवा दुलीपसिंगजी यांनीं एकादेवेळ गोलंदाजी केली तर प्रतिपक्ष गोंधळून जात हें खरें. पण प्रेक्षक डोळ्यांत पंचप्राण आणून बसत खेळ पहायला बसत, ते कांहीं त्यांची गोलंदाजी पाहायला नव्हे. त्यांचे ते जोरदार व आकर्षक टोले हें प्रेक्षकांना वाटणारें खरें आकर्षण असें. जयकरांच्या भाषणासाठीं आतुर असलेल्या श्रोत्यांना खरी ओढ म्हणजे त्यांच्या भाषणांतलें सौंदर्यदर्शन हीच असते. जें सांगायचें असतें तें सुंदर असणारच, पण ती सांगण्याची पद्धति ही तितकीच सुंदर असणार. ' गोपाला, मेरी करूना क्यौं नही आवे ' ह्या चिजेंतले शब्द तर करुण आहेतच, पण अब्दुल करीमखाँसाहेब ही चीज म्हणूं लागले कीं स्वरहि तितके रसार्द्र असत. त्यामुळें गाणें अत्यंत रसिलें ठरें. जयकरांच्या

२९९२

वक्तृत्वाची ही जादू आहे. ते मूलतः सौंदर्यशोधक आहेत. आणि इतरांनाहि आपणांस दिसलेलें सौंदर्य दाखविण्याचा ते प्रयत्न करतात. विविध सौंदर्यानें नटलेल्या या जगांत उघड्या डोळ्यांनीं व रसिक वृत्तीनें हिंडलें पाहिजे, असें ते सांगतात. तरुणांना त्यांचा हाच उपदेश आहे. त्यांचीं पदवीदान-समारंभाच्या वेळचीं भाषणें या दृष्टीनें विद्यार्थ्यांनीं विशेष अभ्यासण्यासारखीं आहेत. इ. स. १९३७ डिसेंबरमध्यें लखनौ विद्यापीठाच्या पदवीदान समारंभाचे वेळीं बोलतांना जयकर म्हणाले—

" शेवटीं मला तुम्हांला एवढेंच सांगावयाचें आहे कीं, सौंदर्यावर प्रेम करा, मग तें सौंदर्य निसर्गाचें असो कीं कलेचें असो. मॅक्समुल्लर म्हणे, " जगांत निसर्गानें आपली संपत्ति व सौंदर्य ज्यावर उधळून ज्याचें नंदनवन बनविलें आहे, असा देश कोणता असें मला कोणी विचारलें तर मी भारताकडे बोट दाखवीन. " परंतु देशाच्या या निसर्गसौंदर्याकडे विद्यार्थ्यांचें लक्ष वेधलें जावें, याविषयीं आमच्या शिक्षणक्रमांत किती अल्प प्रयत्न केले जातात ! आपणांला मधुर गाण्यानें रिझविणाऱ्या व सुंदर पिसाऱ्यांनीं प्रफुल्लित करणाऱ्या पक्ष्यांची तरी आपणांला कितीशी माहिती असते ? "

## पार्थिव व आत्मिक सौंदर्य

याच भाषणांत शारीरिक सौंदर्याबद्दल जयकरांनीं काढलेले सुरस उद्गार प्रत्येक विद्यार्थ्यानें लक्षांत ठेवण्यासारखे आहेत. यांतहि त्यांची सौंदर्यदृष्टि स्पष्ट होते.

" स्त्री असो कीं पुरुष असो त्याचें कसलेलें सुंदर शरीर हें स्वर्गीय सौंदर्याचा एक आदर्श असतें. काळाच्या तडाख्यांतून वाच-लेल्या व्हीनस किंवा अपोलो यांच्या पुतळ्याप्रमाणें तें प्रेक्षणीय दिसतें. शरीर म्हणजे केवळ काम करणारें यंत्र नाहीं. अलौकिक डौल, सौंदर्य व समाधान याचें तें निधान आहे. ' शरीराच्या डौलदार

हालचालींत काव्यार्थ भरलेला असतो.' हें एका आधुनिक कवीचें वचन सत्य आहे. म्हणून शरीराकडे आदराच्या दृष्टीनें पहायला शिकलें पाहिजे. साध्या हालचालींत, फळीवरून पुस्तक खालीं घेण्या-सारख्या साध्या कामांतहि सौष्ठत्त्व, सफाई, सहजता आणि उल्हास दाखवितां येतो. याचा फायदा केवळ शारीरिकच आहे असें नाहीं. शरीर आणि मन यांच्या क्रिया-प्रतिक्रिया होणें, हा निसर्ग नियम आहे आणि म्हणून डौलदार शरीर बहुधा समतोल मनाचें द्योतक असतें......"

## ज्ञानाची खोली

पण सौंदर्यदृष्टीमुळें जयकरांच्या भाषणाला अपार माधुर्य आलें असलें तरी सौंदर्यशक्तीला ज्ञानाची भव्य व भक्कम बैठक पाहिजे, हें त्यांनीं अनेकदां सांगितलें आहे. त्यांच्या भाषणांत कलाविलास तर मुख्य असतो, पण त्या-बरोबर ज्ञानाची खोलीहि प्रत्ययाला येते. या ज्ञानवृद्ध रसिकवर्यांनें विद्या-र्थ्यांना केलेला हितोपदेश प्रत्येकानें आपल्या मनावर कोरून ठेवला पाहिजे. नागपूर विद्यापीठाचे पदवीदानप्रसंगीं बोलतांना ( इ. स. १९३५ डिसेंबर ) विद्यापीठांतील यशाइतकीच सहकारी वृत्ति महत्त्वाची असते, हें सांगून जयकर म्हणाले—

"महाविद्यालयांत एक परंपरा निर्माण करणें, विद्यार्थ्यांच्या हातांत आहे. महाविद्यालयीन काळाचें माधुर्य पुढें अक्षय टिकलें पाहिजे आणि बाहेरील जगाचे धक्के-चपेटे सोसण्याचें सामर्थ्य त्यामुळें आलें पाहिजे. पुढें तुम्ही कुठलेंहि क्षेत्र निवडा. सिंहावलोकन करतांना महाविद्यालयांतला काळ हा फार सुखाचा होता आणि अंतःकरण व शील यांचा एकत्र विकास होण्याच्या त्या स्नेहसुभग काळांत आपण देवानें दिलेल्या आपल्या संपूर्ण शक्ति विकसित करण्यासाठीं झटलों, हें समाधान मिळेल असा प्रयत्न करा."

महाविद्यालयाच्या स्वप्नसृष्टींत बेहोष होऊन वावरतांना कित्येक अपाय-कारक खड्डे चुकविण्याचा इषाराहि जयकर देतात—

" महाविद्यालयाच्या वातावरणांत आदर आणि विभूतिपूजा ह्या भावना अगदीं शुद्ध व भरपूर प्रमाणांत फोंफावतात. या वातावरणांत विभूतींची प्रतिष्ठापना झपाट्यानें होते आणि तितक्याच झपाट्यानें त्यांचें विसर्जनहि होतें! ही आदराची आणि विभूतिपूजेची वृत्ति उथळ राजकारणासाठीं किंवा पक्षविशिष्ट कार्यासाठीं वापरली जाणार नाहीं, याची खबरदारी घेतली पाहिजे. सत्य आणि सौंदर्य यांच्या उपासनेनें सामाजिक जीवन अधिक संपन्न करण्यासाठीं या वृत्तीचा उपयोग केला पाहिजे. "

( पाटणा विद्यापीठांतील दीक्षांत भाषण इ. स. १९४३ )

याच भाषणांत यौवनाचें महिम्नस्तोत्र जयकरांनीं गायिलें आहे.

" यौवन ही देवाची देणगी आहे, असें उपनिषदें म्हणतात. जीवनाची मशागत करण्याचा हा लहान पण सामर्थ्यवान् कालखंड आहे. या काळांत स्वर्गीय महत्त्वाकांक्षा आणि शुद्ध भावना घेऊन जगापुढें जाण्याचा हुरूप असतो. स्नेह, सहानुभूति, आणि भ्रातृभाव यांना मर्यादा नसते. आपल्या बांधवांचें सर्वस्व जाणून घेण्याइतकीं या भावनांचीं क्षितिजें व्यापक होत जातात. आपल्या जमातीपासून दूर असलेला सहाध्यायी या काळांत मिळविणें, ही एक चांगली गोष्ट होय. त्याच्या भावना, आशा, फार काय पूर्वग्रह समजून घेणें, आणि तो आपल्याहून वेगळा कां झाला, याचें ज्ञान करून घेणें, हा फार थोर अनुभव आहे."

या उताऱ्यांत जयकरांच्या पुरोगामित्वाचें सुंदर प्रतिबिंब पडलें आहे. त्यांच्या अनेक प्रवचनांत सौंदर्योपासना असते त्याप्रमाणें कर्तव्याचीहि जाणीव दिलेली असते; आणि त्याचबरोबर अंतःकरणाचा विस्तार सूचित केलेला असतो. नवभारताच्या नागरिकांना या वक्तृत्वांतील सौंदर्य आणि संदेश जितका अधिक पटेल तितका या देशाचा भाग्यकाल जवळ येईल.

## सौंदर्यशोधाबरोबर तत्त्वबोध

वक्तृत्व मोहक करण्याकरितां अगदीं साध्या मुद्यांना ठरीव काव्यमय शब्दांचा गिलावा करण्याची पुष्कळांची रीत असते. अशामुळें कांहींतरी गोड गोड ऐकलें एवढाच भास श्रोत्यांना होतो. या पलीकडे त्यांच्या मनावर कशाचीहि स्पष्ट आकृति उमटत नाहीं. सुंदर शब्दांना थोर कल्पनांचा भक्कम आधार पाहिजे. जयकर शब्दांच्या निवडींत फार चोखंदळ आहेत, तसेंच तत्त्वचिंतकहि आहेत. वेदांताचा त्यांचा अभ्यास किती खोल आहे, हें आपल्या मातामहाच्या वेदांतविषयक ग्रंथाला त्यांनीं जी प्रदीर्घ व विद्वत्ताप्रचुर प्रस्तावना लिहिली आहे तीवरून कळून येईल. त्यामुळें जयकरांच्या भाषणांतील सौंदर्य हें रंगरंगोटीचें वाटत नाहीं तर आरोग्याचें निदर्शक वाटतें. युवकांना प्रिय असलेल्या गोष्टींना ते आपल्या भाषणांत स्पर्श करून कांहींसें उन्मादक वातावरण निर्माण करतील. पण लगेच त्यांतून त्यांना उदात्त तत्त्वज्ञानाच्या पातळीवर नेण्यास चुकणार नाहींत. यौवनसुलभ उत्साहाच्या झुळुका त्यांच्या भाषणांत नेहमींच येतात पण मधूनच उच्च विचाराचा सुगंधहि येत असल्यानें त्यांचीं भाषणें जितकीं हृदयंगम तितकीच विचारप्रवर्तक झालीं आहेत. जीवनाच्या दाट अरण्यांतून फिरवून एकदम तत्त्वचिंतनाच्या गुहेंत ते श्रोत्यांना घेऊन जातात. पाटगा येथील दीक्षान्त भाषणांत दरवळलेला पुढील तत्त्वसुगंध फार मोहक वाटेल.

"वय होत जातें तशी भूतकाळांतल्या यशापयशांनीं आपलें मन गोठून जातें. आपल्या मानसिक धमन्यांतून नवविचाराचा प्रवाह वाहूं शकत नाहीं. जें नवीन आणि अपरिचित आहे त्याचें आपणांस नीट आकलनच होत नाहीं. उत्तरायुष्यांत नवीन स्नेही जोडणें आणि नवीन ध्येयें समजणें, सारखेंच अशक्य होऊन बसतें. पुढाकार घेण्यापेक्षां निवृत्त होणें याकडे आपली प्रवृत्ति सतत वळत असते. म्हणून महाविद्यालयीन काळांतच नवयौवनाची अशीं बीजें आपण

पेरून ठेविली पाहिजेत कीं, नवसंस्कार घेण्याची आपली शक्ति नेहमींच्या मर्यादेबाहेर बराच काळ टिकून राहील."

संमेलनें किंवा सत्कार–समारंभ अशा वेळींहि जयकर नेहमींच्या सौंदर्य-दर्शनाबरोबरच कांहीं उच्च विचारांचा निधि-श्रोत्यांना दिल्याखेरीज राहत नाहींत. श्रीज्ञानेश्वरांनीं आपल्या ग्रंथराजाबद्दल मोठ्या आत्मविश्वासानें म्हटलें आहे कीं, जे अधिकारी असतील, त्यांना या ग्रंथांत मोठा तत्त्वबोध आढळेलच, पण साध्या माणसांनाहि यांतलें वाक्चातुर्य आनंदित करील. तसेंच जयकरांच्या भाषणाचें आहे. त्यांच्या भाषणांतील सुढाळ शब्दांचे नाजुक पापुद्रे जो जितका उलगडूं शकेल तितका त्याला नवा नवा आनंद मिळेल. पण नुसतें स्थूल शब्दज्ञान असणारा श्रोताहि भाषणांतील नाद व लय यानें हरखून जाईल.

## तर्फेची सतार

सुरेंद्रनाथांचें वक्तृत्त्व म्हणजे कोदंडाचा टणत्कार असे. गोखले आपल्या मधुर मुरलीनें श्रोत्यांनी मुग्ध करून टाकीत. जयकरांचें वक्तृत्त्व म्हणजे तर्फेची सतार आहे. तींत विविध प्रकारची रागदारी ऐकूं येऊन मनाच्या वेगवेगळ्या शक्तींना अनेक प्रकारांनीं संतर्पण केलें जातें. सुप्रसिद्ध ब्रिटिश पंतप्रधान अस्क्विथ् यांच्या वक्तृत्त्वाचें बहारदार वर्णन देतांना कर्झननीं एक अव्योत्कट दृष्टांत योजला आहे. ते म्हणतात—

> " जेव्हां जेव्हां मी अस्क्विथचें महत्त्वाच्या प्रसंगाचें वक्तृत्त्व ऐकतों, तेव्हां तेव्हां माझ्या मनांत लष्करी संचलनाचें चित्र उभें राहतें. शब्द, समर्थन, मुद्दे हीं रणांगणावरून एकमेकांच्या मागें पद्धतशीर गतीनें जाणाऱ्या पलटणींसारखीं चाललेलीं असतात. प्रत्येक तुकडी आपल्या नियोजित जागेवरून जाते आणि सर्व संचलनाला लयबद्धता असते. संगिनींवर सूर्यप्रकाश तळपत असतो आणि मधून मधून रणवाद्यांचा ध्वनि ऐकूं येत असतो."

न्यायमूर्ति-रानडे-शतसांवत्सरिक-उत्सवाच्या वेळचें जयकरांचें वक्तृत्व किंवा त्यांचें एकादें दीक्षांत भाषण ऐकत असतां रसिक श्रोता असेंच प्रतिमान मन:श्चक्षूपुढें पहात असेल. एक विशाल सरोवर असून मध्यभागीं संगमरवरी जलमंदिर आहे; मधून मधून सुवर्णकमळें तरंगत आहेत; शृंगारलेल्या क्रीडानौकांचा एक ताफा त्या जलमंदिराकडे निघाला असून त्यांवर दिव्यांची आरास केलेली आहे; मधून मधून या नौकांवरून पैंजणांचे झंकार व गीतध्वनि ऐकूं येत आहेत. आणि ह्या सर्व देखाव्याला पूर्णिमेच्या चांदण्याचें स्नान घडत आहे. ही स्वप्नसृष्टि ज्यांनीं पाहिली ते धन्य होत. निदान या एका लाभामुळें तरी पुढील पिढ्यांपेक्षां ते अधिक भाग्यवान् म्हणतां येणार नाहींत काय ?

## अभ्यासाच्या वाटा

१. डॉ. जयकर यांच्या राजकारणांतील कामगिरीची थोडक्यांत माहिती द्या.

२. डॉ. जयकरांनीं वक्तृत्वाची साधना कशी केली ? वक्तृत्वांत भाषेच्या अभ्यासाला किती महत्त्व आहे ?

३. 'श्रोते' हा घटक वक्त्यांना नेहमीं ध्यानांत ठेवावयास हवा असें डॉ. जयकर कां म्हणतात ?

४. डॉ. जयकरांच्या वक्तृत्वाचीं वैशिष्ट्यें कोणतीं ?

५. डॉ. जयकरांचा स्वभाव व आवडीनिवडी यांबद्दल तुम्हांस काय माहिती आहे ?

६. " जयकरांचें वक्तृत्व म्हणजे तर्फेची सतार, " विवेचन करा.

दाक्षिणात्य पद्धतीचा शुभ्र व उंच फेटा, त्यामुळें झगमग करणारी गंभीर व बुद्धिप्रधान मुद्रा, सोनेरी चौकोटीच्या चष्म्यांतून चमकणारे सात्त्विक नेत्र, बदामी रंगाचा लांब रेशमी कोट आणि मुरूप्रमाणें उंच व सडपातळ देहयष्टि असे डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन् हाताची मिठी छातीवर ठेवून बोलूं लागले कीं, वातावरण विद्युन्मय होऊन जातें ! या जगविख्यात पंडिताच्या रूपानें जणूं धर्मच साकार होऊन बोलत आहे, असा भास होतो. एकाद्या भव्य अश्वत्थ वृक्षापुढें आपण उभे आहोंत असें श्रोत्यांना वाटूं लागतें. अश्वत्थ वृक्ष जमिनींतील आणि वातावरणांतील ओलावा शोषून घेतो, त्याप्रमाणें या महान् ज्ञात्यानें स्वदेशांतील व परदेशांतील विचार आपल्या



अंतःकरणांत मुरवून घेतले आहेत, हें भाषणांवरून सहज पटतें. वृक्षांवर अनेक पक्षांचें मधुर कूजन ऐकूं यावें त्याप्रमाणें “ रामो विग्रहवान् धर्मः ” “ जे नम्र झाले ते धन्य होत. ” अशीं भिन्न भिन्न धर्मांतील सुंदर वचनें मधून-मधून भाषणांत यायचींच. वृक्षाला स्पर्शून जाणाऱ्या वाऱ्याच्या झुळकां प्रमाणें अनेक सिद्धांत या तत्त्वज्ञाच्या निरूपणाला मधून मधून गति देतात

" मानवी जीवन हें जसें कुरुक्षेत्र आहें तसें धर्मक्षेत्रहि आहें. " " हरपलेलें बालपण पुनः संपादन करणें हाच मोक्ष होय. " अशा सिद्धांन्ताच्या वायु-लहरी श्रोत्यांना तल्लीन करून सोडतात. डॉ. राधाकृष्णन् यांचें भाषण उगीच कंटाळवाणें व दीर्घ झालें आहे, असें कधीं होत नाहीं. श्रोते आनंदाच्या लाटेवर पोहत आहेत तोंच वक्त्याचें भरतवाक्य कानीं पडून श्रोत्यांची समाधि संपते. पाऊण तास आपण एक अनिर्वचनीय आनंद उपभोगला याचें समाधान आणि तो एकाएकीं संपला याचें दुःख अशा मिश्र जाणिवेनें श्रोत्यांचीं मनें भारून जातात. या रसवंतीनें आज त्रिखंडांतील अनेक विद्यापीठें व विद्वत्परिषदा अंकित केल्या आहेत. हें भाषण ऐकतांना आपण हिंदु आहोंत असें क्षणभर डॉ. एल्. पी. जॅक्ससारख्या थोर ख्रिस्ती विद्वानाला वाटलें ! आणि लंडन विद्यापीठाचे कुलगुरु कॉलिन्स भाषण संपल्यानंतर राधाकृष्णन्‌ना उद्देशून म्हणाले, " महाराज, चाळीस वर्षांपूर्वीं जेव्हां मी मानसशास्त्राचा विद्यार्थी होतों तेव्हां मला आपल्यासारखे प्राध्यापक मिळाले असते तर किती बरें झालें असतें ! " पण ज्ञानवृद्ध पंडित नव्हे तर रसिक तरुण-वर्गहि राधाकृष्णन् यांच्या भाषणांवर मोहित होतो हें त्यांचें विशेष डोळ्यांत भरण्यासारखें यश ठरेल. एकदां क्रीडा-नौकांची मनोहर स्पर्धा राधाकृष्णन् यांच्या व्याख्यानाचे वेळीं इंग्लंडमध्यें होती. परंतु ती पाहण्याचें टाकून माणसें राधाकृष्णन् यांच्या व्याख्यानाकडे धांवलीं, यावरून त्यांचें भाषण किती मनो-वेधक व लालित्यपूर्ण असतें याची कल्पना येईल. शिवाय राधाकृष्णन् यांना साहित्य किंवा राजकारण असल्या लोकप्रिय विषयावर बोलायचें नव्हतें. तत्त्वज्ञानासारखा गंभीर विषय पण तो राधाकृष्णन् यांनीं चित्ताकर्षक करून दाखविला हें त्यांच्या वक्तृत्वकलेचें सामर्थ्य अलौकिक नव्हे काय ?

## बालपण

दक्षिण भारत सृष्टिसौंदर्याप्रमाणें मानवी प्रतिभेंतहि संपन्न आहे. आजवर बुद्धीचे अपूर्व चमत्कार दाखविणारे पुरुष या प्रदेशांत होऊन गेले आहेत.

अशा भूप्रदेशांत एका कुलिन तेलगू ब्राह्मणाचें कुटुंबांत पांच सप्टेंबर इ. स. १८६८ रोजीं सर्वपल्ली राधाकृष्णन् जन्मास आले. राधाकृष्णन् यांचे वडील एका जमीनदाराचे खाजगी कारभारी होते. राधाकृष्णन् लहानपणीं बरेच संकोची, एकांतप्रिय आणि अभ्यासू वृत्तीचे होते. सांगण्यासारखे चढउतार त्यांच्या बालवयांत कांहीं घडले नाहींत. वेलोर व मद्रास येथें त्यांनीं आपलें उच्च शिक्षण पुरें केलें. इ.स. १९०९ झालीं ते एम्. ए. झाले. या वर्षीं तत्त्वज्ञान घेऊन बसणारे विद्यार्थी मद्रास विद्यापीठांत ते एकटेच होते. परीक्षेंत प्रथमपासून त्यांनीं पहिला क्रमांक कधीं सोडला नाहीं. प्रथम मद्रासमध्यें त्यांची प्राध्यापक म्हणून नेमणूक झाली आणि नंतर म्हैसूर विद्यापीठानें त्यांना बोलावून घेतलें. एवढ्या काळांत अध्यापन संभाळून ते वाचन लेखनहि करीत. 'मानसशास्त्र-दर्शन' व 'रवींद्रांचें तत्त्वज्ञान' हीं त्यांचीं पहिलीं पुस्तकें सर्वत्र लोकप्रिय झालीं आणि म्हैसूर विद्यापीठांत असतांना धर्माच्या तुलनात्मक अभ्यासावर त्यांनीं लिहिलेल्या पुस्तकानें तर तत्त्वज्ञ ग्रंथकार म्हणून त्यांचें नांव सर्वत्र दुमदुमूं लागलें. सर आशुतोष मुकर्जी यांनीं राधाकृष्णन् यांना सन्मानपूर्वक कलकत्त्यास बोलावून विद्यापीठांत तत्त्वज्ञानाचे प्राध्यापक नेमलें (इ. स. १९२१) कलकत्ता येथें त्यांनीं बरींच वर्षें काम केलें आणि येथून त्यांनीं त्रिखंडांत जाऊन आपल्या भारतीय तत्त्वज्ञानाचा यशोदुंदुभि वाजविण्याचें महत्कार्य सुरू केलें.

## पाश्चात्य देशांत चमकले !

इ.स. १९२६ सालीं जागतिक विद्यापीठ परिषद् केंब्रिज येथें भरली असतां राधाकृष्णन् यांना कलकत्ता विद्यापीठानें आपले प्रतिनिधि म्हणून तेथें पाठविलें. अनेक विद्यापीठांनीं त्यांना व्याख्यानाकरितां निमंत्रणें दिलीं. "अप्टन निधी" तर्फें ऑक्सफोर्ड येथें व्याख्यानमाला गुंफण्याची त्यांना विनंति करण्यांत आली. ही व्याख्यानमाला इतकी गाजली कीं, एक असामान्य व्याख्याता

म्हणून त्यांचा गौरव सर्वत्र होऊं लागला. या व्याख्यानमालेचा वृत्तांत मँचेस्टर कॉलेजच्या वार्षिक अहवालांत पुढीलप्रमाणें आला आहे.

" प्रो. राधाकृष्णन् यांचीं व्याख्यानें ही यंदाची एक विशेष उल्लेखनीय घटना आहे. त्यांचा विषय हिंदु–तत्त्वज्ञान हा होता. मुद्दे तर विशेष महत्त्वाचे होतेच, पण त्यांचें स्पष्टीकरण करतांना वक्त्याचें त्या विषयावरील प्रभुत्व स्पष्ट दिसलें आणि श्रोते भारावून गेले. सर्वच भाषणें जितकीं खोल तितकींच वक्तृत्वपूर्ण वठलीं. "

एका इंग्लिश वृत्तपत्रानें राधाकृष्णन् यांच्या व्याख्यानांचें वर्णन देतांना म्हटलें :

" हा वक्ता तरतरीत, सौजन्यवान् , पूर्ण ज्ञानी असून आकर्षक व वेधक वाक्यांनीं त्याची भाषाशैली समृद्ध आहे. "

इंग्लंडांत विजय संपादन केल्यानंतर सहाव्या तत्त्वज्ञान परिषदेकरितां राधाकृष्णन् अमेरिकेस गेले. अमेरिकेनें श्रीमत् स्वामी विवेकानंदांचें अमोघ वक्तृत्व ऐकिलें होतें. स्वामीजींनीं आपल्या वाग्गंगेचा पूर अमेरिकेंत वाहवून एक परमोच्च पातळी निर्माण केली होती. तेव्हां हा तरुण प्राध्यापक या पातळीला शोभेसें कांहीं वाक्चातुर्य दाखवील कीं नाहीं, याविषयीं अमेरिकन् जनता साशंकच होती. पण राधाकृष्णन् यांनीं पहिल्याच भाषणानें चोखंदळ अमेरिकन् श्रोत्यांना दिपवून टाकलें. " बोस्टन् ग्लोब " या पत्रानें आपल्या इ. स. १६ सप्टेंबर १९२६च्या अंकांत राधाकृष्णन् यांच्या वक्तृत्वविलासाची सुरस हकीगत दिली आहे.

" राधाकृष्णन् यांची वाणी सहज व ओघवती होती. हस्तलिखिताकडे ते पहात नव्हते. त्यांच्या भाषणांतील उचित शब्दयोजनेनें श्रोते चकित होऊन जात. श्रोत्यांच्या उसळत्या प्रवृत्ती नेमक्या ओळखून ते त्यांना अचूकपणें साथ देत. छातीवर दोन हात जुळवून ते बोलत होते आणि श्रोत्यांच्या मुद्रांकडे किंचित् वाकून पहात एकाहून एक चमकदार स्पष्टीकरणें ते त्यांच्यापुढें टाकीत. या सभेला जगन्मान्य अमेरिकन् तत्त्वज्ञ डॉ. जॉन डयूई हजर होते. त्यांनीं सर्वांपेक्षां अधिक तत्परतेनें राधाकृष्णन् यांना टाळ्या दिल्या. दोन तीन

वेळां तर 'वाहवा' करण्यासाठीं ते स्वतःच्या खुर्चीतून अर्धवट उभे राहिले!"

असा जगद्विजय करून परत आल्यानंतर आंध्र विद्यापीठानें या आपल्या सुपुत्राचा गौरव करावा यांत नवल कोणतें ? या विद्यापीठानें 'डॉक्टरेट'ची पदवी राधाकृष्णन् यांना दिली. पुढें भारतांत आणि विदेशींहि त्यांना अशा सन्मान्य पदव्या अनेक विद्यापीठांनीं दिल्या. अर्थात् यांत राधाकृष्णन् यांचा गौरव झाला म्हणण्यापेक्षां त्या त्या विद्यापीठांनीं आपलाच गौरव करून घेतला, असें म्हणणें युक्त ठरणार नाहीं काय ?

## पुनः इंग्लंड

डॉ. राधाकृष्णन् यांच्या व्याख्यानाची मोहिनी इंग्लंडवर इतकी जबरजस्त पडली होती कीं, त्यांना पुनः बोलवावें इतकेंच नव्हे तर कांहींतरी कायमचा ऋणानुबंध त्यांच्याशीं जुळवावा, असें अनेक इंग्लिश पंडितांना वाटूं लागलें. लौकरच ऑक्सफोर्ड विद्यापीठांत तुलनात्मक धर्मशास्त्राच्या प्राध्यापकाची जागा रिकामी झाली, ती राधाकृष्णन् यांनीं स्वीकारावी अशी त्या विद्यापीठानें त्यांना विनंति केली. इतकेंच नव्हे, तर राधाकृष्णन् यांच्या सोयीप्रमाणें त्यांनीं या जागेवर वर्षांतून कांहीं महिने येऊन काम केलें तरी चालेल अशीहि सवलत त्यांना देण्यांत आली. कांहीं अडचणीमुळें राधाकृष्णन् लौकर जाऊं शकले नाहींत, तरीहि एक वर्षाची मुदत त्यांना देण्यांत आली. आपल्या कलानें, सोयीनें घेतों पण आमची विनंति मान्य करा, अशी इंग्लिश मंडळींची वृत्ति दिसली. त्याप्रमाणें डॉ. राधाकृष्णन् यांनीं ही जागा स्वीकारली. ते इंग्लंडला गेले. त्यावेळीं "जीवनाकडे पाहण्याची आदर्शवादी दृष्टि" या विषयावर हिबर्ट व्याख्यानमाला त्यांनीं गुंफली. त्यांच्या 'हिंदु तत्त्वज्ञाना'वरील ग्रंथानें त्यांच्या विद्वत्तेबद्दल, भाषानैपुण्याबद्दल जो दबदबा पाश्चात्य जगांत झाला होता, तो या व्याख्यानमालेनें विशेषच वाढला. डॉ. राधाकृष्णन् यांच्या तत्वज्ञानावर सुप्रसिद्ध इंग्रजी पंडित प्रो. जोड यांनीं एक ग्रंथ लिहिला! याच जोडनीं 'स्पेक्टेटर' पत्रांत राधाकृष्णन् यांच्या व्याख्यानाचें वर्णन देतांना म्हटलें आहे :

"वक्त्याच्या व्यक्तिमत्त्वामुळें श्रोतृसंख्या खूप वाढली होती. सकाळीं नऊ पासून कामावर गेलेलीं माणसें त्यांत होतीं. तरुणांचा भरणा विशेष दिसला. प्रो. राधाकृष्णन् हे वक्तृत्वकलेंत पारंगत आहेत. त्यांची शैली स्पष्ट व वेधक असते. उपमा—दृष्टांतांनीं वर्ण्य—विषय ते श्रोत्यांच्या डोळ्यांपुढें हुबेहूब उभा करतात. विचार तर्क-शुद्ध रीतीनें व्यक्त करण्याच्या त्यांच्या कौशल्यामुळें गोळीबंद वाक्यांची फैर सारखी झडत असते."

यावेळच्या राधाकृष्णन् यांच्या व्याख्यानामुळें त्यांची कीर्ति पूर्णपणें प्रस्थापित झाली. पुढें अनेक वेळां ते पाश्चात्य देशांत गेले आणि दरवेळीं त्यांचें अधिकाधिक मोठ्या प्रमाणांत स्वागत झालें.

## उपराष्ट्रपति पदापर्यंत

इ. स. १९४१ सालीं पं. मदनमोहन मालवीय सेवानिवृत्त झाल्यामुळें बनारस हिंदु विद्यापीठाचे कुलगुरु कोणास करावयाचें, हा प्रश्न उपस्थित झाला. ज्यानें बुद्धीनें हिंदु धर्मसागराच्या तळाचा ठाव घेतला आहे आणि मनानें हिंदुधर्मतत्त्वाचें पालन जो प्रतिक्षणीं करीत आहे, असा राधाकृष्णन्शिवाय दुसरा पुरुष कुठला सांपडणार? गांधीजी व मालवीयजी यांनीं राधाकृष्णन् यांना ही जागा स्वीकारण्याचा आग्रह केला. अर्थात् एवढ्या थोर विभूतींचा शब्द राधाकृष्णन् तरी खालीं कसा पडूं देतील? त्यांनीं ती जागा स्वीकारली आणि हिंदु विद्यापीठाच्या कारभारांत सुसूत्रता आणिली. पुढें भारत स्वतंत्र झाल्यानंतर मास्को येथें भारताचे वकील म्हणून त्यांना नेमण्यांत आलें. रशियाचा बंदोबस्त कडक. स्वतः हुकूमशहा स्टॅलिन कुणाच्या नजरेसुद्धां पडायचा नाहीं. पण राधाकृष्णन्‌ना त्यानें आपण होऊन दोनदां भेट दिली आणि राजकारणावर हितगुज केलें! रशियांत राधाकृष्णन् सर्वांनाच आदरणीय वाटले. आतां इ. स. १९५२ सालीं भारताच्या नव्या राज्यघटने-प्रमाणें निवडणुका होऊन सरकार राज्यारूढ झालें, तेव्हां डॉ. राधाकृष्णन् यांची

उपराष्ट्रपति या उच्च पदावर निवड झाली आहे. राधाकृष्णन् हिंदु विद्यापीठाचे कुलगुरू झाले तेव्हां कँटरबरीचे आर्च बिशप म्हणाले, “ आतांपर्यंत पूर्वेकडून पश्चिमेकडे विद्यापीठांकडे विद्यार्थी येत असत. आतां हा ओघ उलटीकडे म्हणजे पश्चिमेकडून पूर्वेकडे वाहूं लागेल. ” राधाकृष्णन् भारताचे उपराष्ट्रपति झाले, तेव्हांहि असेच धन्योद्गार निघाले. जगांत सर्वत्र लष्करी किंवा मुलकी सोटेशहा राष्ट्राचे धुरीण होत असतां भारतानें आपल्या उपराष्ट्रपतीच्या पदावर एका सात्त्विक, शांत तत्त्वज्ञाला बसविलें, हें भारताचें मोठें वैशिष्ट्यच नव्हें काय ? आतां संयुक्त राष्ट्रसंघाची जी सांस्कृतिक शाखा आहे (यूनेस्को) तिचे अध्यक्ष म्हणून राधाकृष्णन् यांची निवड झाली आहे. जगांतील ६०-६५ राष्ट्रांनीं एकमतानें ही निवड केली, ही गोष्ट लक्षांत ठेवण्यासारखी आहे. राधाकृष्णन्, त्यांचा प्राचीन देश आणि त्यांचें थोर तत्त्वज्ञान या सर्वांचाच हा बहुमान होय.

## खाजगी

राधाकृष्णन् हे खरेखुरे तत्त्वज्ञानी आहेत. ‘ साधी राहणी आणि उच्च विचारसरणी ’ असें त्यांचें वर्तन असतें. त्यांच्या शिष्टाचारांत विलक्षण मार्दव आहे आणि मोठमोठे राजकारणीहि त्यामुळें दिपून गेले आहेत. राधाकृष्णन् यांचें वागणें म्हणजे नम्रता आणि डौल यांचें मोठें मनोहर मिश्रण आहे. ज्ञानामुळें ते विनयशीलहि झाले आहेत, तसाच त्यांचा आत्मविश्वासहि वाढलेला आहे. तत्त्वज्ञानी किंवा लेखक माणसें व्यवहारांत नेहमीं अपेशी ठरतात. त्यांना राजदरबारांत चमकणें किंवा राजकारण करणें जमत नाहीं. राधाकृष्णन् याला अपवाद आहेत. बनारस विद्यापीठाचा कारभार त्यांनीं फार कुशलतेनें केला. रशियासारख्या पाताळयंत्री मुत्सद्याच्या वर्तुळांत राहून आपल्या हातांतली उतारी न दाखवितां त्यांनीं राजकीय डावांत आपली छाप पाडली. आजहि राज्यपरिषदेचे अध्यक्ष म्हणून ते काम चालवतात तेव्हां शिस्त व अचूकपणा बरोबर पाळतात. कुणी भलताच मुद्दा उपस्थित केला म्हणून ते गांगरले आहेत, असें होत नाहीं. उपराष्ट्रपतिपदाची इभ्रत त्यांनीं फार वाढविली आहे असेंच दिसून येईल.

राधाकृष्णन् यांच्याइतका गौरव फार थोड्यांच्या वांट्याला आला असेल. ' विद्वान् सर्वत्र पूज्यते ' हें वचन त्यांच्या बाबतींत तंतोतंत खरें ठरलें आहे. पण राधाकृष्णन् यांची थोरवी अशी कीं, ज्ञानापेक्षांहि श्रेष्ठ म्हणून जगांत कांहीं आहे, असें मानून ते त्यापुढें मान लववितात. जगद्वंद्य गांधीजींपुढें ते एकाद्या साध्या विद्यार्थ्याप्रमाणें बसत. रवींद्र किंवा रानडे यांच्याविषयीं त्यांनीं प्रकट केलेला गाढ आदर पाहिला म्हणजे राधाकृष्णन् यांच्या लीनतेची कल्पना येईल. राधाकृष्णन् हे मुख्यत: तत्त्वज्ञ असले तरी एकारलेले नाहींत. अनेक उपयुक्त व मनोरंजक विषयांची त्यांना गोडी आहे. अनेक क्षेत्रांतील माणसें त्यांच्याभोंवतीं असतात. त्यांचा कौटुंबिक जिव्हाळा वाखाणण्यासारखा असून त्यांच्या मित्रांना त्यांचा आधार वाटतो. ते जुन्या कर्मठ माणसाप्रमाणें देवदेवतार्चनांत तासन् तास घालवितील, असें नाहीं. पण गीता व स्तोत्रपाठ कधींचुकावयाचा नाहीं. शरीर सुव्यवस्थित ठेवण्यास जसा व्यायाम पाहिजे तसा मन प्रसन्न व ताजेंतवानें ठेवण्यास हा आध्यात्मिक व्यायाम जरूर आहे, असें त्यांचें म्हणणें आहे. त्यांनीं पाश्चात्य व पौर्वात्य तत्त्वज्ञानांचे कठीण ग्रंथ पचविले आहेत. पण धर्माची व्याख्या ते अगदीं सोपी व सुबोध अशी पुढीलप्रमाणें देतात :

> " सत्यनिष्ठ असावें, साधें असावें, अंत:करण शुद्ध व सौजन्ययुक्त असावें. दु:खाच्या व भयाच्या कालीं आनंदी व समाधानी असावें. जीवनावर प्रेम करावें, मृत्यूला भिऊं नये. पंचमहाभूतेश्वराची सेवा करावी, पण मृताच्या भूतसृष्टीनें पछाडलें जाऊं नये. यापरता उदात्त उपदेश व उदाहरण जगाच्या आरंभापासून आतांपर्यंत उपलब्ध झालेलें नाहीं. "

## ' हजारांतुनी एकादा '

दहा हजारांत एकादाच वक्ता निघतो ( वक्ता दशसहस्रेषु ) असें संस्कृत सुभाषित आहे. यापुढें जाऊन असेंहि म्हणतां येईल कीं, दहा हजार वक्ते

घेतले तर त्यांत खराखुरा वक्ता असा एकादाच असतो. बाकी इतर बोलणारे असतात इतकेंच ! एकप्रकारचें सवंग लोकप्रिय वक्तृत्त्व सर्वांना ठाऊक आहे. लोकांचीं मनें थरारून सोडणें किंवा त्यांना चेतविणें, हें मैदानी वक्तृत्त्व आपण नेहमीं ऐकतों. राजकीय किंवा सामाजिक कार्याला अशा वक्तृत्त्वाचा उपयोग असतो. पण अशीं उपयुक्त भाषणें लोकांवर आपला कायम ठसा उमटवूं शकत नाहींत. रोमचा सेनापति सीझर याचा खून झाला तेव्हां त्याच्याविरुद्ध असणाऱ्या प्रक्षुब्ध जनसमूहाला शांत करून अँटनीनें सीझरचें मोठेंपण त्यांच्या गळीं उतरविलें आणि अँटनीच्या वक्तृत्त्वानें भारलेल्या लोकांनीं मृत सीझरचा दफनविधि मोठ्या आदरानें केला ! तानाजी पडला तेव्हां कच खाऊन मागें पळणाऱ्या मराठ्यांना सूर्याजीनें आपल्या वक्तृत्त्वानें पुन: लढण्याची स्फूर्ति आणिली. अँटनी किंवा सूर्याजी यांचीं हीं भाषणें अजरामर झालीं खरीं, परंतु त्यांत प्रसंगाचें अलौकिकत्त्व आणि मृत व्यक्तीचें माहात्म्य हेंहि जमेस धरावें लागेल. बहुधा कांहीं तात्कालिक प्रेरणा देऊन जमावाला चेतना देणारी मर्दानी व मैदानी भाषणें भावना व अत्युक्ति यांनीं भडक केलेलीं असतात. टिकाऊ कलाकृतींत भावना तर अवश्य पाहिजे. पण ती भडक असतां कामां नये, संयमित असावी लागते. त्याप्रमाणें तिला बुद्धीची, कल्पकतेची जोड मिळणें अवश्य असते. भावना व विचार यांचें सुंदर मीलन होईल तेव्हांच कलाकृति ही शाश्वत स्वरूपाची होते. तिलाच आपण 'अक्षर' वाङ्मय म्हणतों. डॉ. राधाकृष्णन् यांचीं अनेक व्याख्यानें अशा 'अक्षर' कलाकृती ठरल्या आहेत. कारण त्यांत भावना तर आहेतच पण बुद्धीचा हृदयंगम विलासहि आहे. "भावाचा फुलौरा चढे। मतिवरी ॥" हें श्री ज्ञानेश्वरांनीं केलेलें वर्णन अशा 'अक्षर' व्याख्यानांना लागूं पडतें.

## भाषणांतील वादी-संवादी स्वर

उत्तम वक्ता आपणांस पटलेलें तत्त्व तर श्रोत्यांच्या मनावर ठसवितोच, पण ज्या तत्त्वांचें आकलन स्वत:स ज्या पद्धतीनें झालें ती पद्धतिहि श्रोत्यांना

अवगत करून देतो. काव्य आणि वक्तृत्व हीं अत्यंत प्रभावी साधनें आहेत, असें बर्कनें म्हटलें आहे, तें उगीच नाहीं. या दृष्टीनें डॉ. राधाकृष्णन् हे मोठे असामान्य वक्ते आहेत. गायनकला ज्यांना माहिती आहे त्यांना हें ठाऊकच असेल कीं, रागाच्या स्वरविस्तारांत वादी स्वर पुष्कळदां येतो आणि संवादी स्वराला त्याच्या खालोखाल जागा मिळते. श्रोते रागाचे आलाप ऐकत असतां नकळत त्यांच्या मनावर या दोन स्वरांचें विशेष वजन पडत असतें. उत्तम वक्ता नेमकें हेंच करतो. आपल्या भाषणांत सांगावयाचें जें मुख्य सूत्र असेल तें वेगवेगळ्या स्वरूपांत पुनः पुनः सांगून त्या सूत्रांस पोषक असें उपसूत्र थोड्या कमी प्रमाणांत, पण मुख्य सूत्राच्या स्पष्टीकरणास साहाय्यक होईल अशा बेतानें मांडत असतो. आंध्र विद्यापीठाच्या पदवीदान-समारंभाचेवेळीं सन्मान्य पाहुणे या नात्यानें भाषण करतांना डॉ. राधाकृष्णन् यांनीं 'विद्यापीठें आणि राष्ट्रीय जीवन' हा विषय घेतला होता. पूर्वीं नालंदासारखीं महान् विद्यापीठें होतीं, गुरुकुलवास हा शिक्षणांतला महत्त्वाचा घटक असे इत्यादि गोष्टी वर्णून त्यांनीं प्राचीन भारतांतील विद्या-पीठांचें माहात्म्य सांगितलें. पण त्याचबरोबर नवभारताच्या निर्मितीसाठीं नव्या सर्वच कल्पना डावलून चालणार नाहीं, याचीहि परोपरीनें जाणीव दिली.

> "उद्यांच्या स्वप्नाकरितां भूतकाळ विकृत करून त्याचा आधार घेणें हें विवेकबुद्धीनें केलेलें पाप होय." "लक्ष्मीची उपासना हा आध्यात्मिक जीवनास मोठा अडथळा होय, असें आपल्या धर्मानें मानलेलें नाहीं."

अशा सिद्धातांनीं भरलेल्या सर्व भाषणांत विद्यापीठाचें महत्त्व हा प्रधान विषय होता आणि आपल्या राष्ट्राला नवजीवन देण्यासाठीं विद्यापीठांनीं फार मोठें कार्य करावयाचें आहे हें त्याला पोषक असें दुय्यम सूत्र होतें. यांत लॉर्ड हॉल्डेनच्या शिक्षणविषयक प्रवचनापासून "सर्वस्तरतु दुर्गाणि सर्वो भद्राणि पश्यतु······" या संस्कृत वचनापर्यंत सर्व सामुग्री या सूत्रोपसूत्रास स्पष्टता देईल अशा कौशल्यानें त्यांनीं मांडली होती. पण हेंच काय, त्यांचीं बहुतेक सर्व गाजलेलीं भाषणें याच कलाकुसरीचीं आहेत.

## श्रोत्यांच्या मनोभूमिकेची मशागत

बीं पेरण्यापूर्वीं जमीन नांगरून भुसभुशीत करावी लागते. एकाद्या विषयाचें रहस्य श्रोत्यांच्या गळीं उतरविण्यासाठीं त्यांच्या मनोभूमिकेची अगोदर अशीच मशागत वक्त्यानें केली पाहिजे. वर्ण्यविषयाचा स्पष्ट आराखडा श्रोत्यांच्या डोळ्यांपुढें उभा करावयाचा आणि मग विवेचनाच्या ओघांत हळूं हळूं त्यांत रंग भरावयाचे. याकामीं राधाकृष्णन् यांच्याइतकें कौशल्य फार थोड्यांच्या अंगीं असेल. श्रीभगवद्गीतेवर व्याख्यान देतांना गीतेनें द्वैत सांगितलें आहे कीं, अद्वैत असा गहन विचार ते एकदम मांडीत नाहींत. भारतीय युद्धाचे आरंभीं, आपल्या प्रतिपक्षाचे अग्रभागीं आपले आजे, मामा, बंधु इत्यादि आप्तस्वकीय आहेत, हें पाहून अर्जुन शोकाकुल झाला आणि धनुष्य टाकून स्वस्थ बसला. तेव्हां श्रीकृष्णानें त्याला तत्त्वज्ञान सांगितलें आणि मग अर्जुन युद्ध करण्यास सज्ज झाला. हें सर्व पर्व म्हणजे गीता होय. हेंच खुबीनें राधाकृष्णन् सांगतात. "धर्माचा आरंभ 'मी लढत नाहीं' (न योत्स्ये) येथून होऊन शेवट 'तुझ्या म्हणण्याप्रमाणें वागेन' (करिष्ये वचनं तव) येथें होतो. धर्मक्षेत्राच्या या दोन सरहद्दी आहेत." अर्जुनाच्या तोंडचींच गीतेंतील कांहीं वाक्यें घेऊन गीताधर्मात निराश माणसाला कर्मयोगी करण्याचें सामर्थ्य कसें आहे हें प्रथमच ते अशा कलात्मक रीतीनें सांगून टाकतात कीं, श्रोत्याला कुणीकडून कुणीकडे जायचें आहे ही प्रथमच कल्पना येते आणि मग या वाटेवर लागणारें सौंदर्य पहात पहात तो व्याख्यानाच्या कडेपर्यंत सहज जातो.

## अवघड कला

मात्र राधाकृष्णन् यांची ही भाषणपद्धति थोडी अवघड प्रकारची आहे. म्हणजे सिद्धांत प्रथमच सांगून टाकल्यानंतर श्रोते पुढील भाषणाविषयीं उदासीन होणें शक्य असतें. एकंदरींत या वक्त्याला हें सांगायचें आहे, हें

भाषणाच्या तोंडींच कळल्यानंतर पुढें भाषणांत माणसाचें चित्त लागत नाहीं. उलट श्रोत्यांचें कुतूहल शेवटपर्यंत वाढवीत नेऊन मग वक्त्यानें हळूंच आपला सिद्धांत त्यांच्या कानीं सोडून दिल्यानें त्यांचें अवधान चळत नाहीं. साधारण वक्त्यांची रीत हीच असते. पण राधाकृष्णन् यांची प्रतिभा जशी अलौकिक तशीच त्यांची भाषणाची रीतहि असामान्य आहे. प्रतिपाद्य सिद्धांताची कल्पना ते श्रोत्यांना प्रथमच देतात, पण त्या सिद्धांताला सजवीत-नटवीत ते तो असा कांहीं दर्शनीय करीत राहतात कीं, श्रोत्यांची तल्लीनता सारखी वाढतच जाते. देवळाच्या उत्सवप्रसंगीं भिंतीवर काढल्या जाणाऱ्या चित्रांची प्रगति तासन्‌तास उत्सुकतेनें पहात राहणाऱ्या मुलांप्रमाणें श्रोते राधाकृष्णन् यांच्या विवेचनांतल्या बारकाव्याकडे श्रवणांत पंचप्राण आणून ऐकत राहतात.

इ. स. १९३३ सालीं कलकत्ता येथें अखिल भारतीय महिलापरिषदेचें अधिवेशन भरलें होतें. डॉ. राधाकृष्णन् यांना या अधिवेशनांत भाषण करण्याची विनंति करण्यांत आली. पाश्चात्य राष्ट्रांत स्त्रियांच्या हक्कांसंबंधीं जी अवास्तव कल्पना आहे ती चूक आहे असें राधाकृष्णन् यांना सांगायचें होतें. थोडें प्रास्ताविक बोलल्यावर त्यांनीं आपला विषय लगेच स्पष्ट केला.

> “ स्वतंत्र झालेल्या स्त्रियांना दर्जा, पैसा, सत्ता फार काय ज्ञान-सुद्धां मिळेल. त्या फ्रेंच वाचूं शकतील. पेटी वाजवितील. पण पुढें काय? स्वतःचें काय करायचें हें त्यांना कळत नाहीं. त्या बाह्य गोष्टींत धडपडत इकडे तिकडे धांवतील; ही गांठ बांधतील, ती सोडतील; याला दोष देतील, त्याला शाप देतील; आपल्या भोवतालची परिस्थिति आपल्या विरुद्ध आहे आणि वेळ कंटाळवाणा जातो, अशी तक्रार करतील.”

असें वर्णन केल्यानंतर वक्ता ‘ आधुनिक स्त्रीहक्कवादाच्या विरुद्ध कांहीं तरी सांगणार,’ हें पहिल्यानेंच स्पष्ट झालें; आणि तरी पुढें सर्व व्याख्यानांत राधाकृष्णन् यांनीं यत्किंचित् नीरसता येऊं दिली नाहीं.

"व्यक्तीची सुधारणा हें कार्य भपकेदार नसलें तरी भरीव आहे. हें तुम्हीं अंगिकारिलें, तर समाजाची पुनर्रचना होण्यास मुळींच वेळ लागणार नाहीं."

असा त्यांनीं समारोप केला तेव्हां टाळ्यांचा प्रचंड कडकडाट झाला. आपला सिद्धांत ते प्रथम स्पष्ट करीत किंवा पुनः पुनः सांगीत, श्रोते शेवट-पर्यंत त्यांचें भाषण तन्मय होऊन ऐकतात. यांवरून त्यांच्या निवेदनाची सरसता सहज कळून येईल.

## ज्ञाताकडून अज्ञाताकडे

आदर्श अध्यापक हा जें ठाऊक असेल त्याच्या आधारें जें नवीन सांगायचें आहे तें समजावून देतो. कुतुबमिनार जर त्याला विद्यार्थ्यांच्या डोळ्यांपुढें उभा करावयाचा असेल तर आपल्या गांवांतील मनोरा, दीपमाळ किंवा गिरणीची चिमणी यांच्या आधारानें कुतुबमिनाराची गगनचुंबी आकृति तो विद्यार्थ्यांच्या मनःश्चक्षूंपुढें उभी करील. आपली पृथ्वी एकंदर विश्वाच्या मानानें केवढी आहे, हें सांगण्यासाठीं पावसाळ्यांत दुथडी वाहून जाणारी नदी आणि तीवर तरंगणारें बोर असें कांहींतरीं रूपक तो योजील. उत्तम अध्यापकाची ही कला राधाकृष्णन् यांचेजवळ फार मोठ्या प्रमाणांत आहे. यांचा अवघड विषय यांमुळेंच सुबोध होतो. लोकांत रूढ झालेल्या गोष्टी किंवा आधुनिक जगाला परिचित असलेल्या कल्पना घेऊन अत्यंत दुर्बोध विषय ते सोपा करून सांगतात. आपला हिंदु धर्म हा संकुचित वृत्तीचा नसून सर्वांचा समावेश करून घेणारा आहे आणि त्याची सहिष्णुता सतत टिकून आहे, हें आजवर अनेक विचारवंतांनीं सांगितलें. परंतु राधाकृष्णन् याचेंच प्रतिपादन करतांना म्हणतील, "हिंदु धर्मानें 'मनरो'तत्त्व कधींहि अवलंबिलें नाहीं." अमेरिकेंत एक शतकापूर्वीं मनरो म्हणून मुत्सद्दी होऊन गेला. त्यानें अमेरिकेंत इतर कोणी प्रवेश करूं नये, अमेरिका ही अमेरिकन् लोकांकरितांच आहे, असें धोरण प्रतिपादन केलें. यालाच मनरो तत्त्व म्हणतात.

या धोरणाच्या आधारें नेमका विरुद्ध असलेला हिंदु दृष्टिकोन राधाकृष्णन् यांनीं कसा समजावून दिला तो पहा ! ज्ञानाला राष्ट्रांच्या संकुचित मर्यादा नसतात, हें सांगतांना त्यांनीं एके ठिकाणीं म्हटलें, " ज्ञान हें सार्वत्रिक व सर्व जगाचें आहे. सोव्हिएट रसायनशास्त्र अथवा फ्रेंच पदार्थविज्ञान असा—कांहीं पंक्ति—प्रपंच यांत करतां येण्यासारखा आहे काय ? मुळींच नाहीं." अशा रीतीनें आपल्या उदात्त विवेचनाला शक्य तितकें सुबोधरूप देण्याचा त्यांचा प्रयत्न असतो.

वक्त्यानें अव्यक्त किंवा गूढ अशा कल्पनांऐवजीं स्पष्ट व गोचर कल्पना वापरणें हितावह असतें. कारण भाषणाच्या ओघांत गोचर कल्पनांमुळेंच विषय सुगम होत जातो. साध्या साध्या शब्दप्रयोगांत देखील जर स्पष्टता असेल तर वक्ता श्रोत्यांच्या मनाची पकड तात्काळ घेऊं शकले. ' भावनांची उत्कटता ' म्हणण्याऐवजीं ' भावनांची आग ' म्हणणें अधिक परिणाम करते. गोचर वर्णनाचें हें कौशल्य गहन तत्त्वाचें प्रतिपादन करतांना राधाकृष्णन् फार मोठया प्रमाणांत व्यक्त करतात. मनुष्यानें संसाराच्या धकाधकींतसुद्धां आपलें मन स्थिर ठेविलें पाहिजे, हें सांगतांना तात्त्विक तर्कवाद करीत न बसतां राधाकृष्णन् हे एका संस्कृत सुभाषिताचें अवतरण देतील. 'डोक्यावर भरलेला कुंभ घेऊन राजसभेंत नाचणारी नृत्यांगना कितीहि गिरक्या घेत असली आणि तिच्या हातापायांना कितीहि जलद गति मिळत असली तरी डोक्यावरील कुंभ पडूं न देण्याकडे तिचें लक्ष केंद्रित झालेलें असतें. त्याप्रमाणें मानवाचें असावें. तो संसाराच्या जंजाळांत वावरत धडपडत असला तरी आत्मानंद कायम ठेवण्याकडे त्यानें सतत ध्यान दिलें पाहिजे.' मात्र असे दृष्टांत किंवा अवतरणें त्यांच्या भाषणांत कधीं खच्चून भरलेलीं नसतात. अलंकारांनीं सर्व अंग झांकून टाकावयाचें हें कांहीं प्रसाधन—चातुर्य नव्हे. ठसठशीत असे चारदोन भारी किंमतीचे पण नाजूक दागिने घालून एकंदर सौंदर्यास उठाव देणें, हीच खरी कलात्मकता होय आणि ही राधाकृष्णन् यांना जेवढी साध्य आहे तेवढी फार थोड्या वक्त्यांना अवगत असेल.

## रम्य विविधता

कसलेला गायक एकच स्वरसमूह अनेक पद्धतींनीं आळवून आपल्या गायनांत रसोत्कर्ष साधत असतो. राधाकृष्णन् यांचीं अवतरणें देण्याची दुसरी रीत लक्षांत घेतली तर या कलाकुसरीचें रहस्य कळून येईल. वक्तृत्वाबद्दल तरुण माणसांना सांगतांना ग्रीक वक्त्याची पुढील घोषणा ते सांगतील : " शहरें कांहीं चार भिंतींनीं तयार होत नाहींत. तीं माणसांना निर्माण करावीं लागतात." कित्येकदां सर्व परिचित असें एकादें वचन घेऊन त्यांत कांहीं भर घालावयाची आणि आपलें म्हणणें स्पष्ट करावयाचें असें त्यांचें तंत्र असतें.

> " संस्कृतीची व्याख्या करतांना मॅथ्यू अर्नोल्डनें माधुर्य आणि प्रकाश हीं संस्कृतीचीं लक्षणें होत असें म्हटलें आहे. आपण त्यांत एक तिसरें लक्षण घालूं या. तें म्हणजे सामर्थ्य. स्वभावाचें माधुर्य, निकोप दृष्टिकोन, मानसिक बल, सहनशीलता, शहाणपण आणि धैर्य हीं सुसंस्कृत मनाचीं वैशिष्ट्यें होत."

अशा रीतीनें श्रोत्यांना जें कळलें आहे, त्यांत नवी भर पडते किंवा परिचित गोष्टींचाच अगदीं नवीन पैलू दिसूं लागतो. तत्त्वज्ञानाबरोबरच साहित्य, राजकारण, इतिहास इत्यादि विषयांचा त्यांचा अभ्यास खोल असल्यानें त्यांच्या वक्तृत्वांत रमणीय विविधता आणि हृदयंगम खोली आली आहे.

पण व्यासंग व निवेदनचातुर्य इतक्या मोठ्या प्रमाणांत राधाकृष्णन् यांच्यापाशीं आहे ही त्यांच्या वक्तृत्वाची एक बाजू झाली. त्यांच्याजवळ कांहीं भरीव सांगण्यासारखें आहे हें त्यांचें खरें बळ होय. त्यांच्या चित्ताकर्षक वक्तव्यांत आपणांला थोर तत्वांचा स्पर्श होऊन जातो. यामुळें त्याला खरी थोरवी आली आहे. लाख तापवून ती थोडी वितळली म्हणजे तीवर आपण सील करतों. त्याप्रमाणें प्रास्तविक बोलून माणसांचीं मनें जरा पातळ झालीं कीं, श्रेष्ठ तत्त्वाची त्यांवर मोहर ठोकावयाची हें राधाकृष्णन् यांचें मुख्य

वक्तृत्वतंत्र होय. तळहातावर एकदा मणि ठेवावा, त्याप्रमाणें हा तत्त्वज्ञानीं मोठालीं तत्त्वें आपणांला हस्तगत करून देतो.

> " आपल्या परंपरा आपण संभाळणें हें जरूर आहे कारण अनेक शतकांनीं इतिहास बनत असतो; आणि शेकडों इतिहासांतून एकादी परंपरा जन्माला येते. आणि अशा शेकडों परंपरांच्या पायावर ज्याला आपण विशिष्ठ सांस्कृतिक आदर्श किंवा व्यक्तिमत्त्व म्हणतों तें तयार होत असतें. "

जोडसारखे विख्यात विद्वान्‌सुद्धां हीं वाक्यें ऐकून तल्लीन झाले.

## संस्कृति म्हणजे काय ?

' लोकशाही आणि हुकूमशाही ' या विषयावर एका विद्यापीठांत बोलतांना डॉ. राधाकृष्णन् यांनीं आपले नेहमीचेच विचार अधिक स्पष्टतेनें मांडलेले आहेत. मोठालीं वाक्यें नाहींत; कल्पनांची गुंतागुंत नाहीं; संदिग्धता तर कुठेंच नाहीं. मोजक्या पण वेधक व रसाळ शब्दांत त्यांनीं संस्कृतीचें स्वरूप विशद केलें.

> " संस्कृति म्हणजे त्याग करण्याचें सामर्थ्य. वैयक्तिक व सामाजिक स्वार्थावर या सामर्थ्याचें नियंत्रण असतें. तें एक शांततेनें करावयाचें सहकार्यच म्हणतां येईल. आज राष्ट्राराष्ट्रांत समता व न्याय शिल्लक न राहिल्यानें जगांत तंग वातावरण निर्माण झालें आहे. ...आपला तात्कालिक फायदा किंवा स्वार्थ यांकडे लक्ष न देतां जीं राष्ट्रें उच्चतर ध्येयाविषयीं निष्ठा बाळगतात, त्यांचीच छाप मनुष्यजातिवर पडते... सामाजिक न्यायाशिवाय स्थैर्य नाहीं. लोकसत्ता नुसती राजकीय नसते तर ती आर्थिकहि असते. कामगारांचें दारिद्र्य व दुःख नाहींसें करून त्यांना आत्मविकासाला संधि दिली पाहिजे. "

यापेक्षां स्पष्ट काय असूं शकेल ? वेळोवेळीं तरुणांपुढें बोलतांनाहि डॉक्टर राधाकृष्णन् असेंच चैतन्यशाली व रेखीव आदेश देतात.

" संक्रमण कालांत नवा साधेपणा आणि नवी विरक्ति यांची आवश्यकता आहे. आणि माझ्या तरुण मित्रांनो, आचार-विचाराचें नेतृत्त्व आतां तुमच्याकडे येत असल्यानें तुम्हांला तर तिची विशेषच जरूर आहे. सत्ता, संपत्ति, किंवा लौकिक यांची झगझगीत पारितोषिकें तुम्हांला देण्याकरितां आमच्याजवळ नाहींत. कष्ट, संघर्ष आणि यातना हींच तुमच्या वांट्यास येणार आहेत. या सर्वांना तोंड देण्याचें सामर्थ्य तुमचें विद्यापीठ तुम्हांस देवो आणि अश्रद्धा व निराशा यांपासून तुमचा बचाव होवो."

[ पंजाब विद्यापीठाचें दीक्षान्त भाषण, इ. स. १९३० ]

" माझ्या तरुण मित्रांनो! साहस, धैर्य, आणि यौवन कायम ठेवा, हा माझा तुम्हांस संदेश आहे. समाजांत संवादित्त्व व प्रगति आणणारें नवें युग सुरू होत आहे.' त्यासाठीं संनद्ध होऊन या युगाचे शिल्पकार व्हा."

[ नागपूर विद्यापीठाचें दीक्षान्त भाषण, इ. स. १९३२ ]

" मनुष्य पृथ्वीवर सुखी होण्याकरितां जन्माला आलेला नाहीं. येथें येऊन त्यास प्रामाणिक आणि सौजन्यवान् व्हावयाचें आहे. तुम्हांला उच्चस्थान मिळो, अथवा न मिळो तुम्हांला आपल्या बांधवांच्या उपयोगीं पडतां येईल, त्याप्रमाणें सत्याची साधना करतां येईल. आपणांस विजयाची आशा आहे म्हणून नव्हे तर आपलें जीवनकार्य न्याय्य आहे म्हणून कर्तव्यपरायण व्हा."

[ अलाहाबाद विद्यापीठाचें दीक्षान्त भाषण इ. स. १९३४ ]

## गहन विषय रंजक केला.

आज नव्या जगांत एक थोर विचारवंत म्हणून राधाकृष्णन् यांची योग्यता आतां सर्वमान्य ठरली आहे. भौतिक सुखाकडे धांवणाऱ्या जगाला ते उच्च आत्मिक मूल्यें शिकवीत आहेत. मनुष्यानें शोध लाविले आणि

आंतरराष्ट्रीय दळणवळणाचीं साधनें तयार केलीं, पण राष्ट्राराष्ट्रांत बंधुभाव मात्र त्याला निर्माण करतां आला नाहीं. त्यामुळें विज्ञानाचा मनुष्यजातीला उपयोग न होता उलट स्पर्धा, द्वेष, हिंसा यांचेंच थैमान सुरू झालें आहे. इंद्रियसुखापेक्षां अधिक उच्च गोष्टीकडे माणूस जेव्हां आपली दृष्टि केंद्रित करील, तेव्हांच तो मनःशांति मिळवूं शकेल. आजवर थोर थोर विभूतींनीं जें सांगितलें तेंच राधाकृष्णन् सांगत आहेत. परंतु त्यांची सांगण्याची पद्धति इतकी मोहक असते कीं, ऐकलेलेंच पुनः ऐकावेसें वाटतें, कळलें आहे तेंच पुनः समजून घेण्यांत आनंद वाटतो.

ज्यांचे विषय सर्वसामान्य माणसांना चित्तरंजक वाटणारे असतात त्या वक्त्याचें एकपरीनें ठीक असतें. कारण आपल्या प्रतिपादनांत श्रोत्यांना ओढून घेण्यांस त्याला फारसें कष्ट पडत नाहींत. राधाकृष्णन् यांची कामगिरी जितकी अवघड तितकी मोलाची आहे यांचें कारण त्यांना नेहमींच अवघड विषयांवर बोलावें लागतें. या तत्त्वज्ञ पंडिताला उथळ किंवा लोकप्रिय विषयांवर बोलणें शक्य नसतें. विमानाचा वेग व डौल हीं अंतराळांतच दिसायचीं, त्याप्रमाणें राधाकृष्णन् यांना तत्त्वज्ञानासारख्या गहन विषयांतच आपला बुद्धिविलास दाखवावा लागतो. परंतु राधाकृष्णन् यांनीं त्या कामीं मिळविलेलें यश केवळ अपूर्व म्हणतां येईल. संसाराचा भार वाहून थकलीं भागलेलीं वृद्ध माणसेंच नव्हेत तर यौवनाच्या नंदनवनांत वावरणारे उत्साही व स्वप्नाळू तरुणतरुणीहि राधाकृष्णन् यांच्या व्याख्यानांत तन्मय होऊन जातात, हा अनुभव सर्व जगभर आला आहे. विषय कितीहि गूढ व कठीण असला तरी वक्त्याला आपल्या चातुर्यानें तो मनोरंजक करून दाखवितां येतो, हें राधाकृष्णन् यांनीं सिद्ध केलें आहे.

## विवेकानंदांचीच भूमिका

स्वामी विवेकानंदांनीं भारतीय धर्माचा व संस्कृतीचा झेंडा आपल्या अमोघ वाणीनें व व्यक्तित्वानें पाश्चात्य जगांत एकोणीसाव्या शतकाचे अखेरीस

२९९८२ २९५२ ३-७-६१

फडकविला. राधाकृष्णन् विसाव्या शतकांत तेंच कार्य करीत आहेत. विवेकानंदाइतका आवेश राधाकृष्णन् यांच्यामध्यें नसेल किंवा स्वामीजींची सूर्यासारखी तेजस्वी आकृति त्यांना लाभली नसेल. पण हिंदुधर्माचा खोल व्यासंग, त्या धर्मातील उदात्त तत्त्वांवर गाढ श्रद्धा आणि आपणांस पटलेलें दुसऱ्यांच्या मनावर ठसविण्याची हातोटी ही राधाकृष्णन् यांचे अंगीं फार मोठ्या प्रमाणांत आहे. राधाकृष्णन् यांचें वक्तृत्व लोकांच्या अंतःकरणाला जाऊन भिडण्याचें एक कारण म्हणजे आधुनिक जगाला समजेल अशा परिभाषेंत ते बोलूं शकतात हें होय. याचीं उदाहरणें वर दिलींच आहेत. पण केवळ श्रोत्यांना प्रफुल्लित करण्याकरितांच ते आधुनिक भाषा वापरतात असें नाहीं. त्यांची धर्मनिष्ठा जाज्वल्य असली तरी ती आंधळी नाहीं आणि नवें चांगलें ग्रहण करण्यास तिचा कधींच प्रतिबंध होत नाहीं. सर्व धर्मांच्या मूलतत्त्वांत सारखेपणा आहे, हें त्यांच्याइतकें हिरीरीनें फार थोड्यांनीं मांडलें असेल. अंगीं धार्मिकता असूनहि त्यांनीं यंत्रांना तुच्छ लेखण्याची किंवा विज्ञानाला नांवें ठेवण्याची चूक केलेली नाहीं.

> "सृष्टीच्या व्यापाराचें उत्कट मनन व अभ्यास करणें हें उच्च प्रतीचें बौद्धिक समाधान आहे. आपण भारतीय केवळ आध्यात्मिक वृत्तीचे आहोंत आणि विज्ञानशास्त्रांशीं आपणांस कांहीं कर्तव्य नाहीं ही कल्पना चुकीची आहे. आपल्या उत्कर्षाच्या काळीं आपण खगोल, शिल्प, गणित, वैद्यक, धातु इत्यादि शास्त्रांत प्रगति केली होती.……जगाच्या अग्रभागीं यायचें असेल तर आमच्या विद्यापीठांनीं संपन्न प्रयोगशाळांची उभारणी केली पाहिजे……दारिद्र्य आणि रोग, खटारे आणि रिक्षा हीं कांहीं आध्यात्मिक संस्कृतीचीं खास लक्षणें नाहींत. दारिद्र्य आपण स्वेच्छेनें पत्करलें तर तो त्याग होय. आपली गरिबी ही आपल्या आळशी व पराभूत मनोवृत्तीची साक्ष आहे."

## भारताचा संदेश

एका भाषणांतील हा उतारा राधाकृष्णन् यांची आधुनिक दृष्टि समजावून घेण्यास पुरेसा आहे. आज जग तिसऱ्या महायुद्धाच्या खाईंत सांपडतें कीं काय अशी भीति पडली आहे. एकीकडे अमेरिकेसारखें श्रीमंत भांडवलशाही राष्ट्र आपल्या पंखाखालीं सर्व जगाला घेऊं पहात आहे व दुसरीकडे साम्यवादी रशिया आपल्या बलिष्ठ पंजाखालीं त्याच जगाला दाबून ठेवण्याचा प्रयत्न करीत आहे. अशा वेळीं आम्हांला भांडवलशाहीनें येणारें दारिद्र्य व व बेकारी नको आणि समतेच्या नांवाखालीं होणारी व्यक्तित्वाची गळचेपीहि नको, असें कोणीतरी पुढाकार घेऊन सांगणें जरूर आहे. ती भूमिका आपल्या भारतावर आली आहे. एवढा विशाल व प्राचीन देश शांततेच्या बाजूनें ठाण मांडून उभा राहिला तर जगांतल्या दोन गटांची साठमारी खास होणार नाहीं. आमच्या देशांत माणसामाणसांनीं सलोख्यानें वागून आपली उन्नति कशी करून घ्यावी, याचा थोर आदर्श प्राचीन काळींच दाखविण्यांत आला आहे. सहिष्णुता हा आमचा धर्म आहे. तो प्राचीन दिव्य आदर्श आजच्या युगांत रामकृष्ण, गांधी, रमण, अरविंद, कृष्णमूर्ति यांच्या उदार चरितांत प्रकर्षानें प्रकट झाला. आमचे उपराष्ट्रपति डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन् त्याच आदर्शाचा पाठ जगाला देत आहेत. तत्वज्ञानाला भावगीताइतकें रंजक करणारा, इंग्रजीला संस्कृतीची माधुरी देणारा, संस्कृतला इंग्रजीइतकें लवचिक करणारा हा महान् वक्ता आम्हांला लाभला हें आधुनिक जगाचें भाग्यच नव्हे काय ? भारताचा तर हा खास अभिमानविषय आहे. ज्ञानासारखें पवित्र दुसरें कांहीं नाहीं हें तर खरेंच. पण ज्ञानासारखें सुंदरहि दुसरें कांहीं नाहीं, हें राधाकृष्णन् आम्हांस पटवून देत आहेत. तें आम्ही आचारांत किती उतरवूं यावरच आमचें आणि जगाचें भवितव्य अवलंबून राहणार.

## अभ्यासाच्या वाटा

१. राधाकृष्णन् यांचे परदेशांतील वक्तृत्व–विजय यासंबंधीं सविस्तर माहिती द्या.

२. राधाकृष्णन् यांची जीवनविषयक माहिती द्या. राजकारण क्षेत्रांत त्यांनीं कोणती कामगिरी आतांपर्यंत केली आहे व आज ते करीत आहेत ?

३. ' राधाकृष्णन् यांचें वक्तृत्व आदर्श शिक्षकाच्या वक्तृत्वासारखें आहे, ' स्पष्टीकरण करा.

४. ' विवेकानंदांचेंच कार्य राधाकृष्णन् आज करीत आहेत. ' विवेकानंदांनीं कोणतें महनीय कार्य केलें ?

५. ' वक्ते ' या नात्यानें राधाकृष्णन् यांचें स्थान फार मोठें आहे असें लेखक कां म्हणतात ?

६. तुम्ही अभ्यासिलेल्या पांचहि वक्त्यांमध्यें तुमच्या मतें सर्वांत श्रेष्ठ वक्ता कोण ? कां ?

ग्रंथ संग्रहालय
अनुक्रम 28962
विभाग वा.वा.
क्रमांक 2952
नों. दि. 3-7-61

# अधिक अभ्यासासाठीं

हें पुस्तक वाचल्यानंतर प्रस्तुत पांच भारतीय वक्त्यांचीं भाषणें मुळांतून वाचावीं व वक्तृत्वकलेचा अधिक अभ्यास करावा अशी कुणास इच्छा होईल. त्यांच्यासाठीं कांहीं थोडें मार्गदर्शन करणें अवश्य वाटतें. बानर्जी, गोखले, शास्त्री, व राधाकृष्णन् यांच्या भाषणांचे संग्रह प्रसिद्ध झाले आहेत. जयकरांचा संग्रह प्रकाशनाची वाट चालत आहे. सुरेन्द्रनाथ बानर्जींनीं आपलें आत्मचरित्र ( Nation in the making ) लिहिलें असून स्वतःच्या ओजस्वी वाणीनें आपल्या वक्तृत्वाचें मर्म सांगितलें आहे. राधाकृष्णन् यांच्या वक्तृत्वाचें स्वरूप अधिक स्पष्ट कळून येण्यास Heart of Hindustan या पुस्तकाच्या सुरस प्रस्तावनेची मदत होईल.

वक्तृत्वशास्त्राचा सांगोपांग विचार करणारे ग्रंथ मराठींत फारसे नाहींत. कै. विष्णुशास्त्री चिपळूणकर यांनीं 'वक्तृत्व' या विषयावर 'निबंध-मालें'त एक स्फूर्तिदायक प्रबंध लिहून या विषयांस चालना दिली. श्री. केशव सीताराम ठाकरे यांनीं या विषयावर एक पुस्तक लिहिलें. आतां नागपूरचे श्री. दि. ह. सहस्रबुद्धे यांनीं 'वक्तृत्व-साधन' म्हणून एक उपयुक्त पुस्तिका प्रसिद्ध केली आहे. आधुनिक काळांतील वक्तृत्वाचा विकास व विलास पाह्यचा झाल्यास गोखले, टिळक, केळकर, सावरकर, परांजपे इत्यादींचीं चरित्रें तसेंच 'स्वभावचित्रां'सारखीं व्यक्तिदर्शनात्मक पुस्तकें अभ्यासलीं पाहिजेत.

वक्तृत्वशास्त्रावर इंग्रजींत हवें तेवढें वाङ्मय आहे. ग्लॅडस्टन, डिझरायली, ॲस्किथ् यांच्यासारख्या विख्यात वक्त्यांचीं विस्तृत चरित्रें प्रसिद्ध असून त्यांत त्यांच्या वक्तृत्वाचा व एकंदर वक्तृत्व तंत्राचा मूलग्राही उहापोह आलेला आहे. अनेक स्वभावचित्रात्मक पुस्तकांतहि ही चर्चा आहे. या सर्वांचें लहानसेंच पण स्पष्ट दर्शन कर्झन यांच्या Parliamentary Eloquence या

पुस्तकांत घडेल. Think yourself या मालेंतलें Public speaking हें पुस्तक त्याचप्रमाणें फाउलरचें British Orators, हरोल्ड फोर्डचें Art of Extempore speaking व Principia of pulpit and platform oratory, माशर्लचें Ladies and gentlemen! इत्यादि पुस्तकें वक्तृत्त्व-शास्त्राच्या विद्यार्थ्यास उत्तम दिग्दर्शन करतील.

गायनाप्रमाणें वक्तृत्त्वाला श्रवणभक्तीची फार जरूरी आहे. म्हणून उत्तम वक्त्याचें भाषण ऐकण्याची संधि सहसा दवडूं नये. एक उत्कृष्ट भाषण ऐकल्यानें वक्तृत्त्व-कलेचें मर्म जेवढें कळेल तेवढें दहा पुस्तकें वाचून कळणार नाहीं. नाटकें किंवा बोलपट पाहतांनासुद्धां ही दृष्टि ठेविली तर फार फायदा होईल. आतां रेडिओच्या सोयीमुळें नामवंत वक्त्यांचीं भाषणें बसल्या जागीं ऐकायला मिळतात. वक्तृत्त्वांतील अभिनय किंवा नाट्य वगळल्यास बाकी अनेक गुणांचा प्रत्यय या भाषणांत घेतां येईल.

---

## दुरुस्ती

| पृष्ठ | ओळ | अशुद्ध | शुद्ध |
|---|---|---|---|
| ४३ | १५ | म्हणजे | म्हणतो, |
| ४४ | ८ | सालीं | रोजीं |
| ६५ | १३ | प्रतिसरकार | प्रतिसहकार |

[ पृष्ठ ७३ वर भाषणांत दिवे गेल्याचा जो प्रसंग दिला आहे तो डॉ. जयकरांच्या न्या. रानडे यांच्यावरील भाषणांतला आहे. न्या. रानड्यांच्या भाषणांतला नव्हे. ]

# श्री. गोपीनाथ तळवलकर

# यांचें वाङ्मय

## कथा-कादंबरी

छायाप्रकाश

आकाशमंदिर

अनुराधा

मालकंस

## प्रबंध-चरित्रें

आशियाचे धर्मदीप (चवथी आ.)

साधना (दुसरी आ.)

मंगलधाम (शिल्लक नाहीं)

आनंदभुवन

## मुलांसाठीं

साराच चमत्कार

चंद्रशेखर आणि मोहना (दुसरी आ.)

सात राजहंस

शिशुविहार (काव्य)

आजकालच्या थोर विभूति (चवथी आ.)

लिंबोणीच्या झाडाखालीं

कुमारमित्रांनो !

रुपेरी मनोरा

विद्यार्थ्यांसाठीं विधायक कार्यक्रम (अनुवाद)

## इतर

गृहरत्नें (आवृत्ति दुसरी)

नवीं गृहरत्नें

आपली राष्ट्रपि (अनु.)

पुणें

भिंतीवरील छाया (अनु.) (काव्य)

म. ग्रं. सं. ठाणे

BVBK-0404368